म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२५५०

५०

# निवडक गुजगोष्टी

ना. सी. फडके

REFBK-0007398

....चित्रशाळा प्रकाशन, पुणें २....

# निवडक गुजगोष्टी

प्रो. नारायण सीताराम फडके यांनीं लिहिलेल्या
कांहीं निवडक गुजगोष्टींचा पुरवणी वाचना-
साठीं तयार केलेला संग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 20683 विः निबंध
क्रमांक 92480 नोंः दिः 3-1-69

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 6386

REFBK-0007398

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

मुद्रक व प्रकाशक :
दा. त्र्यं. जोशी, बी. ए. (टिळक)
व्यवस्थापक चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें २

☆

प्रथमावृत्ति
ऑक्टोबर १९५०

☆

चित्रशाळा प्रेस, पुणें.

# प्रास्ताविक

## जीवनवृत्तान्त

प्रो. नारायण सीताराम फडके यांचा जन्म ता. चार ऑगस्ट १८९४ रोजीं अहमदनगर जिल्ह्यांतील कर्जत या गांवीं झाला. त्यांचे वडील सरकारी नौकरींत मामलेदारीच्या हुद्दयावर असल्यामुळें त्यांची नेहमीं बदली होत असे. त्यामुळें प्रो. फडक्यांच्या शिक्षणांत सुरवातीच्या कांहीं दिवसांत मोठीच अस्थिरता उत्पन्न झाली होती. पण पुढें सन १९०४ सालीं जेव्हां त्यांच्या वडिलांची पुणें येथें बदली झाली, व येथेंच ते बरेंच दिवस राहिले, त्यामुळें यापुढच्या प्रो. फडके यांच्या शिक्षणास सुरळीतपणा आला. प्रो. फडके हे १९१० मध्यें मॅट्रिक झाले व पुढें फर्ग्युसन कॉलेजमधून सन १९१४ सालीं बी. ए. व १९१७ सालीं एम्. ए. झाले. या दोन्हीहि परीक्षा ते दुसऱ्या वर्गांत मोठ्या सन्मानासह पास झाले. कॉलेजमध्यें असतां, सर्व प्रकारच्या कॉलेजीय जीवनांत उत्साहानें भाग घेणारे अवखळ पण हुषार विद्यार्थी म्हणून ते नांवाजले गेले होते. आजच्या त्यांच्या मोहक व सफाईदार वक्तृत्वाची साधना त्यांनीं आपल्या कॉलेजच्या जीवनापासूनच मोठ्या नेटानें सुरू केलेली होती.

सन १९१७ मध्यें ते एम्. ए. झाले खरें, पण त्याच्या पूर्वीच म्हणजे सन १९१६ पासून त्याच वर्षी स्थापन झालेल्या न्यू पूना कॉलेज (हल्लींचे सर परशुरामभाऊ कॉलेज) मध्यें प्रो. फडके लॉजिक हा विषय शिकवूं लागले होते. एम्. ए. झाल्यावर त्याच कॉलेज-

मध्यें ते प्रोफेसर म्हणून काम करूं लागले. पण १९२० च्या असहकारितेच्या चळवळींत त्यांनीं कॉलेज सोडलें, एवढेंच नव्हे तर कांहीं दिवस त्या चळवळींत त्यांनीं उत्साहानें भाग घेऊन, गांवोगांव दौरे काढून व्याख्यानेंहि दिलीं. पण चळवळीचा पहिला बहर ओसरल्यावर दिल्ली येथील एका कॉलेजमध्यें ते प्रोफेसर म्हणून गेले. पुढें कांहीं दिवस त्यांना नौकरीनिमित्त इकडे तिकडे हिंडावें लागलें. मग पुढें सन १९२६ मध्यें कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमध्यें ते तत्त्वज्ञान या विषयाचे प्रोफेसर म्हणून काम करावयास गेले ते सन १९४९ मध्यें निवृत्त होसतंवर ते तेथेंच काम करीत होते. आपल्या विषयांत तज्ज्ञ व विद्यार्थीवर्गांत अत्यंत प्रिय म्हणून त्यांची ख्याति होती.

## कादंबरीकार फडके

सन १९१२ पासून म्हणजे आपल्या विद्यार्थीदशेपासूनच प्रो. फडके यांनीं आपल्या लेखनकार्यास सुरवात केली होती. म्हणजे गेलीं अडतीस वर्षें त्यांचें लेखनकार्य अव्याहतपणें नि तितकेंच यशस्वीपणें चालू आहे. एवढेंच नव्हे तर ललित लेखनाच्या सर्व प्रांगणांत त्यांनीं सिद्धहस्त संचार केलेला आहे.

सन १९१७सालीं त्यांनीं **'अल्ला हो अकबर'** ही आपली पहिली कादंबरी लिहिली. **कुलाब्याची दांडी** ही त्यांची दुसरी कादंबरी होय. पण ज्या वेळीं सन १९२७।२८ मध्यें त्यांनीं जादूगार व दौलत या कादंबऱ्या त्या वेळीं निघणाऱ्या रत्नाकर मासिकांत क्रमशः प्रसिद्ध केल्या, त्या वेळीं त्यांची 'कादंबरीकार' म्हणून

ख्याति व लोकप्रियता एकदम वाढली. वाढत्या लोकप्रियतेबरोबर त्यांच्या लेखणीला धार येऊं लागली व एका पाठीमागून एक, अटकेपार, निरंजन, प्रवासी, अशा बहारीच्या कादंबऱ्या त्यांनीं लिहिल्या. आजपर्यंत त्यांनीं एकंदर अठ्ठावीस कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत; व यापुढेंहि त्यांचें लेखन–कार्य चालूच आहे. 'मराठी कादंबरीच्या' इतिहासांत प्रो. फडके यांचें स्थान मोठें मानाचे व वैशिष्टयपूर्ण असेंच आहे. आधुनिक लेखन–तंत्राच्या सहाय्यानें त्यांनीं मराठी कादंबरीला रेखीवपणा नि सुटसुटीतपणा यांचा लाभ करून दिला. चित्तवेधक कथानकाची रचना, अचुक स्वभाव रेखाटन, आल्हाददायक संवाद यांवरील त्यांचें प्रभुत्व; योग्य सृष्टि-वर्णनें व अनुकूल पार्श्वभूमि रंगविण्याची शक्ति; आणि मधुर, प्रसाद-पूर्ण भाषाशैली या आपल्या गुणांनीं त्यांनीं थोडक्याच काळांत मराठी कादंबरीला फार उच्च अशा पातळीवर नेलें.

प्रो. फडके हे प्रामुख्यानें कादंबरीकार म्हणून ओळखले जात असले तरी ते एक अष्टपैलु लेखक असून ललितवाङ्मयाचे सर्व प्रकार त्यांनीं यशस्वीपणें हाताळले आहेत, येवढेंच नव्हे त्या प्रत्येक प्रकारांत त्यांनीं एकेक तरी अविस्मरणीय पुस्तक लिहिलें आहे.

### 'नव्या वाङ्मयप्रकाराचे जनक' प्रो. फडके

पण या सर्वांपेक्षां लघुनिबंध लेखनाच्या क्षेत्रांतील त्यांचें कार्य फार महत्त्वाचें असेंच आहे. वास्तविक पाहतां इतर वाङ्मयप्रकारां-तील लिखाणांपेक्षां या प्रकारांतील प्रो. फडके यांचें लिखाण अत्यंत थोडेंच आहे, पण त्यामधील त्यांचें यश खरोखरीच फार मोठें आहे.

सन १९२५ सालीं प्रो. फडके यांनीं रत्नाकरांत दर महिन्यास एक अशी ' गुजगोष्ट ' लिहावयास सुरुवात केली; आणि त्याच-बरोबर मराठीतील या नव्या वाङ्मयप्रकाराची त्यांनीं नांदी म्हटली. आणि ती सुद्धां केवळ अभावितपणें नव्हे तर आपण एक नवा वाङ्मयप्रकार मराठींत रूढ करीत आहोंत या पूर्ण जाणिवेनें.

मराठी भाषेंत निबंधरचनेस सुरवात फार पूर्वींच म्हणजे अव्वल इंग्रजीच्या काळांतच झालेली होती. पण हे सुरवातीचे निबंध म्हणजे गंभीर भाषेंत उपदेशाचे दिलेले डोसच होते असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाहीं. या काळांतील निबंधाची भाषा व विषय जड असेंच होते. हळूं हळूं या लिखाणांत सुधारणा होऊं लागली व ' मालाकार ' चिपळूणकरांचेपासून विचारांचा तेजस्वी आवेश, मतप्रतिपादनाचा अभिनिवेश, बहुश्रुतपणाचा दिमाख इत्यादि गुणांनीं युक्त असें अधिक उज्ज्वल स्वरूप मराठी निबंधाला येऊं लागलें. तरी पण एकंदरींत सारा मामला लांबलचक व जड असाच होता. यानंतर कांहीं काळ गेल्यावर न. चिं. केळकर, शि. म. परांजपे, अच्युतराव कोल्हटकर यांच्या लिखाणानें मराठी निबंधाचें स्वरूप बरेंच आधुनिकतेकडे झुकूं लागलें. निबंधावरून लघुनिबंधावर ते हळू हळू येऊं लागले. त्यांची भाषा सोपी होऊं लागली, भाषेंत कलात्मकता येऊं लागली, विषयांमध्येंहि सुलभता, परिचितपणा येऊं लागला. पण या साऱ्या गोष्टी होत होत्या त्या केवळ अभावितपणें होत होत्या. लिहिण्याची बैठक होती ती जुनीच होती, केवळ कालमानपरिस्थिति बदलली होती, बदलत होती म्हणून शैलीला सोपेपणा येत होता, मोकळेपणा वाढूं लागला

होता, पण यांत आपण असें कां करतों आहोंत याची स्पष्ट जाणीव होती असें वाटत नाहीं. या साऱ्या निबंध–लेखकांचा पिंड होता तो वाङ्मयविलासाचा किंवा कलानंदाचा नव्हता. लोकांना शहाणे करण्याकरितां आपलें ज्ञान व बहुश्रुतपणा हीं कारणीं लावलीं पाहिजेत असाच त्यांचा या निबंधलेखनामागें हेतु होता.

## लघुनिबंधाचें वैशिष्ट्य व तंत्र

पण प्रो. फडक्यांनीं गुजगोष्टी लिहावयास सुरुवात करून खेळकर निबंधाचा नवा प्रकार रूढ करण्याचा प्रयत्न केला. त्यांना हे निबंध लिहून लोकांना कांहीं शिकवावयाचें नव्हतें, कांहीं संदेश द्यावयाचा नव्हता, तर एकादा माणूस आपल्या जिव्हाळ्याच्या मित्राशीं संभाषण करतो आहे असेंच हे निबंध वाचून वाचकांचें मत व्हावें अशी त्यांची कल्पना होती. ‘ गुजगोष्ट ’ हें नांव या नव्या वाङ्मयप्रकाराला देण्यांतहि त्यांनीं आपल्या मनांतील ही कल्पना स्पष्ट केली होती. एकदां कां ‘जिव्हाळ्याच्या मित्रांच्या गप्पासारखें’ हें या लघुनिबंधाचें नवें स्वरूप मान्य केलें कीं, त्यामुळें या वाङ्मयप्रकारांत होणारी अंतर्बाह्य क्रांतीहि मान्य करावयास हवी. ज्ञानप्रसार व तत्त्वप्रचार हीं पूर्वीच्या निबंधाची बैठक होती. पण जिव्हाळ्याचा मित्र हें कार्य आपल्या गोड गप्पांत कधींच करीत नाहींत. उलट गप्पांच्या ओघांत तो आपलें स्वरूपच आपल्या मित्रापुढें प्रकट करीत असतो. लघुनिबंध लेखकाचेंहि असेंच होतें. तो ज्या विषयाच्या अनुरोधानें लिहीत असतो त्या विषयास त्याच्या निबंधांत महत्त्व नसतें तर त्या विषयाबद्दलच्या त्याच्या स्वतःच्या कल्पनांस महत्त्व असतें. आणि एकाद्या विषयावरील आपलीं मतें–

आपलेंच खरें स्वरूपच प्रकट करीत नाहींत का? प्रो. फडके स्वत:च या बाबतींत काय म्हणतात हें पाहण्यासारखें आहे. "एखाद्या जलाशयाच्या कांठावर बसून आपण एक लहानसा दगड त्यांत टाकतों व मग पृष्ठभागावर उठणारे तरंग पाहात राहतों, तद्वत् या आधुनिक निबंधप्रकारांत कोणत्याहि विषयाच्या निमित्तानें लेखकाच्या अंतरंगांत उठणाऱ्या विकारतरंगाचें दर्शन घडावें व त्या दर्शनापासून आल्हाद व्हावा..........निबंधाचें मुख्य कार्य हें कीं, विषयाच्या अनुषंगानें लेखकाच्या व्यक्तित्वाची, त्याच्या स्वभावाची, त्याच्या आवडीनिवडीची ओळख वाचकाला झाली पाहिजे....सुहृद्भाव हा त्याचा आत्मा होय." (प्रस्तावना "नव लेणें"–) एकूण लेखकाच्या व्यक्तित्वाचा मार्मिक व आल्हाददायक आविष्कार हेंच लघुनिबंधाचें कार्य. पूर्वीच्या व या नव्या निबंधप्रकारांतील फरक तो हाच. प्रो. फडके यांनीं जाणूनबुजून हा नवा प्रकार रूढ केला व म्हणूनच या नव्या मराठी वाङ्मयप्रकाराचें जनकत्व त्यांचेकडे जातें. या नव्या वाङ्मयप्रचाराचें स्वरूप अधिक स्पष्ट करण्याकरितां प्रो. फडके म्हणतात, 'आपण सामान्य माणसं द्वेष करतों, लोभ करतों, प्रेम करतों, विविध आशा उराशीं बाळगतों, मनोरथ करतों, जें करायला नको होतं तें केलं, आणि जें करायला हवं होतं तें आपल्या हातून घडत नाहीं अशा दुहेरी जाणिवेनें व्याकुळ होतों आणि कधीं हंसत, कधीं सुस्कारे सोडीत जीविताची वाट चालत असतों. उत्कृष्ट निबंधकार आपल्याला भेटला कीं ज्याचे अनुभव बहुतांशीं आपल्यासारखेंच आहेत, परंतु जो त्याचें वर्णन आपल्याला साधत नाहीं इतक्या मनोज्ञ रीतीनें

करतो, अशा एका सोबत्याची संगति आपल्याला मिळाल्यासारखी वाटते, आणि मग जीवितमार्गावरची सहल करण्यास आपल्याला नवा हुरूप येतो. ”

अशा तऱ्हेचा नवा आल्हाददायक वाङ्मयप्रकार प्रो. फडके यांनीं मराठींत प्रथम सुरू केला. फडक्यांच्या पाठोपाठ श्री. वि. स. खांडेकर, काणेकर, वगैरे अनेक लेखकांनीं लघुनिबंधाचें मोठ्या यशस्वितेनें लेखन केलें आहे.

एकादा नवा वाङ्मयप्रकार रूढ झाला कीं त्याबरोबर त्याचें विशिष्ट तंत्रहि तयार होतें. “ जी वस्तु सामान्य दृष्टीला क्षुद्र अगर उपेक्षणीय वाटत असेल तिच्या विषयींच बोलावयाला लागून तींत सौंदर्य असल्याचें पटवून द्यावयाचें....याचा अर्थ असा कीं चमत्कृति हाच गुजगोष्टीचा आत्मा होय. ही चमत्कृति विषयाच्या निवडींत असावी किंवा त्यांत नसेल तर गोष्टीच्या ओघांत आणावी........ या चमत्कृतीपेक्षांहिं अधिक महत्त्वाचें तंत्र म्हणजे तिच्यांत प्रकट होणारी वृत्ति आणि तिची भाषा.........वाचक म्हणजे आपल्या अंतरगांतले मित्र अशा बुद्धींनेंच गुजगोष्ट लिहिली गेली पाहिजे.... व या वृत्तीला साजेशीच भाषा लेखकानें योजिली पाहिजे. काव्याचे अलंकार न टाकतां भाषा जितकी सुबोध, हलकी, मनमोकळी, गंमतीनें बोलल्यासारखी ठेवतां येईल तितकी गुजगोष्ट अधिक रंगेल, ” प्रो. फडके यांच्याच शब्दांत हे लघुनिबंधाचे तंत्र सांगितलें तें अधिकृत होईल यांत शंका नाहीं. तसेंच यशस्वी लघुनिबंधाचीं वैशिष्टयें कोणतीं म्हणून सांगावयाचीं तर, बहारीचा आरंभ, वैचित्र्यपूर्ण विकास व मजेदार अथवा तात्त्विक शेवट हीं

होत. हीं तीन वैशिष्ट्यें ज्या लघुनिबंधांत आहेत तो निरस होणें कदापिहि शक्य नाहीं.

प्रो. फडके यांचे गुजगोष्टी, नव्या गुजगोष्टी, धूम्रवलयें, इत्यादि लघुनिबंधांचे संग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. याच तीन संग्रहांपैकीं प्रत्येकांतील चार निबंध असे एकूण बारा लघुनिबंध या प्रस्तुत 'निवडक गुजगोष्टी' या संग्रहांत घेतले आहेत. मराठींत नव्यानेंच हा वाङ्मयप्रकार जन्मास घालणाऱ्या लेखकानें आपली प्रत्येक कलाकृति ठसठशीत, नमुनेदार आणि आदर्शवत् करावी ही गोष्ट वाङ्मयाच्या इतिहासांत सदैव कौतुकाची होऊन राहील यांत शंका नाहीं. प्रस्तुत संग्रहांतील प्रत्येक गुजगोष्ट ही प्रत्येक दृष्टीनें आदर्शच आहे. प्रत्येक कलावस्तूचें तंत्र हें तिच्या अंगाखांद्यावरच असतें, तिच्याकडे पुनः पुन्हा न्याहाळून पाहण्यांतच तें आपणाला दिसूं लागतें असें प्रो. फडकेंच सांगतात. तेव्हां हे लघुनिबंध वाचण्यांतच त्यांच्या सौंदर्याची अनुभूति आहे येवढें सांगितलें म्हणजे पुरे.

१-१०-१९५० प्रकाशक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | बालवृत्ति | १ |
| २ | शाई | १० |
| ३ | मित्र | १५ |
| ४ | पाऊस | २२ |
| ५ | घड्याळ | ३२ |
| ६ | छत्री | ४१ |
| ७ | नको असलेलीं पुस्तकें | ४८ |
| ८ | पुरून ठेवलेलें धन | ५५ |
| ९ | पोरखेळ | ६२ |
| १० | अंधारी रात्र | ६८ |
| ११ | वाट चुकल्याचा आनंद | ७६ |
| १२ | सुगंध दिखाऊ अन् टिकाऊ ! | ८५ |

“ कलावस्तुचें तंत्र खरें पाहतां तिच्या अंगाखांद्यावरच
असतें. तिच्याकडे नीट न्याहाळून पुनः
पुन्हा पाहावें म्हणजे तें कोणी न
सांगतां आपल्याला दिसूं लागतें.”

—ना. सी. फडके

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७३९८

: १ : **बालवृत्ति**

**परिचय**—बालवृत्ति ही केवळ वयावरच अवलंबून असते असें नाहीं. एखाद्या वस्तूविषयीं त्या वेळेपुरतें तादात्म्य ठेवून त्यापासून आनंद मिळविण्याची वृत्ति हीच बालवृत्ति होय. बालकांमध्यें ही वृत्ति उघडपणें दिसत असतेच पण कांहीं थोडया प्रौढांतहि ही वृत्ति आढळून येते. आणि अशा थोडया प्रौढांनाच त्यांच्या या वृत्तीमुळें संसार सुखमय वाटत असतो. जीवनांतील आनंद अबाधित ठेवणाऱ्या या बालवृत्तीचें महत्त्व कांहीं विशेषच असतें, इतकें कीं प्रत्येकानें अशी वृत्ति मिळविण्यासाठीं आपल्या जवळील अतिमहत्त्वाचा ठेवा देण्यासहि कांहीं हरकत नाहीं.

**चार** रंगीबेरंगीं वेडींवाकडीं खेळणीं घेऊन खेळणाऱ्या मुलांना त्या खेळण्यांपासून जितका आनंद होतो तितकाच आनंद—किंबहुना त्याहून अधिक—त्या मुलांना पाहिल्यानें मोठ्या माणसांना होत असतो. खेळांतील भावलाभावलींवर नाना प्रकारच्या भावनांचा, आवडीनिवडींचा आणि रागलोभादि विकारांचा आरोप करून त्यांचें कोडकौतुक पुरवितांना चिमकुलीं मुलें आपलीं चिमुकलीं सुखदुःखें विसरतात; आणि त्या मुलांच्या अंतःकरणाचा तो सरळपणा व

साधेपणा पाहून मोठ्या माणसांना आपल्या मोठ्या दुःखांचा विसर पडतो. वास्तविक, ज्यामुळें माणसाचें देहभान हरपावें असें खेळां-तल्या भावलाभावलींत, हत्तीघोड्यांत किंवा चूलबोळक्यांत कांहींच नसतें. पण मुलांना त्यांच्यापुढें तहानभूक सुचत नाहीं. तीं त्यांत तन्मय होऊन जातात. आणि त्यांच्या निर्व्याज वृत्तीचें कौतुक करण्यासाठीं आपण म्हणतों, "रम्य तें बालपण देइ, देवा, फिरुनि."

प्रौढ माणसांनीं केलेलें लहान मुलांच्या साध्या, भाबड्या वृत्तीचें हें कौतुक कधीं कधीं शुद्ध असतें, तर कधीं कधीं त्यांत एक हिणकस भावना मिश्रित झालेली असते. लहान मुलांच्या ठायीं विचारशक्ति कमी असल्यामुळें अर्थशून्य खेळण्यांतहि त्यांचें मन रमूं शकतें, अशा तुच्छतेच्या आविर्भावानें कित्येक वेळां मोठीं माणसें त्यांच्या खेळाचें कौतुक करतात. मोडक्यातोडक्या बाहुलीला काल्पनिक अंगडेंटोपडें घालण्यांत आणि काल्पनिक पक्वान्नें भरविण्यांत स्वतःचें जेवण विसर-णाऱ्या मुलीचें, आणि दाराच्या उंबरठ्याची गाडी कल्पून, त्यावर बसून, तिचे काल्पनिक घोंडे भरधांव सोडून " बाजू ! " म्हणून ऐटीनें ओरडणाऱ्या मुलाचें कौतुक करतांना पुष्कळदा त्यांच्या भाबडे-पणाविषयीं कींव दाखविण्याच्या ऐटीनेंच मोठीं माणसें बोलतात. प्रौढ बुद्धीला ज्या वस्तु नीरस व निरर्थक वाटतील त्यांत लहान मुलें, त्यांच्या अंगीं समज कमी असल्यामुळें, आनंद मानतात अशा प्रौढीची लकेर मोठ्या माणसांच्या कौतुकांत कित्येक वेळां असते. ऐन दुपार-च्या प्रहरीं ओढ्याच्या कांठच्या सावलींत कांदाभाकर खातांना एखाद्या गुराख्याला पाहून शहरचा एखादा लक्ष्मीपुत्र त्याच्या साध्या समा-धानाचं कौतुक करतो तेव्हां, आपलें स्वतःचें समाधान त्याच्यापेक्षा

फार वरच्या दर्जाचें आहे अशी आढ्यता प्रच्छन्न रूपानें, पण बऱ्याच अंशानें, त्या कौतुकांत असते. आपल्या शहरच्या सुखविलासांची आणि वैभवाची त्या गुराख्याच्या गरिबीशीं अदलाबदल करतोस का म्हणून कोणी त्या लक्ष्मीपुत्राला विचारलें तर त्याच्या कौतुकाचा झिरझिरीत पडदा फाटून आंतील आढ्यता उघडी पडावयास वेळ लागणार नाहीं. हीच गोष्ट लहान मुलांच्या साध्याभोळ्या वृत्तीचें कौतुक करणाऱ्या मोठ्या माणसांची पुष्कळ वेळां असते.

परंतु, तसाच विचार केला तर निरर्थक वस्तूंत आनंद मानणाऱ्या लहान मुलांहून आपला आनंद श्रेष्ठ दर्जाचा आहे असें मानण्याचा अधिकार मोठ्या माणसांना आहे काय ? लहान मुलांना कमी समज असते असें समजणाऱ्या मोठ्या माणसांना मोठी समज खरोखरीच आलेली असते काय ? प्रौढ माणसांची बुद्धि खरोखरच प्रौढ झालेली असते काय ? त्यांच्या आनंदाचे व सुखाचे विषय होणारे सर्व पदार्थ सार्थ असतात काय ? निरर्थक वस्तूंत प्रौढ माणसें आनंद मानीत नाहींत काय ? सर्व प्रौढ माणसांना एकाच विषयापासून सारखाच आनंद लाभतो काय ? एका प्रौढ माणसाचा सुखविषय दुसऱ्यास निरर्थक वाटण्यासारखा नसतो काय ? कथापुराणांच्या नादानें घरचीं कामें टाकून धांवणाऱ्या बायका पुरुषांच्या मतानें टीकास्पद ठरतात; कोल्हापुरास कुस्तीची दंगल निघाली तर धंदा सोडून पुण्यामुंबईहून तिकडे जाणारे हौशी लोक पुष्कळांच्या दृष्टीनें मूर्ख ठरतात; आणि बालगंधर्वांच्या नाटकासाठीं शेकडों मैलांवरून धावत येणाऱ्या आणि पैशाच्या नोटांच्या वावड्या करणाऱ्या श्रीमंतांना भोंवतालचे किती तरी लोक बेअकली समजत असतात !

शिक्षणाच्या आणि सामाजिक दर्जाच्या भिन्नतेमुळें सुखविषयांची ही भिन्नता उत्पन्न होते असें मानण्यासहि जागा नाहीं. शिक्षण, मनोविकास आणि श्रीमंती या सर्व दृष्टींनीं सारख्याच दर्जाचीं ठरतील अशा माणसांचे सुखविषयहि भिन्न भिन्न आणि परस्परांस निरर्थक वाटणारे असतात, हा नेहमींचा अनुभव आहे. एकाला काव्याची विलक्षण आवड असते, काव्यवाचनापासून होणाऱ्या आनंदापुढें त्याला सारें जग तुच्छ वाटत असतें, आणि पोटच्या मुलांपेक्षांहि आपल्या काव्यग्रंथांना तो अधिक जपत असतो; तर उलट, कालिदासाच्या किंवा भवभूतीच्या नाटकांतील एखादा श्लोक पुनःपुन्हा मनाशीं म्हणून आनंदानें नाचणाऱ्या त्या गृहस्थाला पाहून दुसरा त्याची गणना शुद्ध मूर्खांत करावयास कमी करीत नाहीं. एखाद्याला संगीताविषयीं इतकी आसक्ति असते कीं, गायनवादनावांचून, नाहीं तर निदान त्याविषयींच्या गप्पा तरी मारल्यावांचून घालविलेली एक घटकाहि त्याला असह्य वाटते. पण गवयाचें गायन एकाग्रतेनें ऐकत बसून त्याच्या गळ्यांतून निघणाऱ्या दर एक तानउपजेबरोबर "वाहवा" देतांना आणि माना डोलवितांना त्याला पाहून त्याचे कित्येक मित्र त्याच्या निरर्थक नादिष्टपणाची कींव केल्यावांचून राहात नाहींत. निदान आनंदानें बेहोष होण्यासारखें असें त्या गायनांत येवढें काय आहे, असें आश्चर्य त्यांना वाटल्याखेरीज राहात नाहीं. आणि खरेंच, संगीतलोलुपतेची दृष्टि सोडून क्षणभर विचार केला तर, संगीतांत येवढी मोहिनी ती काय आहे? क्रिकेटच्या चौरंगी सामन्यांतील एखादा डाव सुरू झाला म्हणजे क्रीडांगणावर जाऊन पाहावें. प्रत्यक्ष खेळणारांच्या ठायीं नसेल इतक्या तादात्म्यवृत्तीनें पंधरावीस हजार प्रौढ प्रेक्षक खेळ पाहात असतात. मोठमोठीं वयस्क

माणसें आनंदातिशयानें उभीं राहून रुमाल हवेंत उडवीत असतात, टाळ्या पिटीत असतात, ओरडत असतात. त्यांच्या बाजूचा एखादा गडी पडल्याबरोबर त्यांचे चेहरे दुःखानें म्लान होतात. त्यांच्या बाजूची सरशी होत असलेली दिसतांच त्यांना हर्षाचें भरतें येतें. पण त्रयस्थांना त्यांचा तो हर्षोन्माद वेडाच्या लहरीसारखा वाटतो. आणि तसाच विचार केला तर चेंडूफळीच्या त्या खेळांत येवढें स्वारस्य तें काय असणार? घोड्यांच्या शर्यती खेळणाऱ्यांच्या स्पेशल गाड्या पुण्यास येऊन धडकण्याच्या वेळीं स्टेशनवर जाऊन घटकाभर उभें राहावें. चाळिशीच्या पुढें गेलेले. दाढीमिशा फुटलेले—नव्हे फुटणाऱ्या दाढीमिशा साफ काढणारे—आणि चारपांच मुलांचे आई-बाप सहज शोभतील असे पुरुष लहान मुलांप्रमाणें गाडी उभी राहण्यापूर्वींच गाडींतून पटापट उड्या टाकून धांवत सुटतात; मोठ-मोठ्या श्रीमंतांच्या बायका लज्जा विनय टाकून पोरीसोरींसारख्या खिदळत आणि किंकाळ्या फोडीत शर्यतीच्या पटांगणावर त्वरेनें दाखल होण्यासाठीं गर्दींतून लोकांना धक्के देत वाट काढीत असतात; आणि इतर वेळीं ज्यांची क्षणभर भेट घ्यावयाची झाल्यास मोठ-मोठ्या लोकांनाहि कचेरीच्या दारापाशीं घटकान् घटका तिष्ठत उभें राहावें लागतें, असे बडेबडे कामदार लहानाहून लहान होऊन पळत असतात! आपल्या दृष्टीला तो एकंदर गोंधळ शुद्ध वेड्यांचा बाजारसा वाटेल. आणि खरेंच! तसेंच पाहिलें तर साध्या घोड-दौडीच्या त्या दंगलींत देहभान विसरण्यासारखें तें येवढें काय आहे?

प्रणयपाशांत सांपडलेल्या प्रौढ माणसांची गोष्ट तर बोलावयासच नको. स्त्रीवर अनुरक्त झालेला कामी मनुष्य तिच्या पायधुळीचेंहि

चुंबन घेण्यास तयार असतो, आणि तिच्या प्राप्तीपुढें संपत्ति व कीर्ति या दोहोंचीहि त्याला पर्वा वाटत नाहीं. परंतु ज्या स्त्रीविषयीं तो एवढा लंपटपणा करतो तिच्या स्वरूपाकडे पाहावें तों त्यांत सौंदर्य सांपडेलच असें नाहीं. आणि जरी स्त्री सुंदर असली तर तसाच विचार केला तर तिच्या प्राप्तीसाठीं माणसानें आपल्या सर्वस्वावर पाणी सोडावें येवढी त्यांत कोणती जादू आहे? परंतु असें असूनहि प्रणयाच्या प्रवाहांत प्रौढ, सुबुद्ध आणि विद्वान् माणसांची प्रौढ बुद्धि व विद्वत्ता वाहून गेल्याचीं उदाहरणें आपण प्रत्यहीं पाहतों. प्रत्येक देशाच्या इतिहासांत विश्वामित्र व मेनका यांच्या प्रणयप्रसंगाचें नाटक अनेक वेळां झालेलें दिसतें, आणि मानवजातीच्या अंतापर्यंत या नाटकाची पुनरावृत्ति पुनःपुन्हा होत राहणार.

सारांश, लहान मुलांच्या भोळ्या वृत्तीची कींव करणाऱ्या प्रौढ माणसांची स्थिति त्या मुलांहून निराळी नाहीं. या संसारांत लहान मोठा प्रत्येक मनुष्य कोणत्या तरी एखाद्या खेळण्याच्या नादीं लागलेला असतो. कोणी काव्याचा खुळखुळा करून त्याच्या नादांत असतो; कोणी शास्त्रीय शोधाची बाहुली घेऊन ती जन्मभर उलटीसुलटी फिरवीत असतो. कोणी वेदान्ताचा आरसा घेऊन त्यांत आपलें स्वरूप सारखें पाहात असतो; कोणी राजकारणाचीं घरकुलें बांधण्यांत, मोडण्यांत आणि पुन्हां उभीं करण्यांत दंग असतात; आणि कोणी एखाद्या जिवंत बाहुलीच्या नादीं लागून तिला वस्त्राभरणांनीं सजविण्यांत, तिच्याशीं प्रेमकलह करण्यांत आणि तिचें परोपरीनें कोडकौतुक करण्यांत रमून जातात. बेगडी निरर्थक खेळण्यांत दंग होणाऱ्या बालकांकडून आपली अभिरुचि अधिक समजंस व अधिक

उच्च दर्जाची आहे असें मानणारीं प्रौढ माणसेंहि इतर प्रौढ माणसांच्या दृष्टीनें तशाच निरर्थक वस्तूंच्या नादीं लागलेलीं असतात. प्रौढ माणसांच्या व्यवहारांतील आनंदाच्या आणि उत्साहाच्या प्रत्येक ऊर्मीची गोष्ट अशी आहे कीं, सत्यासत्यतेची जराशी भिन्न कसोटी लावल्याबरोबर तो आनंद व उत्साह खोटा, निरर्थक केवळ त्या त्या माणसानें आपल्या आवडीनें कृत्रिमपणानें उत्पन्न केलेला असा ठरेल.

मात्र याचा अर्थ असा नव्हे, कीं प्रौढ माणसांनीं हे विविध आनंद उपभोगूं नयेत. यांतील अभिप्राय इतकाच कीं, लहान मुलांच्या भाबड्या खेळाकडे पाहून त्यांना समज कमी आहे व आपल्याला जास्त आहे, अशा अभिमानाच्या व श्रेष्ठपणाच्या आविर्भावानें त्याचें कौतुक करणारा प्रौढ मनुष्य मोठी चूक करीत असतो. बालक्रीडांतील साधेपणाच्या कौतुकाला असल्या हिणकस आविर्भावाचा विटाळ होतां कामा नये. उलट, साध्यासुध्या गोष्टींपासून सहज आनंद प्राप्त करून घेण्याची मुलांची वृत्ति दृष्टीस पडली, कीं तिच्याविषयीं आपल्याला एक प्रकारचा हेवा व लोभ वाटला पाहिजे. "ही वस्तु माझ्याजवळ असती तर मी किती सुखी झालों असतों" असें एखाद्या वस्तूकडे पाहून म्हणतांना आपल्याला जें वाटतें तेंच या बालवृत्तीविषयीं वाटलें पाहिजे. ही एक बालवृत्ति आपल्याजवळ असेल तर आपल्या अंतःकरणाला घरे पाडणारी नाना प्रकारची सांसारिक चिंता आपल्याला शिवणार नाहीं, मनोभंगामुळें उत्पन्न होणाऱ्या निराशेची जखम खोलवर कधींच जाणार नाहीं आणि दुःखाला क्षणार्धापेक्षां अधिक अवकाश आपल्या हृदयांत केव्हांहि

मिळणार नाहीं, अशा विचारानें आपण लहान मुलांच्या भावड्या खेळांकडे पाहिलें पाहिजे.

कारण, त्या त्या वस्तुविषयीं त्या त्या वेळेपुरतें तादात्म्य ठेवून आनंदाचा उपभोग घेण्याच्या या बालवृत्तीमुळेंच संसार सुखमय होत असतो. ही बालवृत्ति ज्याच्याजवळ नसते त्याला संसारांत आनंद असूनहि सांपडत नाहीं. संध्याकाळच्या तिरप्या उन्हांत पदार्थांच्या छाया दसपट मोठ्या दिसाव्या त्याप्रमाणें, त्या मनुष्याला संसारांतील लहानसहान दुःखेंहि प्रचंड आणि असह्य भासूं लागतात. पत्र्याच्या छपरावर पडलेली लहानशी सरहि मुसळधार पावसासारखी वाटावी त्याप्रमाणें लहानशी निराशाहि त्याला भेवडावूं लागते. भयाण देवळाच्या सभामंडपांत घोंटाळणारा वाऱ्याचा लहानसा झोत सूं सूं आवाज होऊन झंझावातासारखा वाटावा, त्याप्रमाणें दुर्दैवाचा विरुद्ध वारा जरासा वाहूं लागतांच त्याला भयंकर वादळांत सांपडल्यासारखें वाटून तो गांगरून जातो व हतबल आणि हतबुद्ध होतो. अशीं माणसेंच म्हणतात, संसार निःसार आहे.

उलट, लहान मुलांची निर्व्याज वृत्ति ज्याच्या अंतःकरणांत सदैव असते त्याच्या दृष्टीला संसारांतील दुःखें आकाशांत क्षणभर उठणाऱ्या जलहीन मेघांप्रमाणें दिसतात. त्या ढगांची भीति वाटण्याऐवजीं त्यामुळें क्षितिजाच्या देखाव्यांत वैचित्र्याची भर पडल्यासारखें वाटलें पाहिजे अशी त्याची समजूत असते. अशा बालवृत्तीच्या मनुष्याचा आनंद अबाधित असतो, आणि संसार आनंदमय आहे असें तो आपल्या वर्तनानें लोकांना शिकवीत असतो. इतकें त्या बालवृत्तीचें महत्त्व आहे. मग बालकांच्या खेळण्याचें कौतुक करतांना त्यांच्या

मनाच्या निर्व्याज वृत्तीविषयीं आपल्याला हेवा व लोभ वाटला तर त्यांत वावगें तें काय आहे ? सबंध राज्याचें मोल देऊन ती बालवृत्ति विकत घ्यावयास राजानें तयार असावें, तिच्या वर्णनाचें सौख्य अनुभविण्यासाठीं आपल्या सर्व प्रतिभेचा विनिमय करण्यास कवींनीं व कादंबरीकारांनीं तत्पर असावें, आणि तिच्या संपादनासाठीं तत्त्वज्ञानी आणि योग्यांनीं रात्रंदिवस झटावें इतकें या बालवृत्तीचें मोल मोठें आहे. तिच्याविषयीं आपल्याला हाव आणि हेवा वाटतो हें कबूल करण्यांत सहृदय माणसाला नेहमीं धन्यताच वाटेल !

**अभ्यास**—(१) बालवृत्तीचें कौतुक करण्यांत मोठ्या माणसांची भावना कोणती असते ? (२) मोठी माणसेंहि लहानाप्रमाणें निरर्थक वस्तूंत आनंद मानतात हें सांगण्यासाठीं लेखकानें कोणतीं उदाहरणें घेतली आहेत ? (३) बालवृत्तीची लेखकानें थोडक्यांत केलेली व्याख्या सांगून ही वृत्ति ज्यांचे अंगीं नसते त्यांची संसाराकडे पाहण्याची दृष्टि कोणती असते असें लेखकाला वाटतें ? (४) बालवृत्तीचें महत्त्व सांगतांना ती मिळविण्यासाठीं कोणीं काय करावें असें लेखक म्हणतो ?

परिचय—'साध्याहि विषयांत कधीं कधीं कसा गंभीर 'आशय' मिळूं शकतो याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजेच हा निबंध ! नाहींतर शाईसारख्या अगदीं क्षुल्लक विषयावर निबंध तो काय लिहावयाचा ? सुधा आणि हलाहल एकाच कोठयांत सांठविणारा हा द्रव पदार्थ नरदेहाच्या वातीच्या काजळापासून तयार झालेला असावा ही कल्पनाच मोठी हृदयंगम वाटते.

अतिपरिचयात् अवज्ञा ! नाहीं तर ' शाइ ' या विषयावर ग्रंथ लिहिण्यांतच किती तरी शाई खर्च करतां येण्यासारखी आहे ! निदान मला त्या वेळीं असें वाटलें खरें ! मी सकाळीं कायसें लिहावयासाठीं टेबलाजवळ बसलों आणि दौतींत लेखणी–भलतेंच ! टांक बुडवितों तों शाई नाहीं. मुंबईच्या चाळींतल्या एखाद्या स्त्रीनें मोठ्या आशेनें नळावर जावें आणि पाणी गेल्यावर कोणी तरी खोलून ठेवलेल्या नळाचें कोरडें ठणठणीत तोंड तिच्या दृष्टीस पडावें म्हणजे तिला जसें होतें तसेंच थोडेंफार मला झालें ! उठलों, शेल्फवर शाईची मोठी शिशी होती ती काढली, व दौतींत शाई ओतून घ्यावयासाठीं तिचें तोंड उघडूं लागलों. शिशीच्या आंत डोलानें

मराठी ग्रंथ संग्रहालय ... अनुक्रम ... वि: ... नों दि: ...

चमकणाऱ्या त्या मनोहर जांभळ्या द्रवाकडे पाहातच राहावेसें मला वाटलें.

एखाद्या मोत्यांतील पाणी चमकावें तसा तो द्रव पदार्थ दिसत होता. शर्यतीच्या मैदानांत सुटण्यास अधीर झालेल्या अश्वराजानें साइसाच्या हाताला हिसके द्यावे व खुरांनीं जमीन खुरडावी त्याप्रमाणें तो 'द्रव पदार्थ' अधीरतेनें उचंबळत होता. बाटलीच्या बंदिखान्यांतून सुटून कागदाच्या ऐसपैस सफेत क्षेत्रावर त्याची क्रीडा झाली, कीं काय काय परिणाम होणार होते? तसाच विचार केला, तर त्या शाईतून काय वाटेल तें बाहेर पडण्यासारखें होतें. भ्रांत मनाला अखंड शांतीचा लाभ करून देण्यासारखी धर्मचर्चा, पतितांना आशेचा किरण दाखविणारा भक्तिबोध, दुष्टांच्या डोळ्यांत अंजन घालणारी विवेकवाणी, रसिकांचें हृदय वेधणारी ललितकथा, अशा सुभग वस्तूंप्रमाणेंच सज्जनांच्या हृदयाला घरे पाडणारे लेख, अधमांना उत्तेजन देणारा वितंडवाद, श्रद्धावंतांना मूर्ख ठरविणारे कोटिक्रम, किंवा शांत चित्तावर भ्रांतीची कृष्ण छाया पसरविणारें शब्दजाल, यांचींहि बीजें त्या शाईत होतीं. आनंद, अनुराग, वात्सल्य इत्यादि दिव्य भावना, आणि राग, द्वेष, मत्सर इत्यादि भेसुर विकार यांची कोण गर्दी त्या शाईत झाली होती! राष्ट्राराष्ट्रांमधील तहनामे हिच्याच पोटीं जन्माला येणार, आणि गुलामांच्या मुदतबंदीचे करारहि हीच प्रसवणार! लाखों अनाथांच्या योगक्षेमासाठीं दिल्या जाणाऱ्या धर्मादायांचीं दानपत्रें हिनेंच मुद्रांकित होणार, आणि अज्ञ सनाथांना अनाथ करून दारोदार फिरावयास लावणारीं खोटीं गहाणपत्रेंहि हीच कायम करणार! सुधा आणि

हलाहल एकाच कोठ्यांत सांठविणारा किती अजब द्रव पदार्थ हा !

आणि हें जर खरें, तर मन मानेल त्यानें खुशाल यांत कलम बुडवावें ? अखिल मानवजातीवर सुविचारांची शीतल पांखर घालणारे वृक्षराज, किंवा मनुजमात्रावर कुवासनांचा तप्त रस ओतणारे ज्वालामुखी पर्वत ज्या शाईतून उद्भवण्याचा सारखाच संभव ती कोणीहि घ्यावी, दौतींत ओतावी, आणि कलमाच्या मापानें मनसोक्त उधळावी ! लक्ष्मीची बेगुमान उधळपट्टी पुरविली; पण या शाईला बेजबाबदार हातांचा स्पर्श झाल्यावर जगावर कोणतें संकट ओढवेल तें सांगतां येणार नाहीं. ज्यांना या बेजबाबदारीच्या पापकृत्याची भीति वाटत असेल त्या शाईच्या व्यापाऱ्यांनीं ती विकतांना प्रत्येक शिशीवर स्पष्ट अक्षरांत " केवळ सज्जनांसाठीं " असें लेबल मारलें, व दुर्जनांना शाई विकावयाचें नाकारलें, तर किती उचित होईल ? स्फोटक द्रव्यें इकडून तिकडे पाठवितांना " जपून " अशी सावधागिरीची इशारत त्यावर चिकटवितात, तशी शाईच्या शिश्यांवर असावयास नको काय ? मोटार हांकावयास परवाना, औषधें विकावयास परवाना, इतकेंच नव्हे तर लोकांचें चार घटका मनरंजन करावयासाठीं तोंडाला सफेती फासायची म्हटली तरी, परवाना घेतला आहे का म्हणून विचारणाऱ्या सरकारनें शाई वापरण्याची सरसहा सर्वांना मोकळीक ठेवावी हें आश्चर्यच आहे ! वास्तविक दारूगोळा किंवा समशेर हातीं घेणाऱ्या इसमाइतकाच दौतींत शाई ओतून घेणाऱ्या इसमावरहि सरकारनें करडी नजर ठेवावयास हवी. शाई ही देखील समशेरीसारखीच शक्ति आहे.

पण मी म्हणतों, शाईचा क्रयविक्रय करणारे व्यापारी, किंवा शाईवर एखादा कर बसवितां येईल किंवा नाहीं एवढेंच पाहणारें संकुचित दृष्टीचें सरकार, यांपैकीं कोणालाहि या द्रवाची सुप्त शक्ति कळली नाहीं, तरी जे या द्रवाच्या द्वारें साऱ्या मानवजातीशीं विचारविनिमय करतात त्यांनीं तरी ती सतत ध्यानांत वागविली पाहिजे, आणि एखाद्या यज्ञाला प्रारंभ करण्यापूर्वी ज्याप्रमाणें, यज्ञ-भूमि व सारें यज्ञसाहित्य पवित्र करून घेण्याची चाल होती त्या-प्रमाणें, स्वतःची मनोभूमि अभिमंत्रित केल्यानंतरच शाई दौतींत ओतून घेतली पाहिजे. कोणत्याहि लेखकाच्या मनांत प्रत्येक वेळीं असें आलें पाहिजे कीं, या दिव्य शक्तीचा विनियोग मी सत्प्रव-र्तनासाठींच करणार आहे ना? कोणत्याहि अमंगल वासनेचा स्पर्श या वेळीं माझ्या अंतःकरणास झालेला नाहीं ना? तामसी विचारांनीं माझी बुद्धि जडावलेली नाहीं ना? अनाचार, अविद्या, असूया, यांच्या कल्लोळांत जगाला बुडविण्यांतच ज्यांनीं शाईचा सडा केला त्या भूतकालांतील पापी लेखकांच्या पिशाचांची सावली मजवर पड-लेली नाहीं ना? ज्यांच्या लेखणींतून स्रवलेल्या शाईच्या थेंबागणिक अनाथ अबलांच्या अश्रूंचे थेंब वाहिले, आणि निरपराध जीवांच्या रक्ताच्या धारा उडाल्या, त्यांची परंपरा चालविण्याच्या मोहांत मी सांपडलों नाहीं ना? या द्रवाचें सिंचन करून मी जगांतील सात्त्विक-ताच वाढविणार आहे ना? शुद्ध, ओजस्वी आचारविचारांचें पीक ज्यांनीं आपल्या लेखांतून अव्याहत काढलें, त्या पुण्यवंतांच्या मेळाव्या-बरोबरच मी चाललों आहें ना? भयभीतांचा धीर सांवरणारा, दुःखितांचे अश्रु थांबविणारा आणि मूढांना मार्ग दाखविणारा संदेश

ज्यांच्या ग्रंथांत मिळतो त्यांचीच सोबत या लेखनमार्गावर मीं घेतली आहे ना ?

या विचारमालिकेंत मी गुंतल्यामुळें माझ्या हाताकडे माझें लक्ष राहिलें नाहीं, व बाटली वाकडी होऊन शाईची मोठी थोरली धार माझ्या शुभ्र कपड्यांवर पडली. मला एकदम रागाची तिडीक आली व माझ्या वस्त्रांस कलंक लावणाऱ्या या द्रवाच्या अपकाराची चांगली परतफेड करावी असें क्षणभर वाटलें. ती कशी करणार ? पण त्या-वरून चट्कन् असा विचार मनांत आला कीं, मानवी संस्कृतीला कलंक फासण्याचा विचार ज्या लेखकाला प्रथम सुचला त्याचीं वस्त्रें अशींच कलंकित करण्याचा उपमर्द शाईनें केला असला पाहिजे; व शाईवर सूड घेण्याच्या हेतूनेंच त्यानें तिला 'कृष्णकार्यांकडेच लोक तुझा अधिक उपयोग करतील' असा शाप दिला असला पाहिजे. किंवा असेंहि असेल कीं, संसाराच्या कष्टमय मार्गावर प्रकाश पडावा म्हणून ज्ञानवंतांनीं आपल्या नरदेहाच्या वाती पेटवून जे दिवे लावले त्यांच्या काजळीपासून जो द्रव तयार झाला, आणि कोणी अधम मतिमंदांनीं त्याचा कितीही दुरुपयोग केला तरी, अखेर ज्या पुण्या-ईच्या आधारावर विश्वाचें पालनपोषण चाललें आहे ती वाढविण्या-कडेच त्याचा अधिक विनियोग होणार यांत संशय नाहीं !

**अभ्यास**—(१) सुधा आणि हलाहल एकाच कोठयांत सांठवि-णारा द्रवपदार्थ असें शाईबद्दल लेखक कोणत्या उदाहरणांनीं म्हणतो ? (२) शाईच्या वापरासाठीं सर्वांना मोकळीक असावी याबद्दल लेखकाला आश्चर्य कां वाटतें ? (३) शाईनें कागदावर लिहिण्या-पूर्वी प्रत्येक लेखकाचे मनांत कोणते विचार यावयास हवेत ? (४) शाईच्या द्रवाच्या उत्पत्तीबद्दल कोणती कल्पना लेखकानें मांडली आहे, आणि शाईच्या एकंदर वापराबद्दल लेखकाला कोणता विश्वास वाटतो ?

# मित्र

परिचय—जगांत 'मित्र' या संज्ञेचा वापर अनेक अर्थानें होत असतो. पण खऱ्या मैत्रीची व्याख्या कोणती? मैत्री सहवासावर अवलंबून असते काय? मित्रानें केवळ प्रशंसा करीत राहिलें पाहिजे काय? 'मैत्री' या शब्दांत आणखी इतर महत्त्वाचा अर्थ सामावलेला आहे काय आणि तो कोणता? येवढें मात्र खरें कीं खरी मैत्री अति दुर्मिळ असते आणि ती ज्यांना मिळेल ते अत्यंत भाग्यवान होत.

या जगांत बहुतेक प्रत्येकजण पुरेसा पैसा जवळ नाहीं म्हणून, किंवा पुरेसा कपडालत्ता नाहीं म्हणून, किंवा पुरेसे ग्रंथ वाचावयास मिळत नाहींत म्हणून तक्रार करीत असतो; पण पुरेसे मित्र मिळत नाहींत म्हणून दुःखीकष्टी झालेला एक तरी माणूस दिसतो कां? अमुक इतकी संपत्ति आपल्याला सांठविली पाहिजे अशी महत्त्वाकांक्षा प्रत्येक मनुष्यानें मनाशीं ठरविलेली असते; व तेवढी संपत्ति जोंपर्यंत मिळाली नाहीं तोंपर्यंत त्याचा जीव सुखी नसतो. पण असें कोणी कधीं मनाशीं म्हटलें आहे कां, कीं मला पांच मित्र जोडलेच पाहिजेत, आणि ते जोंपर्यंत मला लाभले नाहींत तोंपर्यंत मला हें जीवित नीरसच वाटेल! आपल्याला दोन मित्र असले काय, आणि कांहीं प्रसंगामुळें त्या दोहोंचे दहा झाले काय, आपण सारख्याच

संतुष्ट वृत्तींत असतो. मित्र वाढले त्या मानानें आयुष्याची रमणीयता वाढली असें होत नाहीं. दोनच मित्र असले तरी कोणी असें हळहळत नाहीं, कीं 'केवढें हें माझें दुर्भाग्य! परमेश्वरा, मला आणखी स्नेह्यांचा लाभ होणार नाहीं काय?' आणि ज्याला दहा स्नेही आहेत तोही कधीं अशा मिजासींत नसतो, कीं दुनियेला जें लाभलें नाहीं तें मला लाभलें आहे. मित्रांची संख्या फुगली काय किंवा रोडावली काय, आपलें सुखदुःख असतें तेवढेंच असतें. आहेत तेवढ्या मित्रांवर प्रत्येकजण संतुष्ट आहे.

किती विचित्र हें!

पण याचें कारण असें कीं, मित्र या शब्दांतील खरें मर्म फारच थोड्या लोकांच्या अनुभवाला आलेलें असतें. बहुतेक लोक खऱ्या मैत्रीच्या प्रत्ययाला मुकलेले असतात; व प्रत्ययावांचून मित्र हा शब्द ढिलेपणानें सरसहा वापरीत असतात. एखाद्याचा अधिक सहवास झाला, कीं लगेच त्याचा मित्र म्हणून उल्लेख करण्यांत येतो. जणूं काय मैत्री हें सहवासाच्या वेलीला हमखास येणारें फळच आहे! खरें पाहतां सहवास व मैत्री यांच्यांत अन्योन्याश्रय फारच थोडा आहे. वाढत्या सहवासाबरोबर मित्रभाव परिपक्व व मधुर होत जातो यांत संशय नाहीं. परंतु सहवास वाढला कीं, त्या मानानें स्नेह उत्पन्न झालाच पाहिजे असें समजणें म्हणजे, जाईची वेल मांडवावर पोंचण्याइतकी वाढली, कीं तिला बहर आलाच पाहिजे असें म्हणण्यासारखें आहे. पुष्कळदां वेल मांडवभर पसरली तरी फुलत नाहीं, तद्वत् वर्षानुवर्ष सहवास घडूनहि खरा मित्रभाव उद्भवत

नाहीं, आणि नुसत्या सहवासालाच लोक मैत्री समजत असतात. पण किती भ्रामक समजूत आहे ही !

ज्यांनीं वीस–पंचवीस वर्षें एकाच कचेरींत शेजारशेजारच्या टेबलांवर कारकुनी केली, अशा दोन माणसांत गाढ मैत्री आहे असें निश्चयानें म्हणतां येईल काय? इतका वर्षानुवर्षाचा सहवास घडूनहि त्या दोन व्यक्तींत परस्पर आकर्षण व सहानुभूति उद्भवली नसण्याचाच संभव अधिक नसतो काय? तसें कशाला, ज्यांचें व आपलें लहानपण एकाच ठिकाणीं गेलें, ज्यांच्याशीं मिळूनमिसळून खेळतां खेळतां आपण लहानाचे मोठे झालों, आणि जे व आपण एकाच शाळेंत शिकलोंसवरलों, त्यांना आपण बालमित्र म्हणतों; व जगाची अशी समजूत असतें कीं बालमित्र म्हटला कीं, तेथें मित्रत्वाची पराकाष्ठा झाली. या कल्पनेनें बालमित्र किंवा लंगोटीमित्र ही अगदीं जिव्हाळ्याची संज्ञा समजली जाते. पण बालमित्रांशीं हा जिव्हाळा खरोखरच असतो काय? मोठेपणीं बालमित्र एके ठिकाणीं आले कीं, एकमेकांना अरे जारे अशा एकेरी नांवानें संबोधून बोलतात हें खरें; व ज्यांच्याशीं सारे लोक मोठ्या अदबीनें वागतात अशा मोठ्या माणसांना कोणी अरे जारे म्हटलेलें ऐकलें कीं, तिऱ्हाईत माणसांना तो एक विशेष कौतुकाचा प्रकार वाटतो हेंहि खरें पण यापलीकडे बालमित्रांचें परस्परांशीं जें वर्तन होतें त्यांत कांहीं माधुर्य असतें काय?

तें नसणेंच निसर्गसिद्ध आहे. बाळपणीं जे एकत्र खेळलेसवरले त्यांनीं अगदीं भिन्न मार्गांनीं आयुष्याचें आक्रमण केलेलें असतें,

त्यांच्या ठिकाणीं परस्परविरुद्ध आवडीनिवडी उत्पन्न झालेल्या असतात, त्यांचीं अंतःकरणें भिन्नभिन्न नाजूक बंधनांत सांपडलेलीं असतात! एखाद्या दरींत ध्वनीचा प्रतिध्वनि घोंटाळत राहावा त्याप्रमाणें त्यांच्या बालपणांतील सहवासाची आठवण तेवढी रेंगाळत राहिलेली असते, व त्या स्मृतीबद्दलची निष्ठा दाखविण्याच्या आविर्भावानेंच ते एक-मेकांला एकेरी रीतीनें संबोधतात! वर्षाकाळीं जेथून पाण्याचे ओहोळ वाहिले त्या खडकावर पुढें फक्त एक रेघ उमटलेली दिसत राहावी, त्याप्रमाणेंच आपलें आपल्या बालमित्रांशीं होणारें सलगीचें वर्तन असतें. तें दिसावयास सलगीचें दिसतें, पण त्यांत खऱ्या मित्रभावाचा मागमूसहि नसतो. बालमित्रांविषयीं जो आपण आत्म-भाव दाखवितों त्यांत केवळ एक रूढि पाळण्यापलीकडे आपली बुद्धि क्वचितच असते. सारांश, सहवास आणि मैत्री यांचा निश्चित कार्यकारणभाव मानतां येणार नाहीं. मैत्री ही स्फुलिंगासारखी आहे. ती केव्हां प्रकट होईल तें सांगतां येत नाहीं. कित्येक वर्षांच्या सह-वासांत ती अप्रकट राहील. अत्यल्प सहवास घडलेला असूनहि ती प्रकट होऊन दोन अंतःकरणें प्रदीप्त करील.

सहवासालाच मित्रभाव समजण्यांत जशी लोकांची चूक होते तशीच त्यांची दुसरी एक चूक होत असते. मित्र म्हटला, कीं तो सदैव आपली प्रशंसा करणाराच असला पाहिजे अशी सामान्य कल्पना असते. पण मैत्री म्हणजे प्रशंसेचा निरंतर झरा समजणें कितपत बरोबर आहे? माणसाला प्रशंसाच हवी असली तर ती मिळविणें कांहीं कठीण नाहीं. चार पैसे टाकून प्रशंसा बाजारांत खरेदी करितां येत नाहीं हें खरें; पण रुपेरी चाबकानें कोणतेंही घोडें

वळणीवर येतें, या न्यायाला प्रशंसा कांहीं अपवाद नाहीं. चार पैसे आपल्याजवळ असले तर प्रशंसक भोंवतालीं सहज जमतात. पैसा, सत्ता, कला, असल्या बळावर स्तुतिपाठकांचा वाटेल तेवढा तांडा जमा करतां येतो. धनिकांभोंवतीं, राजाभोंवतीं किंवा कीर्तिसंपन्न झालेल्या नटाभोंवतीं खुषमस्करे किती असतात पाहा! पण हे खुष-मस्करे म्हणजे त्यांचे मित्र का म्हणावयाचे? ते सारखे मधुर भाषण करीत असतात. मधाच्या पोळ्यांतून थेंब गाळावे त्याप्रमाणें त्यांच्या शब्दांतून प्रशंसा गळत असते. पण मधुप्रलापी सहस्त्र प्रशंसकांच्या गराड्यांत वावरणारा राजा, धनिक किंवा नट खऱ्या मित्रभावाचे एखादें तरी शीतळ स्थान आपल्याला मिळेल का म्हणून जेव्हां पाहतो, तेव्हां त्याला सारें जग तप्त, रूक्ष अरण्याप्रमाणेंच बहुत-करून भासतें.

प्रशंसा व मित्रभाव या भिन्न गोष्टी आहेत. योग्य वेळीं खरा मित्र प्रशंसा करील हें सांगावयासच नको; आणि खऱ्या मित्रा-कडून मिळालेल्या प्रशंसेच्या शब्दाचीच काय, पण नुसत्या दृष्टि-क्षेपाची सर दुसऱ्या कसल्याहि पारितोषकाला येणें शक्य नाहीं हेंहि खास. परंतु कारण नसतांना प्रशंसा करणें हा खऱ्या मित्राचा धर्मच नव्हे. वीणेच्या तारांवरून केव्हांहि बोट फिरविलें तरी त्यांतून आपल्याला आल्हाद देणारा मधुर नादच निघतो. पण खऱ्या मित्राच्या हृदयाच्या तारा अशा नसतात. आपण सत्कृत्य केलें तर त्या तारांतून गौरवाचे गोड शब्द निघतील; पण आपण चुकत असलों तर अनुशासनाचा गंभीर शब्द त्यांतून निघाल्याखेरीज राहणार नाहीं. सदासर्वदा नम्र भाषणांनीं रिझविणें हें मित्राचें कार्य

नाहीं. आपलें चुकतें पाऊल जो फिरवतो आणि जाणारा तोल जो सावरतो तोच आपला खरा मित्र होय. मित्र म्हणजे केवळ आपल्या जीविताचे अलंकार नव्हेत; आपल्या जीवितप्रवाहाला योग्य वळण देणारे ते तट आहेत. काजव्यांचे थवेच्या थवे जर आपल्याला दिसले तर त्याची शोभा मोठी रमणीय वाटल्यावांचून राहात नाहीं. पण त्या शोभेचा उपभोग घेण्यासाठीं आपल्याला अंधकारांत राहावें लागतें. आपल्याला वाममार्गाच्या अंधारांत टाकून केवळ आपल्याला क्षणभर सौख्य देणाऱ्या या काजव्यांप्रमाणें खरे मित्र नसतात. खरा मित्र सूर्यासारखा असतो. त्याच्या सान्निध्यांत असतांना पूर्ण प्रकाशांत असल्याचा भरंवसा आपल्या मनाला वाटत असतो, व त्याच्या साक्षीनें वावगें कृत्य करण्याची आपल्याला शरमच वाटते. म्हणूनच सूर्याला मित्र म्हणतात कीं काय कोण जाणे ! त्या त्या प्रसंगीं सुमधुर प्रशंसा, धीर गंभीर शब्द, प्रेमळ उत्तेजन, सहानुभूतिमय सांत्वन, आणि कठोर उपदेशवाणी ज्याच्याकडून लाभते तोच खरा मित्र होय. आपल्याला सुखाविण्याच्या वेळीं तो कुसुमाहून मृदु असतो, आणि आपल्याला जागृत ठेवण्याच्या वेळीं तो वज्राहून कठिण होतो.

आणि असें आहे यांत नवल नाहीं. कारण सारी खरी प्रीति याच स्वरूपाची आहे. यांत मित्रभाव हा एक प्रीतीचाच प्रकार होय. इतकेंच नव्हे तर वैषयिक सुखाव्यतिरिक्त मित्रभावाचा विलास होत असल्यामुळें त्याला शुद्ध प्रीतीचें एक उत्कृष्ट स्वरूपच म्हटलें पाहिजे. मात्र अशा या शुद्ध प्रीतीचा अनुभव सगळ्यांनाच मिळतो असें नाहीं. खरे मित्र शोधून काढूं म्हटल्यानें सांपडत नाहींत, किंवा अमक्या रीतीनें त्यांची वाट पाहात राहिलें कीं ते आपल्याला येऊन

भेटतात असेंहि नाहीं. मृगोदरांतील कस्तुरीसारखाच त्यांचा वास असतो, पण तितकेच ते दुर्मिळ असतात. आपल्या उत्कट प्रीतीचा बाण अचूक लागून ते केव्हां मिळतील तेव्हां मिळतील ! ते ज्यांना मिळतात त्यांचें भाग्य अलौकिक समजावें ! मात्र त्यांचा लाभ आपल्यालाहि घडेल या आशेंत आपल्यापैकीं प्रत्येकानें कां नसावें ? समुद्रांत शिंपल्यांनीं सदा आशेनें उन्मीलित असावें हें बरें. कारण स्वातीच्या जलधारा केव्हां पडतील आणि ते जलबिंदु शिंपल्यांत शिरून त्यांचीं मौक्तिकें केव्हां होतील याचा काय नियम ?

**अभ्यास**—(१) मित्रांच्या संख्येवर माणसाचें सुखदुःख अवलंबून असतें कां ? (२) मैत्री आणि सहवास या गोष्टी एकमेकांवर अवलंबून असतात काय ? (३) मैत्री ही प्रशंसेवर अवलंबून असते काय ? (४) खऱ्या मैत्रीचें स्वरूप कसें असतें ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७३८८

दुसरी पार्श्वभूमीच शोभत नाहींसें कवींनीं ठरवून ठेविलें आहे. वल्लभ-रमणीच्या कूजित संगीताला वसंताच्याच तराफीच्या तारा वाजल्या पाहिजेत हा त्यांचा हट्ट !

संस्कृत व मराठी ललितवाङ्मय पाहिलें तर वसंतऋतूच्या शोभेचीं स्तुतिस्तोत्रें खंडीभर निघतील ! पण इतर ऋतूंच्या शोभेच्या वेळीं कवींची जशी कांहीं दांतखीळ बसते ! 'ऋतुसंहारां'त वसंताचें वर्णन केवढ्या वक्तृत्वानें कवीनें केलें आहे पाहा ! इतर ऋतूंच्या वेळीं मात्र त्यानें आपल्या काव्याचे फवारे मोठ्या मिनतवारीनें धारेला उभ्या राहणाऱ्या नाठाळ गाईसारखे सोडले आहेत !

खरें पाहतां इतर ऋतूहि रमणीयतेच्या बाबतींत वसंताइतकेच सरस ठरतील. वर्षाऋतुच पाहा. त्याची नानाविध शोभा काय कमी बहारीची असते ?

मला स्वतःला तर पावसाळ्यांतली पहिली पावसाची सर म्हणजे मूर्तिमंत काव्य वाटतें. मृग नक्षत्राच्या त्या पहिल्या पावसाचें सौंदर्य वर्णावें तेवढें थोडेंच होईल. नीच प्रकृतीच्या मंत्रिमंडळाची चिथावणी मिळाली, कीं ज्याप्रमाणें एखाद्या जुलमी राजाच्या छळाला भर यावा त्याप्रमाणें ग्रीष्मांतल्या चंडांशूचा ताप साऱ्या सृष्टीला असह्य झालेला असतो, व सृष्टीचा जीवनरसाचा सांठा संपत आलेला असतो. संत्रस्त प्रजेनें एखाद्या उद्धारक महात्म्याची वाट पाहावी तद्वत् सारी सृष्टि जलधारांसाठीं आ वासून बसलेली असते. आईच्या सहवासाला फार दिवस अंतरल्यावर बालकाचें तोंड सुकावें तद्वत् वृक्षशाखांवरचीं चिमुकलीं पानें म्लान आणि दीन दिसत असतात. सौभाग्यचिन्हांनीं

भरलेला असला तरच सुंदर दिसणारा सुवासिनीचा हात त्यावांचून रिकामा आणि अशुभ वाटावा तशी नदीच्या पात्राची अवस्था झालेली असते. राजमार्गांतून आणि मातीच्या ढेकळांनीं विखुरलेल्या शेता-भातांतून वाफा निघत असतात त्या जणूं काय जलवृष्टीसाठीं धरणीनें केलेल्या आर्तस्वरांतल्या प्रार्थनाच वाटत असतात !

आणि अशा वेळीं वर्षाऋतूंतील पहिला पाऊस आला, कीं तो क्षणांत केवढी क्रांति करून टाकतो ! वृक्षांचीं पानें एकदम टवटवीत होतात, मैदानावरची सुकलेली हिरवळ एकदम तेजस्वी दिसूं लागते, भूभागावरची खेदाची व उदासपणाची धूळ दाबली जाऊन तेथें ताजेपणा उत्पन्न होतो, आणि दशदिशांत एक प्रकारचें मांगल्य भरल्यासारखें वाटूं लागतें. मी तर पहिल्या पावसाच्या मंगल घटकेची प्रतिवर्षी चातकाइतक्याच उत्कंठेनें वाट पाहात असतों. भूगर्भांत अनंत चमत्कार आहेत यांत संशयच नाहीं; परंतु विलासमंदिरांतलीं सारीं अत्तरें ज्यापुढें कवडीमोल ठरतील अशा सुगंधाचा जो चमत्कार वर्षाकालाच्या पहिल्या धारांच्या स्पर्शाबरोबर भूगर्भांतून बाहेर पडतो त्याचें वर्णन कोणाची लेखणी करूं शकेल ? मी कॉलेजांत इंटरमीजि-एटच्या वर्गांत होतों व ' सप्तपदार्थी ' शिकत होतों तेव्हां ' पृथिवी गंधवती ' हें लक्षण मला कित्येक दिवस कळलें नव्हतें. पण त्या वर्षी पडलेल्या मृगाच्या पहिल्या पावसानें तें माझ्या मनावर सहज आणि पक्कें बिंबविलें !

जलधारांच्या पहिल्या घुटक्याबरोबर हवेंत दरवळणाऱ्या त्या मृत्तिकागंधाला स्तनपान करतांच मस्त आनंदानें चळवळणाऱ्या बाल-काच्या निःश्वासाचीच उपमा साजेल ! त्या निःश्वासाइतकाच तो गंध

पवित्र व आल्हादकारक वाटतो. मृग नक्षत्रांतील ती पाहिली सर कोसळते व तो अनुपमेय गंध भूपृष्ठांतून उठतो त्या वेळीं लहानमोठ्या पक्ष्यांची फडफड व चिवचिव होते ती तरी किती गोड असते ! व जीर्ण तृणांकुर कुरतडून शिणलेली गाईवासरें अंगें भिजतांच हंबरतात तीं तरी किती गोड !

पावसाचे प्रकार अनेक आहेत, व त्या प्रत्येकाची मौज वेगवेगळी आहे. उगीच चार शिंतोडे पडावेत, त्या टपोऱ्या थेंबांचा घरांच्या कौलांवर व पत्र्यांवर तडतड आवाज व्हावा व एकदम गप्प व्हावें, आणि पाऊस पडला कीं पडल्याचा नुसता भास झाला हें पाहावयाचें झालें तर रस्त्यावरच्या भिजट धुळीचीच साक्ष घ्यावयाची वेळ यावी, असा प्रकार कित्येक वेळां होतो. लहान मुलांच्या हसण्याखिदळण्यांत व रडण्यांत जो अचानकपणा आणि अनिश्चय असतो त्याचीच नक्कल असला पाऊस करीत असतो. ही वळिवाची सर शहरापेक्षां खेड्यापाड्यांत मोकळ्या मैदानावर बघावयाची खरी मजा ! तेथें दृष्टीच्या टप्प्यांत खूप विस्तीर्ण प्रदेश येत असल्यामुळें मैल दीड मैल अंतरावर पडणारा पाऊसहि स्पष्ट दिसतो; आणि भूगोल व खगोल सांधणारा तो अजस्र कृष्णवर्ण जलस्तंभ वेगानें आपल्याकडे सरकत येतांना व आपल्याला भिजवून पलीकडे दुसऱ्या क्षितिजापर्यंत धांवून अदृश्य होतांना दिसला, कीं बाह्यांगाप्रमाणें अंतरंगहि आनंदानें न्हाऊन निघतें. एखाद्या बागवानानें हातांत झारी घेऊन ती झरदिशीं हिरवळीवर फिरवावी तद्वत् वरुणानें गमतीनें पाण्याचा फवारा फिरविल्यासारखें अशा वेळीं वाटतें. असली वळिवाची सर पडते ती बहुधा तिसऱ्या प्रहरीं किंवा संध्याकाळीं पडते; आणि कित्येक वेळां

सूर्यप्रकाश यत्किंचितहि न मंदावतां व आकाशांत मेघपटल न दिसतां न कळत कोठून तरी वर्षाव व्हावा अशी ती सर येते. ऐन सूर्यप्रकाशांत पडणाऱ्या असल्या पावसाला ग्राम्य भाषेंत 'नागवा पाऊस' म्हणतात, नव्हे ? हें वर्णन ग्राम्य असलें तरी अत्यंत समर्पक समजलें पाहिजे. सहस्त्राक्षी सूर्यासारख्या परपुरुषाची भेदक तिरपी नजर सहन करून मेघपटलाचा नेहमींचा आडपडदाहि न ठेवतां जलदेवतेनें खुशाल भूपृष्ठावर नाचावें हा प्रकार कुलस्त्रीस जरा न शोभण्यासारखाच नव्हे काय ?

पावसाच्या या प्रकाराच्या अगदीं उलट असा दुसरा एक प्रकार आहे. एखादे वेळीं आकाशांत अभ्रांचा सारखा दाट थर दिल्यासारखा दिसतो. रमणीवर रुसलेल्या वल्लभाप्रमाणें सूर्य जणूं कोठें कोपऱ्यांत दूर बसलेला असतो, भरदुपारचा प्रहर असला तरी तिन्हीसाजांचा भास होत असतो, आणि इतकी सारी तयारी होऊनहि पाऊस मात्र पडत असतो तो तांदळाचें पीठ वाऱ्यावर उडावें व पडावें तसा. पावसाची ही भुरभुर घटकाभर खुशाल अंगावर घेतली तरी अंग भिजावयाची भीति नसते. घरांत बसलेल्या माणसाला तर असल्या पावसाची दादहि लागण्याचा संभव नसतो. छपरावर किंवा पत्र्यावरहि याचा शब्द होत नाहीं. मांजराचीं अलगद पावलें कधीं चाहूल देत नाहींत म्हणतात. तितकीच निःशब्द याची चाहूल असते. हा लबाड, चोरट्या चालीचा पाऊस विनोदनिर्मितीचें उत्कृष्ट उदाहरण म्हणून समजावयास हरकत नाहीं. कारण याच्या तयारीचें अवडंबर पाहावें तों ऐन प्रलयपर्जन्याला शोभेल असे; पण प्रत्यक्ष अवतार पाहावा तो जसा कांहीं सुदामदेवानें आपल्या पुरचुंडींतले

पोहे फुंकरून श्रीकृष्णाच्या हातावर ठेवले त्या वेळीं उडालेला कोंडाच !

मात्र, या हास्यरसानुकूल पावसांतहि सौंदर्य शोधल्यास दिसण्यासारखें असतें. त्याची अलगद चालच काय कमी आल्हादकारी आहे ? नाचाच्या वेळीं नर्तकीच्या पावलांतली मृदुता आपल्याला मोहित करते. गालिचावर सुकुमार पारिजात फुलें पसरून तीं न दुखवितां नृत्य करणाऱ्या नर्तकींच्या नवलकथा आपण ऐकल्या, कीं त्या आपल्याला कौतुकाच्या वाटतात. मग जलदेवतेच्या चरणपाताची सुकुमारता आपल्याला तितकीच सुभग आणि कौतुकास्पद कां वाटूं नये ? या विरळ, हलक्या पावसाकडे मी कितीदां तरी सारखा पाहात राहतों; आणि त्याकडे सारखें पाहात राहिलें, कीं आकाशांतून जणू काय मऊ काळसर रेशमाचे तंतु सारखे खालीं सुटून कोणा खोडकर मुलानें फुंकर घातल्यामुळें तसेच अधांतरीं तरंगत राहिले असावेत असा भास झाल्यावांचून राहात नाहीं !

पावसाचे असे किती मनोहर प्रकार सांगावेत ? पहिलीं नक्षत्रें भरपूर पडून सारी सृष्टि फलपुष्पांच्या वैभवानें भरघोस नटलीं म्हणजे तिच्या भेटीला येऊन तिला मनसोक्त आलिंगन देणाऱ्या पावसाचा थाट तर एकमेवाद्वितीयच म्हटला पाहिजे. अशा पावसाच्या वेळीं आगगाडींतून प्रवास करावा, किंवा त्याच्या काव्याचा खरा आस्वाद घ्यावयाचा असेल तर माथेरानच्या टेकडीची वाट चढावी. पुण्याहून मुंबईस जाणाऱ्या लोकांचा या दिवसांत मला किती हेवा वाटतो ! पावसाची सारखी झड लागलेली असली म्हणजे खिडकीबाहेर तोंड

काढायची सोय नसते; पण बाहेरचें सौंदर्य डोळे भरून पाहिल्यावांचून जिवाला राहवत नाहीं. पुणें सोडल्यापासून तों निसर्गाचा कोंडमारा करणाऱ्या मुंबईची सीमा येईपर्यंत वर्षाऋतूचीं नानाविध सुंदर स्वरूपें दृग्गोचर होत असतात. तळेगांवच्या पुढें गाडी सरकल्यापासून चहूंबाजूंचा स्नानमग्न रम्य वन्य प्रदेश आणि त्या प्रदेशाच्या सीमेवर इमानी पहारेकऱ्यासारखे भरवृष्टींतहि स्थिर राहिलेले डोंगर दिसूं लागतात. घाटमाथ्यावर पोंचतांच पर्जन्य व वायु यांची सृष्टिदेवीचें प्रियाराधन करण्यासाठीं चाललेली चढाओढ पाहण्यांतच गुंतलेले तटस्थ गिरिराज किंचित् भुवया वक्र करून आपल्या कन्येच्या लग्नाचा सोहळा हसतमुखानें पाहणाऱ्या पित्यासारखे वाटतात. घाटांत तर वर्षाऋतूची ऐन जवानी गर्जना करीत कड्याकड्यांवरून कोसळतांना दिसते; आणि कर्जतपासून कल्याणपर्यंतच्या सपाट भूमिभागावर गुडघाभर पाण्यांत बुडून वर डोकें करून वाकुल्या दाखविणारे भाताचे लोंगर, वय झालें तरी रसिक वृत्तीनें उत्सवप्रसंगीं माना डोलविणाऱ्या वृद्धांप्रमाणें वाटणारे उंच उंच तालवृक्ष, आणि प्रेमवेड्या आईनें हृदयाशीं क्षणमात्र धरून पुन्हां खेळायला सोडलेल्या खेळकर मुलांप्रमाणें खळखळणारे लहान मोठे जलौघ, असल्या हृदयंगम दृश्यांची जिकडे पाहावें तिकडे गर्दी उसळलेली दिसते !

मात्र, सौंदर्याचा हा पर्वकाल पाहावयास मिळेल अशा आशेनें प्रवासास निघावें तों एखादे वेळीं पाऊस अजिबात उघडतो, आणि जबर निराशेचा तडाका मुकाट्यानें सहन करावा लागतो. जलदेवतेच्या अंगीं स्त्रीस्वभावांतला लहरीपणा अगदीं पुरा उतरलेला आहे

हें अशा वेळीं पटतें. परंतु कधीं मधुर वचनांची वृष्टि करणाऱ्या तर कधीं उगीचच रुसल्याचें मनोहर सोंग करून अबोला धरणाऱ्या स्त्रीसारखी जलदेवता आहे म्हणूनच तिच्या वागण्यांत काव्य आहेसें वाटतें. पाऊस कधीं कोसळेल याचा नियम नसतो हें खरें; पण म्हणूनच त्यांत गंमत आहे. अनिश्चिति हा काव्यप्रसंगाचा आत्मा नाहीं काय?

पावसाच्या या अनिश्चितपणावरून आठवण झाली. पाऊस अनिश्चित असतो म्हणून किती गंमती होतात पाहा. मी कॉलेजांत होतों तेव्हां क्रिकेटच्या मोठमोठ्या मॅचेस भर पावसाळ्यांत असावयाच्या. एखादी सुंदर मॅच ठरलेली असावयाची, आणि त्या दिवशीं सकाळीं उठून पाहावें तो वरुणानें भले मोठे मोठे जलकुंभ आकाशांत हारीनें मांडून ठेवलेले दिसावयाचे! छे, छे! हा चांडाळ पाऊस आजचा क्रीडामहोत्सव पार बिघडविणार अशी भीति वाटावयाची. मग मन सारखी प्रार्थना करीत सुटावयाचें कीं, वरुणदेवा, दोन दिवस जरा कृपा कर आणि मग काय दंगा उडवावयाचा असेल तो उडव. अरे, केवढी मोठी आजची मॅच आहे! आज नायडू, देवधर, विठ्ठल आपलीं आयुधें सरसावून येतील आणि पारशी गोलंदाजांच्या कुंदुकांचीं मस्तकें तडातड उडवतील. तो समरप्रसंग जरा पाहूं दे आम्हांला! तुला कसा रे असा सुंदर खेळ पाहावयाचा अगदीं नाद नाहीं? इंद्राच्या दरबारांत क्रिकेटची आवड उत्पन्न होणार तरी कधीं?

आणि काय आश्चर्य! एखादे वेळीं ही आमची प्रार्थना मान्य व्हावयाची! खरोखरच आकाशांतल्या त्या अजस्र मेघांच्या सिंहासना-

वर बसून वरुणदेव मोठ्या कौतुकानें जणूं काय आमची मॅच पाहात बसायचा, आणि वृष्टि करायचें भानच त्याला उरायचें नाहीं!

पावसाच्या रसिकतेचें हें उदाहरण कवींची खात्री पटायला वास्तविक पुरेसें आहे. कवींचा लाडका वसंत रसिक खराच; पण वर्षाऋतु कांहीं कमी रंगेल नाहीं. आणि इतकें सांगूनहि कवींना हट्ट सोडावासा वाटत नसेल तर मी विचारतों, अहो, वसंतसेनेच्या आलिंगनाचें परमसौख्य चारुदत्तास अकल्पित मिळवून देणारा, आणि "तेचि पुरुष दैवाचे' असे धन्योद्गार त्या महाभागाच्या तोंडून वदविणारा आमचा वर्षाऋतुच ना?

**अभ्यास**--(१) लेखकानें कवींबद्दल कोणत्या मुद्द्यावर व काय तक्रार केली आहे? (२) ग्रीष्मऋतूच्या तापाचें व पहिल्या पावसाच्या सौंदर्याचें काव्यमय वर्णन लेखकानें कोणत्या शब्दांत केलें आहे? (३) लेखकाच्या मतानें पावसाचे निरनिराळे प्रकार कोणते व त्यांचीं लक्षणें कोणतीं? (४) पावसाच्या सौंदर्याचीं व रसिकतेचीं कोणकोणतीं उदाहरणें लेखकानें दिलीं आहेत?

**परिचय**—वक्तशीरपणा ही जीवनाची एक शिस्त असली तरी तिचा अतिरेक कांहीं चांगला नव्हे ! घड्याळाची निर्मिति ही मानवानें आपल्या सोयीसाठीं केली आहे, त्याचे गुलाम होऊन राहण्यासाठीं नव्हे ! वेळेच्या बंधनाशिवाय जीवन म्हणजेच खरी-खुरी विश्रांति. अशी ही विश्रांति प्रत्येकाला जरूर लागतेच लागते. तसेंच वेळेचीं बंधनें सदोदित पाळणें हेंहि ठीक नव्हे. कोठल्या तरी गोष्टींच्या वेडांत वेळेचा विसर पडणें हेंच जीवनांतल्या गमतीचें लक्षण आहे. शिवाय काळवेळेचें बंधन न बाळगतां ज्यांनीं आपल्या कार्यांत लक्ष घातलें असेच लोक कांहीं लोकोत्तर कार्य करून गेले.

सकाळीं साडेनवाचा सुमार होता. ट्रॅमची वाट पाहात मी गिर-गांवच्या नाक्यावर उभा होतों. उभा होतों म्हणजे ट्रॅम येत नव्हती म्हणून नव्हे. एकेक, दोनदोन मिनिटांच्या अंतरानं एकामागून एक ट्रॅमगाड्या येत होत्या; पण त्या साऱ्या माणसांनीं खचून भरलेल्या. प्रत्येक गाडी येई ती उगीच शपथेला उभी राही. ' जगा नहीं, दूसरे गाडीसे आव ' असें कंडक्टर ओरडे, ठण्ठण् असा घंटेचा आवाज होई आणि गाडी पुढें चालूं लागे. ज्यांना वाट पाहायला फुरसत नव्हती असे लोक कंडक्टरच्या त्या इशाऱ्याला न जुमानतां तसेच

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम.................... वि: ....................
क्रमांक.................... नों: दि: ....................


गाडींत चढत अन् आंत प्रवेश करून उभे राहात किंवा बाहेरच्या बाजूला लोंबकळूं लागत. मला घाई नव्हती, त्यामुळं कसरतीचा तो अवघड प्रयोग करून पाहण्याचं मला कारण नव्हतं. ज्या गोष्टीला लोक भितात तिचं खरं निरुपद्रवी स्वरूप माहीत असणाऱ्या माणसाला इतरांची भीति मनोरंजक वाटते, तद्वत् मला स्वतःला कसलीच घाई नसल्यामुळं इतरांची घाई पाहण्यांत मला गंमत वाटत होती. मी सभोवार पाहिलं तों सगळीकडे धांवपळ चाललेली होती. सायकली, व्हिक्टोरिया, मोटारी आणि ट्रॅमगाडया अशीं सर्व प्रकारचीं वाहनं एखाद्या शर्यतींत सुटल्याप्रमाणं धांवत होतीं. ज्याला त्याला कुठेंतरी वेळेवर पोंचायचं होतं. ट्रॅमची वाट पाहात कोपऱ्यावर उभ्या राहिलेल्या प्रत्येक माणसाची नजर आपापल्या मनगटावरच्या किंवा आजूबाजूच्या दुकानांतल्या घड्याळाकडे पुनःपुन्हा वळत होती. साऱ्या घडयाळांचे काटे पांच मिनिटं जागच्या जागीं थांबतील असं आश्वासन कोणीं त्या लोकांना दिलं असतं तर त्यांनीं त्या महात्म्याच्या नांवाचा जयजयकार खचित केला असता. पण तसं कुठलं व्हायला ? उलट साऱ्या घडयाळांचे काटे आपल्या ठराविक गतीनं पुढें पुढें सरकत होते. सारीं घडयाळं जणूं एक प्रकारचा निःशब्द गजर करून त्या लोकांना सांगत होतीं, 'उशीर होत चालला. पाहतां काय ? पळा.' आणि तें ऐकतांच लोकांची धांवपळ सुरू होत होती अन् गर्दीनं खचलेल्या ट्रॅमगाडीवर ते खुशाल चालून जात होते. कंडक्टरचा हुकूम मानायची त्यांची तयारी नव्हती. 'थांबू नका, धांवा, पळा !" असा घडयाळांकडून हुकूम झाला होता. त्या हुकुमापुढं त्यांना दुसऱ्या कशाची मातबरी वाटत नव्हती.

तें सारं पाहून माझ्या मनांत आलं, घडयाळाचं केवढं वर्चस्व माणसावर! सृष्टीवर मालकी गाजविणारा प्राणी असं माणसाचं वर्णन करतात; पण सृष्टींतल्या पंचतत्त्वांना आपलं दास्य करायला लावणाऱ्या माणसाचं घडयाळापुढं कांहीं शहाणपण चालत नाहीं. भूमि, जल, तेज इत्यादि निसर्गशक्तींवर माणसानं विजय मिळविला असेल; पण कालाचं नियंत्रण मनुष्य करूं शकत नाहीं. फार तर अव्यक्त कालतत्त्वावर लांबीरुंदीचे खोटे कृत्रिम आरोप करून तो त्याची गणना करूं शकेल. पण ही गणनासुद्धां कालाचं दास्यत्व नीट करतां यावं म्हणून! बारा आंकडयांच्या तबकडीचं घडयाळ म्हणजे मनुष्याच्या या दास्यत्वाचं एक ठळक चिन्ह आहे. मनुष्य घडयाळाच्या 'हातांत पूर्णपणें सांपडलेला आहे. 'घडयाळाचे काटे' या मराठी शब्दप्रयोगापेक्षां 'घडयाळाचे हात' हा इंग्रजी शब्द-प्रयोगच अधिक अन्वर्थक नाहीं काय?

ज्या राजाचा अंमल आपण कबूल करतों त्याला परोपरीच्या मूल्यवान् चिन्हांनीं अंकित करून रत्नजडित सिंहासनावर बसविण्याची आपल्याला हौस असते. हें लक्षांत घेतां ज्याच्या अंमलाखालीं आपल्याला सतत वागायचं त्या घडयाळाला नाना प्रकारचे सुंदर सुंदर आकार देण्याची व त्याला हरप्रकारें नटविण्याची आपली खटपट असावी हें साहजिकच आहे. उपयुक्त वस्तूला अलंकाराचं स्वरूप देण्याची प्रवृत्ति जशी मनुष्याच्या ठिकाणीं निसर्गतः आहे, तशीच गुलामगिरीच्या चिन्हाचा सुद्धां अलंकार करून शल्याचें भूषण करण्याची प्रवृत्ति मनुष्य नेहमीं दाखवीत असतो. स्त्रियांनीं प्रथम कपाळावर कुंकू आणि हातांत बांगड्या धारण केल्या

त्या पुरुषांची सत्ता मान्य असल्याचं दाखविण्यासाठीं! पण हलकें हलकें त्या दास्यचिन्हांना सौंदर्यवर्धक साधनांचं स्वरूप आलं. मनुष्यानं घड्याळ अंगावर घालायचं ठरविलं तेव्हां पायांत, कमरेवर किंवा गळ्यांत नव्हे, तर मनगटावर तो तें धारण करूं लागला. ज्या मनगटाच्या जोरावर परोपरीचे पराक्रम करण्याची दर्पोक्ति मनुष्य करीत असतो त्या मनगटावर त्यानं घड्याळ चढविलं. घड्याळाची अनुल्लंघनीय सत्ता कबूल करण्याचा याहून अधिक काव्यमय प्रकार दुसरा खचित नसेल.

आपले व्यवहार नियमित व सूत्रबद्ध करण्याच्या हेतूनं मनुष्यानं घड्याळ निर्माण केलं खरं, पण त्या घड्याळानं मनुष्याचं मूळचं स्वैर व स्वच्छंदी जीवन किती कृत्रिम आणि दुःखाचं करून टाकलं पाहा! आपण आपली शय्या सोडून उठतों तें आपली निद्रा पूर्ण झाली म्हणून नव्हे, तर घड्याळांत अमुक वाजले म्हणून. आपण जेवायसाठीं पानावर बसतों तें आपणाला भूक लागेल तेव्हां नव्हे, तर दुपारच्या अगर रात्रींच्या जेवणाची वेळ झाली असं घड्याळांत दिसेल तेव्हां. रात्रीं घड्याळांत अमुक वाजलेले दिसले कीं निजायचं अशा कृत्रिम संकेतानं आपण निजतों. अंथरुणावर अंग टाकल्या-बरोबर झोप लागावी इतके आपण खरोखरच थकलों किंवा नाहीं याचा विचार आपण करीत नाहीं. आणि अशा प्रकारच्या कृत्रिम दिनचर्येमुळं अन्न व निद्रा यांच्या उपभोगांतलं सुख तर आपण कमी करतोंच, पण शिवाय आपलं आरोग्यहि आपण बिघडवून घेतों. घड्याळाच्या या सासुरवासाची विलक्षण चीड येते अन् वाटूं लागतं, ज्या ठिकाणीं घडयाळसुद्धां दृष्टीस पडणार नाहीं अशा ठिकाणीं

जाऊन चार दिवस मजेनं घालवितां आले तर त्यासाठीं पडेल तो मोबदला द्यावा !

खरंच, मला जर कुणीं विचारलं, ' अगदीं नमुनेदार सुटीची तुमची कल्पना काय आहे ? कुठं जावंसं तुम्हांला वाटतं ? अन् कसे दिवस घालवावे अशी तुमची इच्छा आहे ? ' तर मी उत्तर देईन, कीं ' कुठें तें मी सांगत नाहीं, कारण जिथें जावंसं वाटावं अशीं रम्य रम्य ठिकाणं असंख्य आहेत; पण जिथें जायचं तिथला मुक्काम कमालीचा सुखदायक करायचा असेल तर घडयाळ मुळींच बरोबर घेतां कामा नये अन् सुटीच्या ठिकाणीं गेल्यावर चुकूनसुद्धां घड्याळाची आठवण होतां कामा नये एवढं मात्र मी खचित म्हणेन. वक्तशीर काम करून करून आलेला थकवा घालविण्यासाठीं सुटी घ्यायची अन् त्या वेळींसुद्धां घडयाळाच्या तंत्रानं सारे व्यवहार संभाळायचे, तर मग सुटी घ्यायची तरी कशाला ? एखाद्या बादशाही हॉटेलांत जायचं अन् बिल द्यायला खिशांतले पैसे पुरतील कीं नाहीं याची चिंता करीत पदार्थ बेतानं मागवायचे, असली दरिद्री चैन मला मुळींच पसंत नाहीं. बिलाबद्दल अगदीं बेफिकिरी ठेवतां येत असेल तरच मोठया हॉटेलांत माणसानं जावं. अन् तद्वतच स्थल-कालाची आणि स्वतःच्या प्रतिष्ठेचीं सारीं बंधनं अजीबात झुगारून देतां येत असलीं तरच माणसानं विश्रांतीदाखल मुशाफरी करावी.

या दृष्टीनं समुद्रकांठचं एखादं खेडेगांव विश्रांतीला सर्वांत योग्य ठिकाण मी समजतों. अंथरुणांत लोळत पडण्याचा कंटाळा येईल तेव्हांच उठावं, लहर लागेल तेव्हां पोहण्यासाठीं समुद्रांत शिरावं, डुंबण्याचा कंटाळा आला कीं किनाऱ्यावरच्या मऊमऊ रेतींत पडून

जलपृष्ठावर नाचणाऱ्या मचव्यांची आणि आभाळाची अवीट शोभा मनसोक्त पाहावी, तसं पडून राहण्याचा कंटाळा आला कीं पुन्हा पाण्यांत बुडी मारावी, किनाऱ्यालगतच्या नारळींच्या झाडांखालून हवं तेवढं भटकावं, सपाटून भूक लागेल तेव्हांच जेवावं, आणि थकलेल्या शरिरानं झोपेची मागणी केल्याबरोबर शय्येवर अंग टाकावं, अशा मिजासखोर, लहरी, स्वच्छंद दिनचर्येची मौज काय वर्णावी ! उत्तर-ध्रुवाकडल्या कुठल्याशा एका प्रदेशांत सहा महिने दिवस आणि सहा महिने रात्र असते म्हणे. सूर्याच्या स्मरणाचे चोवीस भाग करून घटका—प्रहरांच्या तालावर नाचण्यास मनुष्याला भाग पाडणाऱ्या घडयाळाला त्या प्रदेशांत कुठून स्थान असणार ? अनिर्बंध विश्रांतिसुखाच्या साऱ्या कल्पना अनुभवायला तो प्रदेश सर्वांत योग्य ठरेल खरा.

पण त्या प्रदेशांत मनुष्य गेला, कीं थंडीनं गोठून मरतो म्हणतात. म्हणजे अखेरची विश्रांति ज्याला हवी असेल त्यानंच तिथं जावं असं दिसतं. मात्र उत्तर ध्रुवावरच्या विश्रांतीची अव्यवहार्य कल्पना सोडून दिली तरी मी जें वर म्हटलं तें कांहीं खोटं ठरत नाहीं. मी तर असं म्हणेन, कीं सवड असेल तेवढी लहानशीच विश्रांति घेतांना मनुष्यानं घडयाळाचा विचार सर्वस्वीं मनावेगळा करायला शिकावं व आठवडयां-तून एक दिवस शक्य नसेल तर निदान महिन्यांतून तरी एक दिवस असा काढावा, कीं ज्या दिवशीं उठल्यापासून निजेपर्यंत घडयाळांत किती वाजले तें पाहून व्यवहार करण्याऐवजीं अंतःस्फूर्तीनं मन मानेल त्याप्रमाणें वागतां येईल ! मला कुणीं पुरेशी सत्ता दिली व एक नमुनेदार गांव निर्माण करायला सांगितलं तर त्या गांवाची वसाहत

करतांना मी पहिली काळजी घेईन ती ही, कीं तिथें कुठंहि घडयाळ दिसणार नाहीं, घरांत अगर दुकानांत घडयाळ ठेवणाराला जबर शिक्षा दिली जाईल, व त्या गांवांत प्रवेश करण्यापूर्वी प्रवाशांजवळचीं घडयाळं जप्त करून नाहींशीं करण्यांत येतील. अशा या गांवांत नेहमीं राहणाऱ्या माणसाचं तर आरोग्य उत्तम राहीलच; पण तिथें येऊन चारसहा दिवस राहून जाणारे मुशाफीरसुद्धां अधिक प्रसन्न व आनंदी वृत्तीनं परत जातील याबद्दल मला शंका नाहीं.

मुंबईचे एक मोठे गृहस्थ इतके वक्तशीर होते कीं त्यांच्या येण्याजाण्यावरून लोक आपलीं घडयाळं लावीत अशी आख्यायिका ऐकतों. असल्या वक्तशीरपणाबद्दल मला आदराऐवजीं कींव मात्र वाटते. अहो, आयुष्य म्हणजे काय एक रेल्वे-स्टेशन आहे कीं जिथें व्यवहाराच्या साऱ्या गाडया अगदीं मिनिटंसेकंदं लावून वेळच्या वेळीं आल्या गेल्या पाहिजेत? ज्या मनुष्याला कधींच कुठें जायला उशीर होत नाहीं त्याचं जिणं मी व्यर्थ समजतों. मनुष्याला उशीर केव्हां होतो? ज्या गोष्टीपुढें वेळेचं भान राहूं नये अशा एखाद्या गोष्टींत तो गुंतेल तेव्हां.अशा प्रकारें वेळेची शुद्ध नाहींशी करून गुंतविणारी एकाहि प्रिय गोष्ट ज्याच्या आयुष्यांत नाहीं त्याचं जीवित काय माणसाचं जीवित म्हणायचं? मनुष्याला कोणत्या ना कोणत्या एका तरी गोष्टीची अशी वेडी आवड असायला पाहिजे, कीं जिच्या नादानं त्याला घडयाळाचा पूर्ण विसर पडेल. संगीत, चित्रकला, क्रिकेट, टेनिससारखा खेळ, पत्ते, गंजिफा—कसलाहि का होईना, मनुष्याला एक षोक असा असावा, कीं त्यामुळें त्याच्या आयुष्यांतला वक्तशीरपणा थोडा तरी नाहींसा होईल. एखाद्या विषयाचं अगर वस्तूचं वेड आणि घडयाळ यांचं

स्वभावत:च वाकडं आहे. जीं माणसं आपले सारे उद्योग अगदीं घडयाळ लावून वेळच्या वेळीं उरकूं शकतात त्यांना त्यांतल्या कुठल्याच उद्योगाबद्दल अनावर प्रीति वाटत नसावी; उलट ज्या माणसांचं अंत:करण कशानं तरी वेडावून जातं त्यांची तुम्ही अमुक ठिकाणीं घडयाळ लावून वाट पाहायची म्हटलंत तर तुमची निराशा झाल्यावांचून राहणार नाहीं. घडयाळाच्या दैवताला स्मरून वक्तशीर वागणारीं माणसं कितीहि मोठ्या पदाला चढलीं तरी त्यांचा मोठेपणा सामान्यच असतो. उलट ज्यांना कसला तरी निदिध्यास लागला व ज्यांना कालगतीची शुद्ध राहिली नाहीं, त्यांनींच मानवजातीचं कायमचं कल्याण करण्यासारखीं महत्कृत्यें करून दाखविलीं. मुंबई शहरांतून हिंडतांना उंच उंच मनोऱ्यांवरचीं मोठमोठीं घडयाळं पाहिलीं, कीं माझ्या मनांत येतं, सामान्य बुद्धीच्या अन् मर्यादित कर्तृत्वाच्या माणसांसाठीं आहेत हीं घडयाळं. त्यांकडे पाहून ज्यांनीं घडयाळाची गुलामगिरी मानली त्यांचं स्मरण होण्यापेक्षां ज्यांनीं घडयाळाचा अंमल न जुमानतां, वेळेचं भान न ठेवतां कांहीं तरी प्रचंड उद्योग करून दाखविला त्यांचं स्मरण लोकांना झालं तर तें अधिक श्रेयस्कर आहे. पुष्कळदां मी घडयाळाकडे पाहतों, तें त्यांत किती वाजले तें पाहण्यासाठीं नव्हे, तर ज्यांनीं किती वाजले ही चवकशी कधींच न करतां कोणत्या तरी शास्त्रावर, विद्येवर अगर व्यक्तींवर मन:पूत प्रेम करण्याचा षोक केला त्यांचं पुण्यस्मरण मला क्षणमात्र का होईना घडावं म्हणून !

**अभ्यास**—(१) माणसांवर घडयाळाचें वर्चस्व आहे हें लेखक कोणत्या उदाहरणांनीं सांगतो ? (२) घडयाळाची निर्मिति कां

करण्यांत आलेली आहे ? (३) घड्याळांना जे निरनिराळे सुंदर आकार देण्यांत येतात त्याची कारणमीमांसा लेखकानें कोणती सांगितली आहे ? (४) लेखकाच्या मतानें नमुनेदार सुट्टी कोणती ? (५) वक्तशीरपणा नसावा याबद्दल लेखकानें कोणतीं कारणें सांगितलीं आहेत ?

**परिचय**—लहान मुलें आणि मोठी माणसें यांच्यांतील फरक वयांतच असतो असें नव्हे, त्या दोहोंच्या वृत्तींतील फरक हाच महत्वाचा फरक होय. छत्री वापरण्याच्या दोघांच्या दृष्टिकोणांतील फरकच पाहा ना. उन्हापावसापासून संरक्षण हा छत्रीचा तथाकथित उपयोग, पण लहान मुलेंच नव्हे तर कांहीं मोठीं माणसेंहि छत्रीचा इतर कांहीं उपयोग करतात तो पाहण्याजोगा असतो. आणि छत्रीचा सर्वांत मोठा उपयोग म्हणजे अगदीं स्वल्प किंमतींत कोणालाहि 'छत्रपति' होतां येतें.

**मी** गॅलरींत उभा राहून त्या छोट्या मुलाची मौज पाहात होतों. पावसाची मोठी सर पडत होती, आणि हातांतली छत्री उघडून डोक्यावर धरण्याऐवजीं बंदुकीसारखी खांद्यावर धरून तो खुशाल भिजत चालला होता! भराभर तरी म्हणतां काय? छे, अगदीं धीम्या पावलांनीं! ऐटींत! हसत, निथळत! मोठालीं माणसं रस्त्यानं जात होतीं तीं कोण घाईनं, आपापल्या छत्र्या अगदीं डोक्याला चिकटून धरून, अन् चिखल उडूं नये म्हणून धोतराचे सोगे वर करून. पण ही चिमुकली स्वारी अगदीं मंदगतीनं पावलं टाकीत

चालली होती. रस्त्यावरच्या पाणथळीं तो चुकविण्याऐवजीं मुद्दाम शोधीत होता. मस्तकावर पडणाऱ्या जलधारांना जणूं तो म्हणत होता, " बस येवढंच ? आणखी जोरानं करा कीं वृष्टि ! " पावसापासूनच स्वतःचं रक्षण करायसाठीं छत्रीचा उपयोग करायचा असतो हें त्याला बिलकुल मान्य नसावं. लहान मुलांना छत्री हवीशी वाटते ती फार निराळ्या उपयोगासाठीं.

तुमचं बालपण आठवून बघा. या मुलासारखेच तुम्ही मुद्दाम भिजत जात नव्हता रस्त्यानं ! एखाद्या वयस्कर माणसानं " अरे बाळ, छत्री उघड कीं " असं म्हटलं तर " छत्रीचा घोडा मोडला आहे हो " असं उत्तर तुम्हीं देत नव्हतां ऐटीनं ! अन् असं उत्तर देण्यांत खोटं बोलण्याचं पाप लागूं नये म्हणून मुद्दाम छत्रीचा घोडा तुम्ही मोडून ठेवीत नव्हतां एखाद्या रस्त्यांतल्या दगडानं ? तुम्ही या गोष्टी केल्या नसतील तर तुम्ही कधीं लहान नव्हताच असं मी म्हणेन. तुम्ही एकदम मोठे झालां असलां पाहिजे. लहानपणीं उन्हापावसाचा अन् छत्रीचा काय संबंध ? त्या वेळीं छत्रीसाठीं वडिलांजवळ हट्ट धरायला असतो, छत्री हवी असते ती काय रवितापाच्या किंवा जलपाताच्या भयानं ? छे छे ! लहानपणीं छत्री हवी असते ती फार निराळ्या कारणासाठीं, अन् किती तरी अधिक मनोरंजक कामासाठीं !

उदाहरणार्थ, छत्री जवळ असली, कीं क्रिकेट खेळायची केवढी सोय ! ' विलो ' वृक्षाच्या लाकडापासून बनविलेली बॅट घेऊन क्रिकेट खेळण्यापेक्षां उलट्या छत्रीची बॅट करून रबराचा चेंडू हवेंत उंच टोलविण्यांत किती तरी अधिक गंमत असते ! शेजारच्या दामूनं

मारे जोरानं रबरी चेंडू फेकावा अन् आपण छत्रीचा फटका लगावून ओव्हर बाउंडरी ठोकावी यांत जें अनुपम सुख आहे तें मोठेपणीं ब्रॅबोर्न स्टेडिअमवर धमाधम उडवून देणाऱ्या बॅट्समनला देखील अनुभवायला मिळणार नाहीं ! धटिंगण बंड्यानं आपली खोडी काढली असतां त्याचा समाचार घ्यायचा असेल तर छत्रीसारखं दुसरं उपयुक्त आयुध नाहीं. तिची मूठ त्याच्या तंगडींत अडकवून जरा हिसका दिला, कीं तो हां हां म्हणतां जमीनदोस्त झालाच पाहिजे ! ज्युजित्सूंतले सगळे डाव या 'छत्री' पेचापुढें रद्द समजावे लागतील. छोट्या चिंतूनं जेव्हां छत्री घेऊन जर्मनीला निघालेल्या चेंबर्लेनचं चित्र पाहिलं तेव्हां त्याला खात्री वाटली, कीं हिटलरला 'छत्रीपेच' घालायला तो चालला असला पाहिजे. त्याचप्रमाणें उन्हाळ्याच्या सुटींत आंबे चोरायसाठीं बागेंत शिरल्यावर पाडाचीं सुंदर फळं अलगद हस्तगत करायच्या कामीं छत्रीचा केवढा उपयोग होतो ! एक छत्री, अन् रखवालदाराची चाहूल लागल्याबरोबर धूम ठोकाय्साठीं दोन भक्कम पाय, येवढं साहित्य सज्ज असलं, कीं गांवाभोंवतालच्या सगळ्या आंबराया आपल्याच मालकीच्या ! आणि सोसाट्याचा वारा सुटल्यावर मुद्दाम पाठ फिरवून छत्रींत वारा भरूं देऊन तिच्या बरगडया उलटलेल्या पाहण्याचा जो विलक्षण गमतीचा खेळ आहे त्याची सर दुसऱ्या कुठल्या खेळाला येईल काय ? लहान मुलांना छत्री प्रिय असते ती यासाठीं.

अन् मोठीं माणसंसुद्धां छत्रीचा उपयोग नेहमींच प्रामाणिकपणानं करतात असं म्हणतां येईल काय ? मला नाहीं वाटत. समोरून येणाऱ्या ओळखीच्या माणसाला करावा लागणारा नमस्कार टाळायसाठीं

डोक्यावरची छत्री आपला चेहरा दिसूं नये इतकी खालीं करण्याची साळसूद युक्ति तुम्हीं एकदांसद्धां वापरली नसेल ? उन्हातान्हापेक्षांहि नको असलेल्या दृष्टिक्षेपापासून स्वतःचा बचाव करायसाठींच स्त्रिया अधिक तत्परतेनं छत्री वापरतात कीं नाहीं विचारा त्यांना. स्वतःची नजर उघड न होऊं देतां आजूबाजूचं सौंदर्य मनःपूत सावकाश न्याहाळत रस्त्यानं जाणाऱ्याची छत्री उत्कृष्ट सोय करून देते. काळा चष्मा वापरणारे लोक छत्रीऐवजींच त्याचा उपयोग करीत असले पाहिजेत असा मला पुष्कळ दिवस संशय होता; आणि आमच्या रंगेल बाबूरावांनीं जेव्हां एके दिवशीं ' डॉक्टरच्या सल्लया ' वरून काळ्या भिंगांचा चष्मा अकस्मात् नाकावर चढविला, व तसा सल्ला मुळींच दिला गेला नव्हता हें जेव्हां मला कळलं, तेव्हांपासून माझ्या त्या संशयाला चांगलींच बळकटी आलेली आहे. थिएटरांतल्या सर्वांत उंच दराच्या जागांना इंग्रजींत ' Box ' म्हणतात, पण मराठींत ' चष्मा ' असं जें त्याचं भाषांतर झालं आहे तेंच जास्त अन्वर्थक आहे. ज्या जागीं बसून स्वतः लोकांच्या दृष्टीस न पडतां भोंवतालचे चेहरे यथेच्छ पाहतां येतात तिला " चष्मा हेंच नांव शोभतं. दुसरं नांव द्यायचंच असेल तर " छत्री. "

निवाऱ्याची सुरक्षित एकान्त जागा केवळ एका छत्रीच्या साहाय्यानं उत्पन्न करतां येते. मात्र ती आपल्या समाजांत नव्हे. कारण सारे सामाजिक संकेत व शिष्टाचार त्या एकान्तनिर्मितीला अनुकूल असले तरच ती शक्य आहे. तुम्हीं छत्रीचा आडोसा करून चौपाटीच्या वाळूवर पडलांत तर दोनचार मिनिटांतच कुणी तरी येऊन खुशाल छत्री दूर करून तुमच्याकडे पाहून पुढें जाईल. याच्या उलट

पाश्चात्य समाजांत छत्रीची शपथ पवित्र मानण्यांत येते अन् कसोशीनं पाळण्यांत येते. 'बायबल'ची शपथसुद्धां त्यापुढें फिकी पडेल. रविवारीं किंवा सुटीच्या दिवशीं उघाडी असली कीं विलायतेंत समुद्र-कांठच्या वाळवंटांत हजारों रंगीबेरंगी छत्र्यांचा अजस्र तळ पडलेला तुम्हांला दिसेल. एकेका छत्रीचं उघडं घरकुल करून तरुण जोडपीं स्वच्छंदानं रमलेलीं असतील; अन् एका छत्रीआड गुजगोष्टींत दंग झालेलीं माणसं एका हातापलीकडच्या छत्रीकडेसुद्धां वावग्या जिज्ञासेची नजर टाकणार नाहींत! उमर खय्याम आज युरोपियन देशांत जन्माला आला तर आपल्या 'रुबायत'च्या आधुनिक आवृत्तींत निस्सीम सुखाची व्याख्या करतांना तो आपल्या प्रेयसीला खचित म्हणेल, "अथांग सागराच्या तीरावर पसरलेल्या रंगेल जनसंमर्दांत सामील होऊन, छत्रीचा आडोसा करून, तुझे हात हातांत धरून, मऊ वाळूंत पडल्या पडल्या तुझ्याशीं प्रेमालाप करावेसे मला वाटतात!"

कांहीं माणसांना नाना प्रकारच्या छत्र्या विकत घेऊन त्यांचा संग्रह करण्याचा छंद असतो म्हणतात. मी असा छांदिष्ट मनुष्य अजून पाहिलेला नाहीं. छत्रीच्या बाबतींत विसराळूपणानं वागणारे एक गृहस्थ मात्र माझ्या बरेच ओळखीचे आहेत. ते छत्री कुठें विसरतील त्याचा नेम नाहीं. आगगाडींत, मोटारींत, ट्रॅममध्यें, दुकानांत, जिथें जातील तिथें ते छत्री विसरून येत असतात. त्यांनीं आपल्या लग्नाच्या बायकोपायीं केले नसतील इतके पैसे छत्रीपायीं खचित खर्च केले असले पाहिजेत. शेवटीं त्यांनीं जुनी छत्री विकत घ्यायचं ठरवलं. एर्वीतेवी दहापंधरा दिवसांच्यावर जर छत्रीचा अन् आपला संसार व्हायचा नाहीं हें ठरलेलं, तर अगदीं कुमारिका

छत्री पाहिजे असा हट्ट तरी कशाला, करूं या छत्रीच्या बाबतींत पुनर्विवाह, असा त्यांनीं मनाशीं विचार केला असला पाहिजे. जरी-पुराण्याच्या दुकानाकडे त्यांनीं मोर्चा वळवला, अन् अवघ्या बारा आण्यांत त्यांनीं एक छत्री खरेदी करून आणली. ती उघडून दाखवीत ते मला म्हणाले, " बघा, कशी फक्कड मिळाली. " मीं त्यांना म्हटलं, " अहो, पण हें काय ? " त्यांनीं विचारलं, " काय ? " मीं बोट दाखवून म्हटलं, " तें पाहा. पुसट आहे, पण नीट पाहिलंत तर दिसेल. " छत्रीच्या आंतल्या बाजूला त्यांचं स्वतःचंच नांव होतं ! त्यांचा चेहरा छत्रीपेक्षांहि काळा झाला. विलक्षण योगायोगानं स्वतःच्या बायकोशीं तीन वेळां लग्न लावणाऱ्या एका रंगेल बहादराची गोष्ट मीं एका इंग्रजी प्रहसनांत नुकतीच वाचली होती तिची मला त्या वेळीं आठवण झाली.

त्यांच्या हातांतल्या त्या छत्रीकडे पाहून मग मला निराळेच विचार सुचले. माझ्या मनांत आलं, निरनिराळ्या सतरा ठिकाणांहून जरीपुराण्यावाल्याच्या दुकानीं गोळा होणाऱ्या असल्या जुन्या छत्र्या आपापला इतिहास सांगूं लागल्या तर काय ऐकावं लागेल ! एक सांगेल, एकदां एका तरुण सुस्वरूप विद्यार्थ्याचं माझ्यावर फार प्रेम होतं, पण तो मला एकदां विसरला अन् मी मग एका बदमाष उचल्याच्या तावडींत सांपडलें. दुसरी सांगेल, माझा पहिला मालक एक लुच्चा सावकार होता, त्याच्या सहवासाला कंटाळून मीच एका सत्यनारायणाच्या उत्सवांत एका उडाणटप्पूचा हात धरून पळ काढला. तिसरी हजारदां कीर्तनाला गेली असेल व सबंध महाभारत अगर रामायण ती आपल्याला ऐकवूं शकेल; तर चवथी वारंवार

वेश्येच्या माडीच्या कोपऱ्यांत ताटकळत उभी राहिली असेल व तिथें तिच्या कानावर आलेलीं खऱ्या-खोट्या प्रेमाचीं बोलणीं ती तिखटमीठ लावून सांगेल. अशा हजार तऱ्हा! असल्या जबान्या एकत्र करून "छत्र्यांचं चरित्र" या नांवानं एखादं पुस्तक प्रसिद्ध केलं तर तें मनोरंजक होईल असं नाहीं तुम्हांला वाटत ?

मात्र मला छत्रीविषयीं नुसतं प्रेमच नव्हे, तर एक प्रकारचा आदर वाटतो तो आतांपर्यंत सांगितलेल्या गोष्टींहून निराळ्याच एका कारणासाठीं. पूर्वी असा एक काळ केव्हां तरी असेल, कीं त्या काळांत छत्र हें राजचिन्हांपैकीं एक समजलं जात होतं. "छत्रपति" हा 'राजा' हा शब्दाला प्रतिशब्द होता. पण आज काळ असा आला आहे, कीं रुपया दोन रुपये फेकावे अन् कुणीहि "छत्रपति" व्हावं. एका काळच्या राजचिन्हावर अलम दुनियेचा हक्क प्रस्थापित झाला आहे. मला कुणीं विचारलं कीं आज लोकशाहीच्या जमान्यांत आपण राहात आहों हें सर्वांत उत्तम प्रकारें दर्शविणारी गोष्ट कोणती, तर मी निःशंकपणें उत्तर देईन—"छत्री."

**अभ्यास**—(१) लहान मुलांना छत्री हवी असते ती कोणत्या कारणासाठीं ? (२) मोठीं माणसेंहि कधीं कधीं छत्रीचा कसा उपयोग करून घेतात ? (३) लेखकाच्या ओळखीच्या त्या विसरभोळ्या माणसाची छत्रीचे बाबतींत काय मौज झाली ? (४) खुद्द लेखकाला छत्रीबद्दल कोणत्या कारणानें प्रेम वाटतें ?

: ७ :

# नको असलेलीं पुस्तकें

**परिचय**—हवीं असलेलीं पुस्तकें आपल्याजवळून जाऊं देण्यांत आणि नको असलेलीं पुस्तकें आपल्याकडे येण्यांत काय दुःख असतें याची अनुभवाशिवाय कल्पना येणार नाहीं. कारण वाचन म्हणजे कांहीं डोक्यावर दिलेल्या ओझ्यासारखें नसतें. आपल्या आवडीच्या विषयांवरील पुस्तकांचें वाचन आपण जितक्या प्रेमानें करतों तितकेंच आपणांला जे विषय आवडत नाहींत त्यावरील पुस्तकें वाचणें अवघड असतें. आणि आयुष्यांत या बाबतींत नेहमींच उलट सुलट अनुभव येत असतात !

पैसे उसने देतांना ते कधीं परत मिळायचे नाहींत अशा समजुतीनं ते देतां आले तरच द्यावेत, म्हणजे नंतर व्यर्थ मनस्ताप होत नाहीं, असा उपदेश कोणी तरी केलेला आहे. मला वाटतं पुस्तकांच्या बाबतींत हा सल्ला अधिकच लागू पडणारा आहे. माझ्याकडे येणारा मनुष्य माझ्या पुस्तकांकडे न्याहाळून पाहायला लागला कीं तो कोणती मागणी करणार, अन् ती करतांना कोणत्या मासल्याचा चेहरा करणार हे आतां संवयीनं मी ओळखूं शकतों. आणि एक पुस्तक काढून "हें मी नेऊं का दोन दिवस ?" असं त्यानं विचारलं

कीं, " हं न्या " असं मी उत्तर देतों, अन् त्याच वेळीं मनाशीं खूणगांठ बांधतों, कीं आणखी एक पुस्तक नाहींसं झालं आपल्या संग्रहांतनं. पुस्तक नेणारा माणूस तें काखोटीस मारून उठतां उठतां पुटपुटतो, " वाचून झाल्याबरोबर आणून देईन हं. " पण त्या शब्दांकडे माझं धड लक्षच नसतं. त्या आश्वासनाचा पोकळपणा अनेक वेळां अनुभवला आहे मीं. मीं तोंडावर हास्य आणून खुर्चीवरून उठतों तेव्हां तो गृहस्थ म्हणतो, " कशाला येतां ! बसा. " तरी मी खोलीच्या दारापर्यंत जातोंच. त्या गृहस्थाला नव्हे, तर जें पुस्तक इतके दिवस माझ्या घरांत राहिलं त्याला निरोप द्यायसाठीं. " God-bye ! " त्या प्रिय पुस्तकाला उद्देशून मी म्हणतों. त्याचं दर्शन मला पुन्हा घडणार नाहीं अशी माझी समजूत असते. अन् बहुधा ती खरी ठरते. आपलं पुस्तक कुठेंहि असलं तरी तें कुणी तरी वाचीत तर असेल, अन् तितक्या अंशानं ज्ञानप्रसाराचं काम केल्याचं पुण्य तरी आपल्या पदरीं पडत असेल या विचारानं मनाचं सांत्वन करून घ्यायला मी आतां शिकलों आहे. आणि माझ्या संग्रहांतलीं इतकीं पुस्तकं लोकांनीं नेलीं तरी मनुष्यजातीबद्दल अनुदार सिद्धान्तहि मी बांधीत नाहीं. उलट, मी म्हणतों ज्या अर्थीं माझ्या संग्रहांत अजून इतकीं पुस्तकं कायम राहिलीं आहेत त्या अर्थीं माझ्याकडे येणाऱ्या माणसांत सज्जन माणसंच अधिक असलीं पाहिजेत !

शिवाय असं कीं पुस्तकं नेणाऱ्यांपेक्षां देणाऱ्या माणसांकडून माझा जो छळ होतो तो फार विलक्षण. उदाहरणार्थ, एके दिवशीं एक गृहस्थ मला भेटायला आले. थोड्या गप्पा टप्पा झाल्यावर त्यांनीं

एक ग्रंथ काढला व तो टेबलावर ठेवीत मला विचारलं, " हा वाचला आहे का आपण ? " मी पुस्तकाचं व लेखकाचं नांव पाहात मान हालविली. ते म्हणाले, " आपण अवश्य वाचायला हवा हा ग्रंथ ! " माझ्या चर्येत " कां ? " असा प्रश्न सूचित झाला असावा. ते म्हणाले, " आपण मानसशास्त्राची आवड बाळगणारे म्हणून सांगतों. नजरेखालून घालाच एकदां. "

" पण सध्यां मला सवड होईलसं...." अशा सबबीनं मी स्वसंरक्षण करणार तोंच ते गृहस्थ म्हणाले,

" सवड होईल तेव्हांच वाचा. घाई नाहीं. आपल्याकडे ठेवून जायसाठींच आणला होता मीं. यांतल्या आठव्या प्रकरणांत गाढवं फार बुद्धिमान् असतात असं सिद्ध केलं आहे. हा ग्रंथकार म्हणतो...."

आणि त्यांनीं ग्रंथ उचलून तें प्रकरण उघडून वाचायलाच सुरुवात केली !

मी माझ्या मूर्च्छेतून जागा झालों होतों तेव्हां ते गृहस्थ निरोप घेत होते. मला वाटलं सुटलों. पण नाहीं !

जातां जातां त्यांनीं मला बजावलं, " अन् ग्रंथ वाचून झाल्यावर आपला अभिप्राय सांगा हं ! "

आलं का संकट ! आतां तो ग्रंथराज वाचलाच पाहिजे ! मला जें वाचावंसं वाटतं त्या ऐवजीं त्या भल्या गृहस्थाला मीं जें वाचलं पाहिजे असं वाटतं त्यांत माझ्या आयुष्याच्या कांहीं घटका फुकट घालवल्या पाहिजेत मला !

तसाच तो परवांचा पाहुणा. त्यानं दोन दिवसांच्या मुक्कामांत

क्र. क्र. 63ec

फलज्योतिषाविषयीं वाद घालून माझा जीव घाबरा केला. माझ्या राशीला अनिष्ट ग्रह आल्याचा मला चांगलाच प्रत्यय दिला त्यानं. शेवटीं जायच्या वेळीं तो एक जाड इंग्रजी पुस्तक माझ्या हातीं देऊन म्हणाला, " हें वाचलं पाहिजे तुम्हीं ! "

" पण माझा विश्वास नाहीं ! "

" म्हणूनच सांगतों, वाचा एकदां. माझी खात्री आहे तुमचीं मतं बदलतील. "

आणि तें तो माझ्याजवळ ठेवून गेला !

या साडेसातीला काय म्हणायचं ?

असे अनेक उपकारकर्ते येतात अन् माझ्यावर आपल्या अभिरुचीचा जुलूम करण्यासाठीं पुस्तकं ठेवून जातात. कुणी संगीतविषयक पुस्तक आणून देतो, अन् सांगतो, यांतली अमुक उपपत्ति तुम्हांला आवडेल. कोणी योगावरचं, कुणी माझी कुत्र्यांची आवड ऐकून कुत्र्यांना शिकविण्याच्या कलेवरचं, कुणी भारतीय चित्रकलेवरचं ज्याला जें आवडलं असेल तें पुस्तक तो माझ्याकडे आणून देतो; अन् प्रत्येकाचा आग्रह असा कीं मीं तें वाचलंच पाहिजे. परवां तर एक स्वारी माझ्याकडे आली, अन् एक कादंबरी मला वाचाय्साठीं देऊन म्हणाली, " अशा कादंबऱ्या तुमच्या हातून लिहून झाल्या पाहिजेत. ही वाचा तुम्ही ! " मीं ती आधींच वाचली होती, व मला ती भिकार वाटली होती ! म्हणून मीं हास्य करून म्हटलं " असं का ? " त्याला वाटलं, मी जिज्ञासा व कृतज्ञता दाखविली ! तो ती कादंबरी माझ्याजवळ ठेवून गेला ! हीं सारीं पुस्तकं माझ्या संग्रहांत मीं अगदीं ठळक दिसतील अशा ठिकाणीं ठेवलीं आहेत.

हेतु असा, कीं माझ्याकडे पुस्तकं मागायसाठीं येणारीं माणसं तीं पाहून उचलतील. पण एक मासा त्यांच्या जाळ्यांत अडकेल तर शपथ! खोटं नाणं कांहीं केल्या हातावेगळं करतां येऊं नये तशी गत झाली आहे त्या पुस्तकांची.

हीं पुस्तकं देणारीं माणसं तीं न्यायला परत येत नाहींत ही आपत्ति तर खरीच; पण तीं येत नाहींत तेंच एका दृष्टीनं बरं असंहि वाटतं. कारण तशीं तीं आलीं तर केवढ्या संकटाला मला तोंड द्यावं लागेल त्याची चुणूक एकदां मला कळलेली आहे.

माझ्याकडे एकदां एक गृहस्थ आले व नमस्कार चमत्कार झाल्या-वर म्हणाले,

" मग आपण तें पुस्तक वाचून पाहिलंत कीं नाहीं ? "

अस्सं, एकूण " त्या " पैकीं आहे तर हा, असं माझ्या मनांत आलं. त्यानं माझ्यावर कोणतं पुस्तक लादलं होतं तें मी अजीबात विसरून गेलों होतों. पण तसं सांगावं तर त्याला वाईट वाटेल अशी शंका आली. ' नाहीं, अजून नाहीं वाचलं ' असं उत्तर द्यावं तरीहि त्याला कसं वाटेल कुणास ठाऊक असं मनांत आलं. शेवटीं हिय्या करून मीं म्हटलं,

" छान आहे तुम्हीं दिलेलं पुस्तक. त्यांतल्या विषयाबद्दल मतभेद होईल कदाचित्, पण भाषासरणी फारच छान आहे. "

माझ्या कल्पनेनं अगदीं सुरक्षितपणें, अंग बचावून बोललों होतों मीं हें.

पण माझा अदमास खोटा ठरला. त्या गृहस्थांनीं विचारलं,

" विषयाबद्दल मतभेद होईल म्हणतां तें बरोबर आहे पण

त्यासाठींच तर तुम्हांला दिलं मीं तें वाचायला; तुम्हांला काय वाटतं ग्रंथकाराच्या मतांबद्दल ? तुमचं मत पाहिजे मला. सांगा; तेवढ्या-साठीं तर आलों आज मुद्दाम." मला वाटलं या क्षणीं धरणी दुभंग होईल, अन् ( मला नव्हे ) त्याला पोटांत घेईल तर केवढे उपकार होतील त्या माउलीचे माझ्यावर.....पण तसं कुठलं व्हायला ?

मीं म्हटलं, "अंऽअं; माझं मत सांगायला, कांहीं हरकत नाहीं... पण त्याचं असं आहे, थोडसं राह्यलं आहे अजून वाचायचं."

"असं होय ? पण कुठपर्यंत वाचलंत तें तर सांगा, म्हणजे तेवढ्या भागांतल्या...."

आतां कोपऱ्यांत अडविल्या गेलेल्या मांजराप्रमाणें त्याच्यावर उलट हल्ला करण्यावांचून दुसरा मार्गच उरला नव्हता मला. मीं म्हटलं,

"त्या पुस्तकाचं जाऊं द्या. मी तुम्हांला एक पुस्तक देणार आहे वाचायला. मला तें इतकं आवडलं आहे, कीं तें दोन वेळां वाचलं मीं. भाषा ओबडधोबडच आहे, पण मतं अशीं तर्कशुद्ध अन् सडेतोड आहेत म्हणतां कीं ज्याचं नांव तें. मनाशीं योजूनच ठेवलं होतं, कीं तुम्हीं आलांत कीं तुम्हांला द्यायचं...."

"असं का ? द्या. तुम्ही ज्या अर्थीं दोनदां वाचलं म्हणतां...."

असं कांहीं तरी तो पुटपुटत होता. तेवढ्यांत उठून, नको झालेल्या आगंतुक पुस्तकांच्या रांगेंतून सगळ्यांत जाड दिसलं तें पुस्तक मी काढलं, अन् झटकून त्याच्या हातीं दिलं. किती युक्तीनं आज आपण अडगळ दुसऱ्याच्या गळ्यांत बांधली असा हर्ष मला झाला. पण तो क्षणभरच. कारण—

ते गृहस्थ हसून म्हणाले, " हें काय हो ? तुम्हांला मीं दिलेलं पुस्तक हेंच कीं ! तेंच मला देतां होय ?...."

आतां मात्र मी पुरता गारद झालों !

" अरे, असं झालं होय चुकून ? च् ! हें घ्या. " असं म्हणत मग दुसरं पुस्तक काढून मी त्या गृहस्थाच्या हातीं कसं दिलं अन् त्या पेचप्रसंगांतून कसा सुटलों तें माझं मलाच माहीत !

ज्या अगडबंब ग्रंथाची अडगळ मी दूर करणार होतों तो आजमित्तीलाहि माझ्या खोलींत आहेच ! आणि त्याच्या जोडीला तसलींच आणखी किती तरी पुस्तकं शेल्फवर उभीं आहेत. हीं मीं कधीं विकत घेतलीं नाहींत, कधीं मागितलीं नाहींत, कधीं वाचणारहि नाहीं ! आणि असं असून तीं त्या जागेवरून कधीं हलतीलसं वाटत नाहीं ! त्यांच्याकडे पाहून मीं कधीं कधीं त्यांना विचारतों.

" तुम्ही कां आलांत माझ्याकडे ? "

त्या पुस्तकांना वाचा फुटून तीं हसतात व म्हणतात, " आपल्याला वाचनाची फार आवड आहे असं तुम्हीं जगाला दाखवलं नसतं तर लोकांनीं कशाला लोटलं असतं आम्हांला तुमच्या घरीं ? " अन् त्यांचं तें उत्तर कांहीं खोटं नाहीं !

**अभ्यास**—(१) एखादा माणूस पुस्तक वाचावयास मागूं लागल्यावर लेखकाच्या त्याबद्दल काय भावना असतात ? (२) लेखकाकडे अनाहूतपणें येणाऱ्या पुस्तकांचे बाबतींत कसा छळ होतो ?(३) नको असलेलें एक पुस्तक आपल्या संग्रहांतून घालवण्याच्या प्रयत्नांत लेखकावर कोणता प्रसंग आला ? (४) नको असलेल्या पुस्तकांनीं लेखकाला काय उत्तर दिलें ?

---

: ८ :

# पुरून ठेवलेलें धन

**परिचय**—आपल्या लहानपणीं ज्या वस्तूंत आणि आवडीनिवडींत आपणांस नितांत आनंद लाभलेला असतो तो आनंद त्यांचेपासून आपणांस मोठेपणीं मिळेलच असें नसतें. नव्हे मिळणार नाहींच याबद्दल खात्री असते. तरीपण त्या त्या गोष्टी-बद्दल मोठेपणीं आपणांस मोठें प्रेम आणि कुतूहल वाटत राहिलेलें असतें. आणि हें प्रेम व हें कुतूहल कायम ठेवावयाचें असेल तर त्याबद्दल वाटणारें प्रेम पुन्हा अनुभवावयाचा प्रयत्न करूं नये येवढेंच !

**मा**झ्या रुकारामुळें त्या लोकांना आनंद तर झालाच, पण त्यांना आनंदाइतकंच आश्चर्यहि वाटलं असावं. त्यांच्या गांवीं जाऊन मी व्याख्यान द्यावं अशी विनंति करायसाठीं ते आले होते, व विशेष आढेवेढे न घेतां मीं त्यांचं आमंत्रण स्वीकारलं होतं. त्यांचे चेहरे हर्षानं प्रफुल्ल झाले. पण एकमेकांकडे त्यांनीं जी नजर टाकली तींत "आपलं काम इतक्या सहज झालं ?" अशा विस्मयाचा अभिप्राय मला स्पष्ट दिसला. त्यांच्यांतले एक गृहस्थ माझ्याकडे बघून म्हणाले,

"आमची कल्पना नव्हती इतकं सहजासहजीं आमचं काम

होईल अशी; आम्हीं ऐकलं होतं कीं व्याख्यानाचं आमंत्रण स्वीकारण्याच्या बाबतींत आपण फारच....''

त्यांना वाक्य पुरं करूं न देतां मीं म्हटलं,

" माझ्या मित्रांनीं माझ्याविषयीं जे अनेक गैरसमज पसरविले आहेत त्यांपैकीं हा एक आहे.... "

ते हसले व म्हणाले, " असं होय ? मग निराळं. "

तथापि कांहीं वेळानं निरोप घेऊन ती मंडळी निघाली तेव्हां माझे पुन्हा आभार मानतांना ते गृहस्थ म्हणालेच, " अन् आम्हांला खरंच आश्चर्यचकित करून टाकलंत आपण....''

तें ऐकून एकदां वाटलं त्यांच्या गांवीं व्याख्यानासाठीं जाण्यांत आपला खरा हेतु काय आहे तो सांगून टाकावा; पण पुन्हा विचार केला, कशाला सांगा ? सांगितला तरी तो त्यांना नीट कळायचाहि नाहीं. कारण, तो सर्वस्वीं माझ्या खाजगी सुख–दुःखाचा होता.

त्या गांवीं लहानपणीं एक वर्ष मी राहिलों होतों व आजपर्यंत असंख्य वेळां तिथल्या कित्येक स्थळांच्या अन् व्यक्तींच्या आठवणी या ना त्या निमित्तानं होऊन मला वाटलं होतं, जावं एकदां पुन्हा त्या गांवीं अन् करावी तिथें घालविलेल्या रम्य कालाची उजळणी. तिथलं तें राममंदिरापुढचं विस्तीर्ण पटांगण. विटीदांडूचे किती तरी चुरशीचे डाव आम्ही तिथें खेळलों असूं. तिथली ती फौजदार कचेरी. तिच्यावरून जातां येतां आमचे आवाज हलके होत असत, पावलं झपाझप पडत असतीं; या पोलीस लोकांची आपल्यावर तर कांहीं कारणानं नजर नसेल अशा बालिश भीतीनं छाती धडधडूं लागत असे. रामूचं चिवड्याचं दुकान. कुणाला घरून पैसा मिळाला

कीं, त्यानं साऱ्या सोबत्यांना रामूच्या दुकानांतला चिवडा द्यायचा असा आमच्यांत गुप्त संकेत असे. घरीं माझी आई पुष्कळदां चिवडा करी; पण रामूच्या चिवड्याची लज्जत त्याला कधीं येत नसे. तशीच संभूराव घाटग्यांच्या घरामागची ती बाग. झाडावर चढून पिकलेलीं शिताफळं तिथं कितीदां तरी मीं खाल्लीं असतील. त्या बागेंतल्या एका कोपऱ्यांत काकडीचे वेल असत. त्यांवरच्या कोवळ्या काकड्या काय संभूरावांच्या मालकीच्या होत्या म्हणतां ? त्या गांवचा दर गुरुवारीं भरणारा बाजार. केवढी गर्दी अन् धांदल दिसायची मला त्या दिवशीं. शाळा लवकर सुटली कीं घरांत दप्तर टाकून केव्हां एकदां बाजार पाह्यला जाऊं असं वाटायचं मनाला. खिशांत एक दिडकीसुद्धां नसतांना बाजारांत आलेल्या साऱ्या जिनसा न्याहाळीत तिन्हीसांजा होईपर्यंत रेंगाळत हिंडायचा मी दोन चार सोबत्यांना बरोबर घेऊन. प्रत्येक बाजाराच्या दिवशीं एक जादूगार येत असे, त्याच्या भोंवतालच्या कोंडाळ्यांत अगदीं आघाडीवर असायचा मी. तो मातींतले खडे उचलून त्यांचे रुपये कसे करतो याबद्दल आम्ही एकमेकांत पुष्कळदां चर्चा करीत असूं; पण कधीं त्या चमत्काराचा उलगडा होत नसे. तसंच त्या गांवच्या सीमेवरच्या टेकडीवरचं तें बहिरोबाचें देऊळ. केवढी उंच टेकडी होती ती ! तिच्या माथ्यावर जाऊन पतंग उडविण्याची मोठी मौज असे. कुळकर्ण्यांचा तात्या काटाकाटी खेळण्यांत फार तरबेज. त्याचा पतंग आभाळांत उंच जाऊन ठिपक्यासारखा दिसूं लागला कीं तो कांहीं वेळ माझ्या हातीं देत असे. तात्या श्रीमंत होता असं माझं अनुमान होतं, अन् जगांत सगळ्यांत सुखी प्राणी कोणी असेल तर तो असं मला वाटे. मी शक्य तितका

त्याच्या संगतींत राहात असे. आणि त्या गांवांतली ती शाळा. मला फार आवडत असे ती; अन् आमचे पुस्तीचे मास्तर तर माझ्या फारच प्रीतींतले होते. ते धोतराचा काचा कसायचे, कर्रकर्र वाजणारा चढाव घालायचे, अन् माझ्या पुस्तीला नेहमीं दहांपैकीं आठ नऊ मार्क द्यायचे !...

या सर्व आठवणी माझ्या मनांत आज किती तरी वर्षं होत्या, अन् त्या गांवीं केव्हां तरी एकदां जावं अन् जीं सुखं तिथं टाकून मी दूर आलों तीं पुन्हा एकदां अनुभवावीं असं मला वारंवार वाटलं होतं. मी त्या गांवीं व्याख्यान द्यायचं कबूल केलं तें या गुप्त हेतूमुळें.

अर्थात् मी जायला निघालों तो अतिशय उत्कण्ठेनं.

पण तिथें पोंचल्यावर अन् एक दिवस राहिल्यावर माझी केवढी निराशा झाली ! जें सांपडेल असं मला वाटलं होतं तें मला सांपडलं नाहीं. संभूराव घाटग्यांची बाग तर उध्वस्तच झाली होती, अन् रामू चिवडेवाल्याचं देहावसान होऊन त्याच्या दुकानाच्या जागीं एक केस कापायचं घाणेरडं दुकान थाटलं गेलं होतं. पण बाकीच्या ज्या वस्तू अन् व्यक्ति मला लहानपणीं विलोभनीय वाटल्या होत्या त्यांच्या ठिकाणीं तरी ती जुनी गोडी कुठें राहिली होती ? माझे ते पुस्तीचे मास्तर आतां पंचा नेसूं लागले होते. त्यांच्या बत्तीशीनं बहुतेक रजा घेतली होती, त्यांच्या चेहऱ्यावर कधींकाळीं बेदरकार रंगेलपणा होता हें आतां मला खरं देखील वाटेना. कुळकर्ण्यांच्या तात्याला मीं प्रथम ओळखलंच नाहीं. त्यांची इस्टेट भाऊबंदकीच्या कज्जांत अर्धी-अधिक खलास झाली होती. त्याला तीन लग्नं केल्यावर कुठें एक मूल झालं होतं, अन् तेंहि रोगं रडकं. त्याचे सारे केस पांढरे धोप

झाले होते. मीं त्याला विचारलं, " बहिरोबाच्या टेकडीवर तूं पतंग उडवायचास, आठवतं का तुला ? " तेव्हां जणूं मागच्या जन्मींची गोष्ट कष्टानं आठवून उदासवाणं हास्य करून तो म्हणाला, " हां. स्मरतं थोडसं. " तें ऐकून मला वाईट वाटलं. मी त्याच्या घरीं मग फार वेळ बसलों नाहीं. पण याहीपेक्षां माझ्या मनाला अधिक मोठा धक्का बसला, तो बाजारपेठ अन् बहिरोबाची टेकडी पाहायला मी गेलों तेव्हां. जी बाजारपेठ मला पूर्वीं मोठी विस्तीर्ण वाटली होती ती फार तर एक फर्लांगभर लांब होती, अन् जी टेकडी खूप उंच म्हणून माझ्या आठवणींत होती ती टेकडी कसली एक मोठासा उंचवटा होता असं मला आढळून आलं. लहानपणाच्या मापानं ज्या जागा मला भव्य अन् उंच वाटल्या होत्या, आणि ज्या व्यक्ती मला प्रिय वाटल्या होत्या त्यांपैकीं एकीचंहि तें स्वरूप आतां मला दिसेना.

मी त्या गांवाहून परत आलों तो अगदीं तीव्र असंतोषानं अन् निराशेनं. क्रमिक पुस्तकांतल्या भावी मनोरथांचे मनोरे रचणाऱ्या महंमदाची लाथ लागून त्याची गाडग्यांची उतरंड पडून फुटली, तद्वत् माझ्या कित्येक सुखदायक स्मृतींची उतरंड ढासळून कायमची फुटून गेली होती ! त्या गांवाचा मला अगदीं राग आला !

पण मग माझ्या लक्षांत आलं कीं यांत त्या गांवाचा दोष नव्हता. माझीच चूक होती. ज्या स्थलानं अथवा व्यक्तीनं कधीं काळीं आपल्याला आनंदित केलं, त्याच्या किंवा तिच्या पुनर्भेटींत तो हर्ष पुन्हा आजाहि लाभेल हा हिशोबच खोटा आहे. ज्या माणसाच्या मनाचा सतत विकास होत आहे त्यानं तर असा हिशोब कधींच करूं नये.

स्थळं अन् व्यक्तीच कशाला, जीं पुस्तकं पूर्वीं कधीं तरी मला फार आवडलीं तीं सुद्धां मीं पुन्हा आज वाचलीं तर माझी निराशा होते व त्यांविषयीं मनांत धरलेल्या प्रीतीला धक्का बसतो हें मला माहीत आहे. मेरी कॉरेलीच्या कादंबऱ्या पंचवीस वर्षांपूर्वी मीं वाचल्या तेव्हां त्यांनीं केवढी मोहिनी माझ्यावर घातली होती ! पण थोड्याच दिवसांपूर्वी मी "थेल्मा" वाचूं लागलों तों तिच्यांत माझं मन रमेना. पूर्वीच्या माझ्या अभिरुचीच्या अपरिपक्वतेची मला शरम वाटूं लागली. हीच गोष्ट मिसेस हेन्रीवुडच्या कादंबऱ्यांची; अन् एके काळीं जिच्या कादंबऱ्यांवर मी फिदा होत होतों त्या जेन ऑस्टेन या लेखिकेची. इतकंच काय, हरिभाऊ आपटयांच्या कादंबऱ्या पुन्हा आज वाचल्या तर माझ्या स्मृतिकपाटांतल्या कांहीं अतीव नाजुक आठवणींना धक्का लागेल असं मला भय वाटतं. मी त्या पुन्हा वाचणार नाहीं. कारण त्या फार सुंदर आहेत असं मला आठवतं, अन् ही आठवण दुखविली गेली तर मला फार फार वाईट वाटेल. जीं पुस्तकं वाचण्यांत मी लहानपणीं तन्मय होऊन आनंदाच्या कित्येक घटका घालविल्या, त्यांची मी फक्त गोड आठवण ठेवीन. त्यांचा आनंद पुन्हा प्रत्यक्ष घेण्याचा प्रयत्न मी करणार नाहीं !

कारण त्या गांवीं जाऊन आल्यापासून मी एक मोठा धडा शिकलों आहे. जें एकदां आपल्याला रम्य वाटलं तें पुन्हा वाटेलच अशा आशेनं तिथं गेलं कीं निराशा होते. जुन्या सुखाच्या स्मृती पुन्हा जिवंत करण्याचा प्रयत्न सहसा यशस्वी होत नाहीं. मी बदलत आहे. माझ्या अभिरुची, माझ्या अपेक्षा बदलत आहेत. मग पूर्वीं कधीं काळीं आवडलेलीं पुस्तकं, स्थळं, गांवं, व्यक्ती आज मला

सुख कसं देऊं शकतील ? त्यांच्या आठवणी हें एक पुरून ठेवलेलं धन आहे. तें त्या ठिकाणीं आहे येवढीच जाणीव मीं ठेवावी, पण तें पुन्हा उकरून काढून पाहण्याचा मोह मी टाळावा हेंच शहाणपणाचं नव्हे काय ?

**अभ्यास**—(१) लेखकानें व्याख्यानास त्या गांवीं जाण्याचें एकदम कबूल केलें तें कोणत्या गुप्त उद्देशानें ? (२) लहानपणीं लेखक राहात असलेल्या कोणकोणत्या व्यक्तीबद्दल व गोष्टीबद्दल लेखकाला प्रेम वाटत होतें ? (३) प्रत्यक्ष भेट घेतल्यानंतर लेखकाला काय अनुभव आला ? (४) यात्रावर्तीत आपल्या भावना लेखकानें कशा व्यक्त केल्या आहेत ? कोणता धडा आपण शिकलों असें लेखक म्हणतो ?

: ९ :

# पो र खे ळ !

परिचय--कांहीं कांहीं गोष्टींची आपण 'पोरखेळ' म्हणून उगीचच हेटाळणी करीत असतो. पण वास्तविक जीवनांत एकंदर त्या गोष्टींना फारच महत्व असतें. इतकें कीं माणसांच्या जीवनांतील तारुण्य अखंड टिकविणाऱ्या गोष्टी असं लेखक अशा पोरखेळाचं वर्णन करतो.

मला लाज वाटली. मीं अगदीं शरमून गेलों. माझा सारासार विचार मला म्हणाला, 'तुला हें शोभतं का?' अन्‌ त्या प्रश्नाला मला उत्तर देतां येईना.

संध्याकाळची वेळ होती. ऑफिस सुटल्यावर रोजच्याप्रमाणें ट्रॅमनें जायच्या ऐवजीं पायीं चालत घरीं जायची आज मला लहर आली होती. बोरीबंदरचा विस्तीर्ण चौक ओलांडून झाडीनं आच्छादलेल्या रस्त्यानं जाऊं लागलों तों डाव्या हाताला एस्प्लनेडच्या मैदानावर एके ठिकाणीं शाळेंतलीं मुलं क्रिकेट खेळत होतीं तिकडे माझं लक्ष गेलं, आणि त्यांचा तो खेळ पहात रस्त्याच्या कडेच्या कठड्याला रेलून मी बराच वेळ उभा राहिलों. शाळेंतून सुटलेल्या, स्वच्छंदानं नाचणाऱ्या बागडणाऱ्या त्या मुलांचा खेळ पहात माझं भान कांहीं वेळ

हरपलं, पण मी भानावर येतांच माझ्या विवेकानं मला चिमटा घेतला, आणि म्हटलं, ' हें तुला शोभत नाहीं ! ' मनाची ती निर्भर्त्सना ऐकतांच मला खरंच फार लाज वाटली. मी खरोखर शरमून गेलों.

मला शरमल्यासारखं व्हावं याला अनेक कारणं होतीं. एक तर शाळेंत जातांना मुलांनीं वाटेंत तमाशा पहात जसं उभ राहूं नये तसंच ऑफिसांतून सुटून घरीं जाणाऱ्या पुरुषानं वाटेंत वेळ घालवूं नये हें मला कळायला हवं होतं ! दुसरं असं, कीं ज्या कठड्याला रेलून मी उभा होतों त्या कठड्यावर आधींच कोणा तरी रसिकानं टाकलेल्या पानतंबाखूच्या रसाचा डाग माझ्या कोटावर उठला तरी तें माझ्या ध्यानांत आलं नव्हतं. आणि तिसरं असं, कीं जो क्रिकेटचा खेळ पहात मी इतका वेळ उभा राहिलों होतों त्याला ' क्रिकेट ' म्हणणं धाडसाचं ठरलं असतं. तीं मुलं क्रिकेट कां खेळत होतीं ? छे : ! क्रिकेटचं निमित्त करून तीं मन मानेल त्याप्रमाणें बॅट फिरवीत होतीं, चेंडू फेकत होतीं, उड्या मारीत होतीं, धांवत पळत होतीं, आरोळ्या ठोकीत होतीं आणि एकमेकांशीं भांडत होतीं.

असला तो पोरखेळ पहात मीं आपला अमूल्य वेळ खर्च केला हें खरंच फार चमत्कारिक झालं ! माझ्या विवेकानं माझी कानउघाडणी केली ती उगीच नव्हे. मी कठडयापासून दूर झालों आणि पुन्हा रस्त्याला लागून झपाझप पावलं टाकूं लागलों.

मात्र क्रिकेट खेळणाऱ्या त्या लहान लहान बालकांचा विचार माझ्या मनांतून जाईना. मनांत सारखं येऊं लागलं, त्या बालकां-

सारखा एक घटकाभर तरी आपल्याला पोरखेळ करायला मिळाला तर केवढी बहार होईल ? कुठली तरी बॅट आणि कसला तरी चेंडू आणून आणि क्रिकेटचे बहुतेक नियम धाब्यावर बसवून तीं मुलं खेळत होतीं. पण, त्यापासून होणाऱ्या त्यांच्या आनंदाला सीमा होती काय ? त्यांच्या खेळण्याच्या जागेपासून थोडयाच अंतरावर असलेल्या रस्त्यावरून कारकून, मास्तर, व्यापारी अशा लोकांची कोण रहदारी चालली होती ! आणि या सगळ्या लोकांच्या अंतःकरणांत कमी अधिक प्रमाणांत चिंता, उद्विग्नता, निराशा यांची केवढी तरी गर्दी झाली होती ! पण त्या गर्दीचं त्या मुलांना काय ? तीं आपल्या पोरखेळांत आणि आनंदांत अगदीं मग्न होतीं. तो त्यांचा आनंद घटकाभर पहावासा मला वाटला तर बिघडलं कुठं ?

माझ्या विवेकाशीं मी भांडूं लागलों.

मनाशीं चाललेल्या त्या भांडणाच्या भरांत मी किती चाललों तें मला कळलंसुद्धां नाहीं. फ्रेंच फुलपाशीं आलों आणि रेल्वेचं फाटक बंद असलेलं दिसलं, तेव्हां मी माझ्या विचाराच्या तंद्रींतून जागा झालों आणि उभा राहिलों.

उभं राहणं भागच होतं. रेल्वेच्या बंद झालेल्या फाटकापुढें कुणाचं कांहीं चालत नाहीं. खांद्यावर कावड नेणारा गवळी, सायकलवाला, भारी किंमतीच्या मोटारींत गादीवर रेलून पडलेला लक्ष्मीपुत्र सगळ्यांना बंद फाटकापुढें थबकावं लागतं. सगळ्या माणसांना समानतेनं वागावयाला लावणाऱ्या बंद फाटकासारख्या दुसऱ्या गोष्टी फार थोडया असतील. आधुनिक कवींपैकीं एकानंहि बंद फाटकावर मुक्तछंदांतली कविता केली नाहीं हें मोठं आश्चर्य आहे असं त्या वेळीं माझ्या मनांत आल्यावांचून राहिलं नाहीं.

मी मागच्या पुढच्या लोकांकडे पाहिलं. माझ्यापुढेंच एक चांगला पन्नाशीच्या जवळचा इसम उभा होता. त्यानें एका हातानं सात आठ वर्षांच्या एका मुलाला धरलं होतं, आणि दुसऱ्या एका तीन चार वर्षांच्या मुलाला खांद्यावर घेतलं होतं. तीं दोघं मुलं त्याला पुनःपुन्हां विचारीत होतीं, 'काका, केव्हां येणार गाडी?' काका पुनःपुन्हां सांगत होते, 'आत्तां येईल. आलीच ती पाहा.'

त्याचीं तीं प्रश्नोत्तरं दहा बारा वेळां झालीं, आणि मला त्या काकांची कींव येऊं लागली, इतक्यांत एक लोकल गाडी खरोखरच आली. धाड् धाड् आवाज करीत, आणखी कांहींसा गिरणीच्या भोंग्यासारखा भोंगा वाजवीत तें अजस्र प्रकरण आमच्यापुढून जाऊं लागलं. खिडक्या खिडक्यांतून हजारों माणसांच्या आकृती क्षणार्धमात्र दिसल्या, आणि दिसेनाशा झाल्या. काकांच्या बरोबरच्या त्या दोन मुलांनीं आरोळ्या ठोकल्या आणि टाळ्या वाजवल्या. थोरल्या मुलानें तर प्रत्येक हाताचीं दोनदोन बोटं जिभेखालीं खुपसून एक कर्कश शिटीदेखील वाजवली. आणि चमत्कार असा कीं मुलांच्या त्या आरोळ्यांत ते काकासुद्धां सामील झाले! त्यांनींहि रुमाल फडफडावला अन् आरोळ्या ठोकल्या!

गाडी गेली. फाटक उघडलं. उन्हाळ्यांत सांचलेला पाचोळा पावसाच्या पहिल्या सरीनं वाहून जावा तशी फाटकाच्या दोन्ही बाजूंस थोपलेली रहदारी दोन्ही दिशांनीं वाहून गेली. मी काकांकडे आणि त्या मुलांकडे पाहात राहिलों. काका म्हणत होते, 'काय रे मुलांनो, आतां चलायचं ना घरीं?' मुलं म्हणालीं, 'नाहीं नाहीं,

आणखी एक लोकलगाडी पाह्यची.' काका म्हणाले, 'बरं ठीक आहे; आणखी एक पाहूं. पण आतां एकच हं. आत्तांपर्यंत दहा झाल्या; मोजल्या ना आपण?'

म्हणजे ही मंडळी गाडया पाहावयासाठींच इथें उभी राहिलीं होती तर?

काय या पोरखेळाला म्हणायचं?

आणि या पोरखेळांत पन्नाशीच्या सुमाराचा हा मोठा गृहस्थ खुशाल सामील झाला होता!

मग मी मघाशीं त्या मैदानावरच्या त्या पोरांचं नाचणंबागडणं पाहात पंधरा मिनिटं उभा राहिलों त्यांत माझी काय चूक झाली?

छेः छेः माझी मुळींच चूक झाली नाहीं.

माझ्या सारासार विचाराचा चिमटा आतां मला मुळींच बोचेना. कारण, मी मनाशीं म्हणूं लागलों, कीं तसाच विचार केला तर अशा पोरखेळावांचून मनुष्याचं जिणं असह्य होणार नाहीं का बरं? गांभीर्याचं, जबाबदारीचं, प्रतिष्ठितपणाचं ओझं मनुष्य काय अहर्निश डोक्यावर वागवूं शकेल? खेडयांतून भाजीनं भरगच्च भरलेले हारे डोक्यावर घेऊन शहराकडे लगबग जाणाऱ्या माळिणी तोंडानें गाणीं म्हणतात्, अन् वाटेंत मधून मधून डोक्यावरचं ओझं खालीं ठेवून घाम पुसतात. त्याप्रमाणेंच प्रतिष्ठितपणाचं ओझं दूर करून घटकाभर मनाला विरंगुळा घेण्याची संधि माणसानं साधलीच पाहिजे. युरोपियन लोकांत चित्रविचित्र पोशाख करून नाचण्याचे समारंभ होतात ते खाचित येवढ्याचसाठीं, कीं प्रतिष्ठितपणाच्या दडपणाखालीं थकलेल्या मोठमोठ्या स्त्री—पुरुषांना पोरखेळ करायला मिळावेत. आपल्या-

कडेसुद्धां कुठल्या तरी देवाच्या नांवानं जत्रेचे उत्सव होतात ते येवढ्याचसाठीं. अशा जत्रांच्या वेळीं क्षणभर लहान होऊन पाळण्यांत किंवा फिरत्या चक्राच्या लाकडी घोडयावर अथवा वाघावर बसण्याचा दोन पैशांची पिपाणी किंवा करकर घेऊन वाजविण्याचा पोरखेळ जे लोक करीत नाहींत ते मोठे अभागी म्हटले पाहिजेत !

अशा पोरखेळांच्या मसाल्यावांचून जीवितांत गोडी उरायची नाहीं. तें रुचिहीन होईल. त्याचा लवकरच वीट येईल. माणूस आंबून जाईल. त्याचं तारुण्य आणखी त्याचा उत्साह फार दिवस टिकणार नाहीं. म्हाताऱ्याला तारुण्याची पुनः प्राप्ति करून देणारीं रसायनं शोधून काढण्यांत शास्त्रज्ञ गुंतले आहेत. पण, माणसाची जवानी अखंड टिकवणारं ' पोरखेळ ' हें एकच रसायन आहे ! त्याचं महत्त्व जो ओळखील त्याला कधीं वृद्धत्व येणार नाहीं.

---

शिष्ट लोकांनीं पोरखेळांचा धिक्कार केला तरी मला तो पटायचा नाहीं. उलट त्यांचा धिक्कार मी ढोंगाचा समजेन. कारण, वस्तुतः तुमची आमची सगळ्यांचीच स्थिति लोकल गाडी पाहून हातरुमाल फडफडविणाऱ्या त्या वयस्क गृहस्थासारखी आहे. पोटासाठीं कराव्या लागणाऱ्या रोजगारामुळं आणखी दाखवाव्या लागणाऱ्या प्रतिष्ठितपणामुळं आपण सगळेच रंजीस आलेले असतों. क्षणभर पोरखेळ करायला मिळाला तर आपल्याला हवा असतो. पण आपल्याला धैर्य नसतं, आणि स्वतःची वंचना करून घेऊन प्रतिष्ठितपणाचं ओझं आपण तसंच सतत डोक्यावर वागवतों.

पण मी आतां स्वतःची वंचना करून घेणार नाहीं. लोकल

गाडीची मी वाट पाहणार; इतकंच नाहीं तर ती आली, कीं आरोळीसुद्धां ठोकणार, आणि वाजवितां आली तर शिटीसुद्धां वाजविणार! पाहींना कोणीं पाहिलं तर आणि ठेवींना नांवं! स्वतःची शरम वाटण्याऐवजीं मला त्यांचीच कींव येईल.

**अभ्यास**—(१) ऑफिसांतून घरीं जात असतां कोणती गोष्ट केल्याबद्दल लेखकाला लाज वाटली? (२) वाटेंत कोणतें दृश्य त्याला दिसलें? (३) सारासार विचाराचा पहिल्याप्रथम बोंचणारा चिमटा पुढें त्याला का बोंचेनासा झाला? (४) लेखकाच्या मतें पोरखेळाचें महत्व कोणतें आहे?

---

**परिचय**—एखाद्या गोष्टीचा अतिपरिचय झाला म्हणजे तिची खरी किंमत कळेनाशी होते; पण तेंच ती गोष्ट कांहीं दिवस दृष्टिआड झाली म्हणजे तिची योग्यता पटते. सृष्टीच्या प्रत्येक गोष्टींत आपापल्या परीनें सौंदर्य भरलेलें आहे, पण त्या गोष्टीच्या अभावामुळेंच तिचें खरें महत्व पटूं शकतें.

**त्या** दिवशीं माझ्या हातून कांहीं तरी मोठं सत्कृत्य घडलं असलं पाहिजे. तें कोणतं तें आतां मला आठवत नाहीं. आणि आठवत असतं तरी तें मीं सांगितलं नसतं. कारण, सत्कृत्यांचा उच्चार करूं नये असं कुठल्याशा नीतिबोधपाठावलींत मीं वाचलं आहे. तेव्हां माझ्या त्या सत्कृत्यावर प्रसन्न होऊन एक देवता माझ्यापुढें उभी राहिली येवढंच मी सांगतों.

'वत्सा, तुला काय हवा तो वर माग.' तिनं अत्यंत प्रसन्नपणों मला म्हटलं.

मी बराचसा विस्मयचकित झालों, आणि त्या देवतेकडे पाहात राहिलों.

सरस्वती, लक्ष्मी, इत्यादि ज्या देवतांचीं चित्रं मीं आजपर्यंत पाहिलीं होतीं त्यांच्यापैकीं ही कोणती देवता माझ्यापुढें उभी आहे त्याचा मी अदमास घेऊं लागलों. पण कोणत्याच चित्राशीं तिचं साम्य असल्याचं मला दिसेना. आमच्या चित्रकारांनीं कधीं जन्मांत देवता न पाहतां त्यांचीं चित्रं रंगविलीं असलीं पाहिजेत अशी माझी खात्री झाली, व आमच्या चित्रकलेंत वास्तवता नसल्याबद्दल एक झणझणीत टीकालेख लिहिण्याचा विचार मी करूं लागलों. लेखाचा मथळा मीं ठरविला, आणि प्रारंभींचं वाक्यदेखील मनाशीं जुळविलं. पण तितक्यांत त्या देवतेनं म्हटलं, ' वत्सा, वर माग ना ? '

कोणता वर मागावा तें मला चटकन् सुचेना. आपल्या नातवाच्या डोक्यावर छत्रचामरं ढळलेलीं पाहण्याचं भाग्य मागून घेणाऱ्या धूर्त वृद्ध अंधाची गोष्ट त्या वेळेपर्यंत माझ्या वाचनांत आली नव्हती, त्यामुळें वर मागून घेण्याच्या कौशल्यांत मी अगदींच मागासलेला होतों. मी अगदीं गोंधळून गेलों. पण तितक्यांत लहानपणापासून माझ्या मनांत जी इच्छा हजार वेळां आली होती, व जी प्रत्येक माणसाच्या मनांत केव्हां ना केव्हां तरी आली असली पाहिजे अशी माझी खात्री आहे, ती मला आठवली.

मीं त्या देवतेकडे कांहींशा अविश्वासानें पाहिलं व विचारलं, 'देवते, तूं माझी थट्टा तर करीत नाहींस ना ? मी मागेन तें तूं देऊं शकशील ?

त्या देवतेनं जणूं माझ्या अज्ञानाची कींव करण्यासाठीं हास्य केलं व नुसती मान हालविली.

तरी मीं पुन्हां विचारलं, ‘ काय वाटेल तें मागूं ? या सृष्टींत कांहीं फेरबदल करायला सांगितला तरी तूं करशील ? ’

देवतेनं पुन्हां हास्य केलं व मान हालविली.

मीं म्हटलं,

‘ आमच्या या पृथ्वीवर महिन्यांतून पंधराच दिवस चांदणं असावं ही फार खेदाची गोष्ट आहे. पाळीपाळीनं पृथ्वीवर चंद्रिकेचा वर्षाव करणारे दोन चंद्र असले तर फार बहार होईल ! दुसरा चंद्र तूं निर्माण करूं शकशील ? ’

‘ हो. ’

असं ती देवता म्हणाली, तेव्हां प्रतिसृष्टि निर्माण करणाऱ्या विश्वामित्राचा आत्मा तर त्या दिव्य स्त्रीच्या रूपानं माझ्यापुढें उभा नाहीं, असा मला क्षणभर भास झाला. मी मनाशीं म्हणालों, मेनकेच्या नादानं स्त्रैण झालेल्या त्या ऋषिश्रेष्ठाला आलंहि असेल हें स्वरूप. कुणीं सांगावं ? स्त्रियांच्या नादीं लागणं चांगलं नव्हे असं आमच्या तरुण पिढीच्या पुरुषार्थाचं जतन करण्यासाठीं तळमळणारे पंडित सांगतात तें खरंहि असेल ! पण मीं लगेच विचार केला, कुणी कां असेना ही देवता ? आपल्या पदरांत दुसरा चंद्र पडत आहे तो पाडून घ्यावा झालं.

मीं म्हटलं, ‘ देवते, सध्यांच्या एका चंद्राच्या जोडीला आणखी एक चंद्र तूं निर्माण करावास येवढीच माझी इच्छा आहे. ’

‘ ठीक. तुझी इच्छा पूर्ण होईल. मात्र, मीं नव्यानं निर्माण केलेला दुसरा चंद्र पृथ्वीभोंवतीं एकच प्रदक्षिणा घालील, आणि नंतर—’

‘ नंतर काय ? ’ मीं अधीरतेनं प्रश्न केला.

' नंतर तो अंतर्धान पावेल. '

येवढे शब्द उच्चारून ती देवता स्वतःच अंतर्धान पावली.

तिचं दिव्य तेजोवलय माझ्या दृष्टीपुढून अकस्मात् नाहींसं झाल्यामुळें माझ्या डोळ्यांपुढें मोठी अंधारी आली. बिछान्यावर पडल्या पडल्या मीं डोळे मिटून घेतले.

बऱ्याच वेळानं डोळे उघडून मीं खिडकीबाहेर पाहिलं तों समोर आकाशांत केवढं तरी मोठं चंद्रबिंब तरंगत होतं !

ती रात्र तर अमावास्येची होती.

अमावास्येच्या रात्रीं पूर्ण चंद्र !

केवढी विलक्षण क्रांति !

ही क्रांति मीं घडवून आणल्याचं जगाला कुठें माहीत होतं ? एडिसनसाहेब हसला नसेल येवढ्या मोठ्यानं मी आपल्या मनाशीं हसलों. आज मानवजातीला मीं केवढ्या तरी मोठ्या नव्या आनंदाची प्राप्ति करून दिली, व हा नवोदित चंद्र माझ्या कर्तृत्वानं निर्माण झाला आहे हें कळल्यावर सारे लोक मला किती धन्यवाद देतील, असे विचार करीत मी त्या प्रफुल्लचंद्राकडे पाहात राहिलों.

पण काय आश्चर्य !—

धन्यवाद तर बाजूसच राहिले, आणि सारे लोक चंद्रद्वयाच्या त्या अपूर्व चमत्कारावर अगदीं रुष्ट झाल्याचं मला लवकरच आढळून आलं !

वर्षारंभीं घेतलेलीं पंचागं निरुपयोगी झालीं म्हणून जो तो ज्योतिष्यांना शिव्या देऊं लागला, व ज्योतिषी नव्या चंद्राला शाप देऊं

लागले. कवि आणि लेखकहि त्या नव्या चंद्राचं यत्किंचितहि स्वागत करीनात ! एखाद्या व्यापाऱ्याच्या दुकानांतील कांहीं वस्तूंचा भाव एकदम उतरावा त्याप्रमाणें त्यांच्या संग्रहांतील कित्येक शब्दप्रयोगांचं आणि उपमांचं स्वारस्य नाहींसं झाल्याचं त्यांस दिसून आलं. चंद्र-किरणांत रोजचं स्नान करणाऱ्या वसुंधरेच्या वर्णनांत वाचकांना गोडी वाटेना ! चंद्रदर्शनानं उचंबळणाऱ्या सागरवीचींत नावीन्याचं स्वारस्य उरलं नाहीं; लावण्यसंपन्न कामिनीच्या मुखाला मुखचंद्र म्हटल्यानं वाचकांच्या मनाला आल्हाद होईनासा झाला; ललितवाङ्मयांत वर्षानुवर्षं रूढ झालेले कित्येक दृष्टांत निरुपयोगी ठरले ! चंद्राच्या विरहानं झुरणारी चंद्रकमलिनी, आणि निराशाग्रस्त प्रणयिनीच्या हृदयांत माजलेला अमावास्येचा गडद अंधःकार, असल्या सर्व गोष्टी आतां लुप्त झाल्या ! मला आशा होती, कीं कामपीडित प्रणयी युगुलं तरी आकाशांत सतत चंद्र तरंगतांना पाहून आनंदित होतील. पण, या चंद्रवंशीं स्त्रीपुरुषांनींहि नव्या चंद्राविषयीं असंतुष्टताच दर्शविली ! आपल्या प्रणयचेष्टांना चंद्र सदाच साक्षी असावा हें त्यांना रुचेना ! आणि या सर्व गोष्टींहूनहि सृष्टींतील ज्या एका अनुपम सौंदर्याचा माझ्या हातून अजाणतां घात झाला होता तें जेव्हां माझ्या स्वतःच्या लक्षांत आलं तेव्हां तर माझ्या सत्कृत्यावर प्रसन्न होऊन त्या देवतेनं निर्माण केलेला तो दुसरा चंद्र, त्याची मुदत संपून केव्हां नष्ट होईल याची मी वाट पाहूं लागलों.

सृष्टींतील तें अनुपमेय सौंदर्य म्हणजे अमावास्येची अंधारी रात्र !

खरंच, अंधारी !

सारी पृथ्वी घनदाट अंधःकारांत गुरफटली गेली असतांना निर्जन

प्रदेशांतील एखाद्या लहानशा ओढ्याच्या कांठच्या हिरवळीवर खुशाल उताणं पडून वर आकाशभागाकडे नजर टाकली, कीं जी दिव्य शोभा दिसते तिचं वर्णन कोठवर करावं ? कमीअधिक तेजानं तळपणाऱ्या कोट्यवधि तारका, त्यांच्या फटीफटींतून दिसणारी आभाळाची निळी मखमल, आणि वक्रगतीनं गेलेला आकाशगंगेचा पुसट पुसट पांढरा स्वच्छ फवारा, या दृश्याकडे पाहतां पाहतां अंतःकरणांतील किती तरी अस्पष्ट खोल भावना जागृत होतात ! मला पक्कं आठवतं, कीं एकदां पहाटेच्या शांत प्रहरीं डोंगरमाथ्यावर स्वस्थ पडून चमचमणाऱ्या असंख्य तारकांच्या थव्यांकडे मीं अगदीं टक लावली होती. पाळण्याच्या छताला लोंबणारे मोतीं ज्या निःशब्द सोप्या भाषेंत बालकाच्या कानांत गोष्टी सांगतात त्या भाषेंत नभोमंडलांतील त्या असंख्य तारका किती मजेमजेच्या रम्य कथा मला सांगत होत्या ! आणि तान्ह्या मुलानं भाबडेपणानं त्या मोत्यांचा लकाकीकडे पाहात त्याजवळ आपलं अंतःकरण उघडं करावं त्याप्रमाणें त्या तारकांजवळ मी माझ्या मनांतील सर्व गोष्टी खुशाल बोलत सुटलों होतों. जें करावयास हवं असून मीं केलं नाहीं, जें करावयास नको असूनहि मीं केलं, जें करावसं वाटलं पण साधलं नाहीं, जें साधलं पण नंतर ज्याचा पश्चात्ताप झाला—त्या सगळ्या सगळ्या गोष्टी मी खुशाल सांगत सुटलों होतों. लौकिकाच्या जगांत बोलतांना जीं बंधनं पाळावीं लागतात तीं सारीं मी खुशाल झुगारून दिलीं होतीं. सत्य असत्य, प्रिय अप्रिय, हे सगळे भेद विसरून मी बोलल्यावांचून बडबडत होतों, आणि त्या तारका किती लक्षपूर्वक माझी ती बडबड ऐकून घेत होत्या ? बोलतां बोलतां मी थांबल्याबरो-

वर त्या लुकलुकून मला म्हणत, ' हं, पुढें !' सारी सृष्टि अगदीं शांत स्तब्ध होती. चंद्र आभाळांत सरकतांना दिसला कीं पृथ्वीच्या गतीची जी जाणीव होते तिचासुद्धां उपसर्ग त्या वेळीं नव्हता. सबंध नभोवितान अगदीं जागच्या जागीं स्थिर राहिल्यासारखं भासत होतं ! वारा नव्हता ! जगाच्या व्यवहारांतील धावपळ दूर दूर राहिली होती ! वरून माझ्याकडे प्रकाशकिरण फेकणारे ते असंख्य तारकापुंज, आणि खालून माझ्या येवढ्याशा दृष्टींत तें अफाट सौंदर्य सामावून घेण्याचा प्रयत्न करणारा मी, यांखेरीज सृष्टींत दुसरी कोणतीच गोष्ट उरली नव्हती !

ती घटका मी कधींहि विसरणार नाहीं; आणि पुन्हां एखाद्या देवतेनं प्रसन्न होऊन मला वर मागण्यास सांगितलं, तर दुसरा चंद्र मागून घेण्याचा वेडेपणा मी कधींहि करणार नाहीं ! कारण चांदण्या रात्रीप्रमाणें अंधारी रात्रहि नयनरम्य आहे याविषयीं माझी आतां खात्री झाली आहे ! किंबहुना त्या अंधाऱ्या रात्रीलाच मी यापुढें चांदणीरात्र म्हणणार आहे. या रात्रीं पूर्ण चंद्र आभाळाच्या निळ्या किनखापी कापडावर एखाद्या उन्मत्त राजाप्रमाणें हळूहळू पावलं टाकीत चाललेला असतो, व एकाहि चांदणीचा मागमूस उरलेला नसतो ती ' चांदणी ' रात्र, कीं ज्या रात्रीं रतीच्या शय्येवरील जातिकुसुमांच्या पाकळ्यांप्रमाणें लक्षावधि चांदण्या आकाशभागीं उधळलेल्या दिसतात ती खरी ' चांदणी ' रात्र ?

**अभ्यास**–(१) लेखकानें त्या देवीजवळ कोणता वर मागितला ? (२) तो वर मिळाल्यामुळें कोणती परिस्थिति निर्माण झाली ? (३) सृष्टींतील अनुपमेय सौंदर्य म्हणजे 'अंधारी रात्र' असें लेखक कोणत्या उदाहरणांनीं म्हणतो ? (४) लेखक यापुढें अंधाऱ्या रात्रीलाच चांदणी रात्र कां म्हणणार आहे ?

## : ११ : वाट चुकल्याचा आनंद

**परिचय**—एखाद्या वेळीं अभावितपणें आपल्या हातून घडलेल्या एखाद्या चुकीमुळें नेहमीं जसें घडतें तसें कांहीं नुकसान न होतां उलट कांहीं अकल्पित फायदाच होऊन जातो. आणि मग अशा-वेळीं त्या चुकीबद्दल खंत न वाटतां ती आपल्या हातून घडली याबद्दल आनंदच वाटतो!

मी एकदां वाट चुकलों, आणि मग—

पण कुठली वाट चुकलों अन् कशी चुकलों तें आधीं सांगतों.

आश्विनाचे दिवस होते ते, अन् आम्ही महाबळेश्वराला राहुला गेलों होतों.

आम्हीं ज्या बंगल्यांत राहात होतों तो बाजारपेठेपासून चांगला दोन अडीच मैल लांब होता, अन् अगदीं एका बाजूला, जवळजवळ जंगलांत असल्यासारखा होता. महाबळेश्वराच्या सीमेंतला त्या दिशे-कडला अगदीं शेवटचा बंगला होता तो. मळलेली वाट त्या बंगल्या-पासून चांगली दोनतीन हाकांच्या अंतरावर होती.

एक दिवस काय झालं, दुपारीं तीन वाजतां थोडे कागद विकत आणावे म्हणून मी बाजारांत गेलों. दुकानांत एक मित्र अकस्मात् भेटले, अन् त्यांनीं आग्रह केला म्हणून चहा घ्यायला त्यांच्या घरीं गेलों. चहाच्या निमित्तानं बसलों, ओघाओघानं गप्पांवरून गप्पा निघाल्या अन् न कळत खूपच वेळ घालवला मीं तिथें. साडेचार वाजल्याचं कुणीसं सहज बोललं तेव्हां मी दचकून उठलों. आणि चहा देणाऱ्या त्या मित्रांना नमस्कारसुद्धां न करतां त्यांच्या घराबाहेर पडलों. भराभरा चालूं लागलों मी रस्त्यानं. कारण घरच्या मंडळींना मीं कबूल केलं होतं कीं चार वाजतां मी परत येईन, अन् मग फिरायला जाऊं. आतां पोचायला निदान पांच तरी वाजणार होते. मी अगदीं चेवानं चालूं लागलों. बंगल्याचा तो रस्ता पूर्वीं कधीं वाटला नव्हता इतका लांब वाटूं लागला मला. किती उतरचढ करीत अन् वळणं घेत गेला होता तो....

तितक्यांत माझ्या मनांत एक कल्पना आली.

मळलेल्या वाटेनं जायच्या ऐवजीं उजव्या हाताकडच्या झाडींत घुसून बंगल्याच्या धोरणानं आपण गेलों तर? आपला किती तरी वेळ वांचेल. केवळ दिशेच्या हिशोबानं पाहिलं तर पोस्ट ऑफिसच्या इमारतीपासून वायव्य दिशेकडे सरळ रेघ काढली तर आमचा बंगला फार तर पांच सहा फर्लांग असला पाहिजे........

या कल्पनेनं माझ्या मनाचा एकदम निश्चय झाला, आणखी उजव्या हाताकडच्या झाडींत मी घुसलों.

पण, पन्नास साठ पावलं गेलों नसेन तोंच झाडी इतकी गर्द झालेली आढळून आली, कीं अगदीं नाकापुढच्या झाडाखेरीज मला

दुसरं कांहींच दिसेना. गर्द झाडीच्या फटीफटींतून आभाळाचे लहान मोठे खवले दिसत होते. पण! त्यावरून दिशेचा अदमास करावा म्हटलं तर सोय होती काय? छे छे! मागं वळून पाहून मी आलों कोणत्या दिशेनं हें ठरवूं लागलों तों तें देखील ठरवतां येईना. पुढें जितकी दाट झाडी दिसत होती तितकीच मागंहि दिसत होती. पोस्ट ऑफिसच्या वायव्य देशेला बंगला होता खरा; पण वायव्य कोणती आणि आग्नेय कोणती हेंच कळेनासं झाल्यावर त्या माहितीचा काय उपयोग होता? मी अगदीं गांगरून गेलों! मनाशीं म्हटलं, असं आडमार्गानं जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं, परत मोठ्या रस्त्याला जाऊन मिळावं यासारखा दुसरा शहाणपणा नाहीं.

मी वळलों, अन् झाडांच्या फांद्या दोन्ही हातांनीं दूर करीत, त्या दूर करण्यासारख्या नसल्या तर वांकवीत, अन् हिंगण बेटांच्या ठेंगण्या काटेरी झुडपांवरून अलगत ओलांडून पलीकडे पावलं टाकीत जाऊं लागलों. पण, असा बराच गेलों तरी मोठा रस्ता मला मिळेना. तथापि, मी मनाशीं म्हणत राहिलों, आत्तां सांपडेल मोठा रस्ता, जातो कुठें? मीं असं म्हटलं खरं, पण तो जायचा तो गेलाच! मला तो सांपडेना. मी ज्या वेळीं परत वळलों त्या वेळीं जिकडून आलों तिकडच्या ऐवजीं भलतीकडेच माझी वाट वळली असली पाहिजे!

मग काय करणार?

जागच्या जागीं उभं राहून तर कांहींच उपयोग नव्हता. जात राहिलों पुढें तसाच.

अन् मग जेव्हां थोडीशी मळलेली एक पाऊलवाट दिसली तेव्हां जो आनंद झाला तो विचारूं नका. वाटलं, ठीक आहे; आतां मोठा रस्ता

लांब नसणार ! ‘ चंचुप्रवेश मुसलप्रवेशेः ’ या सुभाषिताच्या धर्तीवर एक नवं सुभाषितसुद्धां त्या आनंदाच्या भरांत मीं मनाशीं तयार केलं ! ‘ छोटी वाट सांपडली कीं मोठी फार लांब नाहीं म्हणून समजा ! ’ पण, लवकरच या सुभाषितांत कांहीं अर्थ नाहीं असं माझ्या लक्षांत यायला लागलं. नाहीं तरी कुठल्या सुभाषिताचा व्यवहारांत पडताळा येतो म्हणा !

मी चांगला वीस पंचवीस यार्ड गेलों त्या पाऊलवाटेनं, पण मोठा रस्ता सांपडायचं कांहीं चिन्ह दिसेना. भलतीकडेच चालली होती ती वाट !

महाबळेश्वरच्या डोंगराचे कधीं पाहिले नव्हते असे भाग मला दिसूं लागले. ती वाट कुठें जात असावी मला कळेना. चांगलाच घाबरलों मी मनांतल्या मनांत. पावलं पुढें पुढें टाकीत होतों, पण मन सारखं कच खात होतं.

अशा प्रकारें बराच चाललों तो एकदम एक खोपट मला दिसलं. एका तुटलेल्या कड्याच्या बरंच अलीकडे होतं तें. खोपट म्हणजे काय, माणसानं पक्ष्याप्रमाणें काड्यामोड्याचं घरटं बांधावं तसलं एक घरटंच म्हणाना ! पण तें पाहतांच मनस्वी समाधान झालं. मनांतली भीति बरीचशी गेली. वाटलं कुठेंहि असलों तरी माणसांत आहे येवढं खास ! धीर आला मनाला. आनंदसुद्धां झाला ! माणसाच्या मनांतल्या विकारांच्या छटा पालटायला किती क्षुल्लक कारणं पुरतात पाहा !

त्या तुटलेल्या कड्याच्या माथ्यावर गेलों अन् बसलों जरा वेळ. तेथून जी सृष्टिशोभा दिसत होती ती अपूर्व होती. एका दरीच्या

ऐन तोंडावर तो कडा डोकावलेला होता. दोन्ही बाजूंस शेंकडों फूट उंचीचे डोंगराचे कडे दिसत होते. मोठमोठ्या झाडांनीं त्या कड्यांचे खडक पार लपून गेले होते. जणूं ते डोंगर नसून एकावर एक उभ्या राहिलेल्या वृक्षांचे प्रचंड थवेच होते. सूर्यप्रकाशांत किती बहारीच्या वाटत होत्या त्या झाडांच्या हिरव्या रंगांच्या विविध छटा! वारा आला कीं घोंऽऽदिशीं वाजत होता. खालीं दरीच्या तळाशीं पाणवठा होता, आणि शेजारीं दोन खोपटं होतीं. त्या पाणवठ्यापर्यंत पोंचणाऱ्या समोरच्या एका जलौघाचा सारखा आवाज होत होता. खालीं खोपटांत कुठें तरी कुत्रं भोंकत होतं, त्याचा आवाज वरपर्यंत स्पष्ट येत होता. एखादा पक्षी त्या दरीचा सबंध विस्तार लीलेनं सहज ओलांडून जाऊन दिसेनासा होत होता; किंवा दुसरा एखादा पक्षी, कोणत्या वस्तूच्या लोभानं कुणास ठाऊक, आंपले पंख पसरून दरीवर डौलानं तरंगत राहून चोंचेनं विचित्र आवाज करीत होता. उजव्या बाजूच्या कडप्याला एके ठिकाणीं खूप मोठं मधाचं पोळं लागलेलं होतं. हजारों माशा त्याच्याभोंवतीं तरंगत होत्या, अन् त्यांच्या घोंघावण्याचा जो एक सतत सूर बनला होता तो कानाला किती मधुर लागत होता! सृष्टीचं इतकं अकृत्रिम स्वरूप मला कधीं दिसलं नव्हतं. केवळ्या शांतीनं अन् गांभीर्यानं गच्च भरलं होतं तें सारं वातावरण!

सारं भान विसरून मी पाहात राहिलों त्या देखाव्याकडे! तें पाहण्यांत मग्न झाल्यामुळं वर आभाळांत काय काय घटना चालल्या होत्या तिकडे माझं लक्षहि नव्हतं. पण जेव्हां एकदम सोसाट्याचे वारे सुटले, अन् एखाद्या रंगभूमीवरच्या प्रकाशाप्रमाणें सूर्यप्रकाश

एकदम मंद झाला, तेव्हां मात्र मीं दचकून वर पाहिलं. तों काय ? काळे काळे प्रचंड ढग माझ्या माथ्यावर येऊन तरंगू लागले होते. जणूं मोठमोठीं काळ्या रंगाचीं कुठलीं तरी विमानंच तेथें येऊन हवेंत क्षणभर विसांवा घेत होतीं ! मीं त्या ढगांकडे पुरतं पाहिलंहि नाहीं तोंच वाऱ्याचे वांकडे तिकडे झोत हवेंत उठले, अन् ढगांतून पाण्याचे थेंब पडूं लागले ते मोठाल्या बोरांयेवढाले !

मी आपल्या जागेवरून उठलों अन् खोपटाकडं धांव घेतली. पण, तिथें पोंचेपर्यंत पावसाच्या सरीनं मला पार ओलंचिंब करून टाकलं !

मी त्या खोपटांत शिरलों अन् पाहतों तों तिथें आंत कुणीसुद्धां नव्हतं. मला तिथें आंत उभं राहतां आलं असतं तर हवं होतं. पण तसं करणं मला चमत्कारिक वाटलं, म्हणून मी बाहेर आलों, आणखी खोपटाच्या आडोशाला उभा राहिलों. ज्यांचं तें खोपटं होतं त्यांच्यापैकीं एकहि माणूस तिथं नसावं, अन् खोपटाचं दार मात्र सताड उघडं असावं याचं मला क्षणभर आश्चर्य वाटलं. पण लगेच मनांत आलं, अशा चंद्रमौळी घराला रक्षणाची काय जरूरी ?

मी आडोशाला उभा राहिलों, अन् समोर पाहूं लागलों. केवढं उग्र स्वरूप धारण केलं होतं साऱ्या सृष्टीनं त्या वेळीं ! थोड्याच वेळापूर्वीं ज्या आकाशांतून सूर्य तळपला होता त्याच आकाशांत आतां जिकडे तिकडे घनदाट काळ्या ढगांचा सारखा थर सांचला होता, आणि प्रचंड जलधारा सारख्या खालीं पडत होत्या. त्या धारांच्या गर्द दाटींतून समोरच्या दरीचं मघाचं तें दृश्य दिसणं अशक्य

झालं होतं. अगदीं जवळचेच वृक्ष काय ते दिसत होते, पण त्याच्या सुद्धां फक्त अस्पष्ट कृष्णवर्ण आकृतीच. जणूं एखाद्या मोठ्या पडद्यावर एखाद्या चित्रकारानं काळ्या रंगाचे मोठमोठे शिडकावे फासून ठेवले होते, अन् त्यांकडे पाहणाऱ्याला तीं झाडं असावींत असा भास होण्यासारखा होता. जलधारांचा वृक्षपर्णांवर पडून होणारा सळसळाट अगदीं कानठळ्या बसवण्यासारखा होता, अन् मध्येंच विजेचा कडकडाट होऊन धूसर आकाशभागावर विलक्षण तेजःपुंज वांकड्यातिकड्या लांबलचक रेघा प्रगट होऊन लुप्त झाल्या, कीं क्षणमात्र ऐकूं येईनासा झालेला तो सळसळाट पुन्हां ऐकूं येऊं लागे. जणूं एखादं राक्षसी हिंस्र श्वापद क्षणमात्र भीतीनं श्वास कोंडून धरून पुन्हां आपला विचित्र चीत्कार नाद करूं लागत होतं. सृष्टीचं तें तांडवनृत्य इतक्या जवळून, त्याच्या ऐन तुफानाच्या मध्यें उभं राहून मीं यापूर्वीं कधीं पाहिलं नव्हतं.

मीं सहज माझ्या डोक्यावर दृष्टि वळवली तों त्या खोपटाच्या छपराच्या एका जागीं लहानसं घरटं होतं, अन् त्या घरट्यावर दोन पांखरं एकमेकांला बिलगून आपल्या पंखांत चोंची घालून बसलीं होतीं. मधूनच तीं थरथर कांपत, आणि एकमेकांच्या जवळ सरकत. मध्येंच तीं चिवचिवाट करीत आणि एकमेकांच्या चोंचीला चोंच लावीत. जणूं परस्परांच्या भेदरलेल्या जीवांना तीं धीर देत अन् एकमेकांला सांगत, 'भिऊं नकोस ! मी आहें ना बरं तुझ्याजवळ ?' त्या घरट्यांत त्यांचीं पिलं असतील, किंवा पिलांच्या अपेक्षेनें त्यांनीं घरटं बांधून ठेवलं असेल. प्रेमाचं अन् वात्सल्याचं याहून मुग्ध अन् निर्मळ दृश्य दुसरं कुठलं असेल का ? भोंवतालच्या सृष्टींत जिकडे

तिकडे घनचक्कर माजली होती, पण एवढ्याशा वीतभर जागेंतल्या त्या घरट्यांत किती मृदु व नाजूक भावनांचा विलास चालला होता !

मी किती वेळ त्या घरट्याकडे पाहात राहिलों कुणास ठाऊक ? त्याकडे पाहतां पाहतां जलवृष्टीच्या धो धो आवाजाची मला विस्मृति पडली होती, पण तो आवाज जेव्हां मंद झाला तेव्हां मात्र मी एकदम भानावर आलों.

मीं समोर पाहिलं तों पाऊस उघडूं लागला होता. जलधारांची दाटी विरळविरळ व्हायला लागली होती. शत्रूवर एकदम छापा घालून पुढें निघून जाणाऱ्या सैन्याच्या थव्याप्रमाणं ढग भरारा निघून चालले होते. आकाशाचा निळा रंग पुन्हां प्रगट व्हायला लागला होता. भोंवतालची दाट झाडी पुन्हां स्पष्ट दिसूं लागली होती. दहापंधरा मिनिटांनीं सूर्यप्रकाशहि पुन्हां पहिल्या थाटानं जिकडे तिकडे भरला अन् अखेर पूर्वक्षितिजावर जें प्रचंड इंद्रधनुष्य प्रगट झालं त्याच्या शोभेला उपमा कुठली ? किती बहारीच्या रंगाचे रुंदच्या रुंद पट्टे दिमाखानं खडे राहिले होते ! आणि काय चमत्कार ? दुसऱ्याच क्षणीं इंद्रधनुष्याची ती सबंध प्रचंड कमान माझ्या जवळ जवळ सरकत येत आहेसं मला वाटलं. अगदीं माझ्या अंगावरून गेली असली पाहिजे ती. मीं वळून पाहिलं तों ती अदृश्य झाली होती.

त्या घरट्यांतल्या त्या दोन पांखरांनीं आपले पंख फडफडावले, सारीं अंग चोंचींनीं साफ केलीं, अन् आनंदानं चिवचिव करीत तीं जागच्या जागीं नाचूं लागलीं.

कांहीं झालं तरी मला इथून निघून घरीं गेलंच पाहिजे असा विचार माझ्या मनांत आला. पण पुन्हां वाटलं रस्ता सांपडणार कसा ? पण मग काय इथेंच उभं राहून रात्र पडूं द्यायची ? जावं त्या पाऊलवाटेनं अन् पहावी नशिबाची परीक्षा, असें मनाशीं ठरवून मी निघालों तिथनं. अगदीं झपाझप चालूं लागलों.

अन् काय आश्चर्य ? दहापंधरा मिनिटं असा गेलों नसेन तोंच एकदम हमरस्त्याला पोंचलों मी.

वाट चुकली कशी हें जसं मला कळलं नाहीं त्याप्रमाणं ती अचानक सांपडली कशी तेंहि मला कळलं नाहीं. अन् वाट पुन्हां सांपडल्याच्या आनंदापेक्षां वाट चुकल्यामुळं सृष्टींतल्या अत्यंत उग्र अन् अत्यंत नाजूक अशा दृश्यांचं दर्शन घडून ज्या आनंदानं माझं अंतःकरण डंवरलं होतं तो किती तरी मोठा होता !

पुन्हां केव्हां तरी अशीच माझी वाट चुकावी अशी माझी फार फार इच्छा आहे !

**अभ्यास**—(१) कोणत्या घाईत असल्यामुळें-लेखकाची वाट चुकली ? (२) चुकीच्या वाटेनें गेल्यामुळें लेखकाला कोणत्या अविस्मरणीय दृश्याचा लाभ झाला ? (३) निसर्गाचें रौद्र स्वरूप व जीवनांतील एक प्रेम व वात्सल्य यांनीं भरलेलें दृश्य यांचें लेखकानें कोणत्या शब्दांत वर्णन केलें आहे ?

# : १२ : सुगंध : दिखाऊ अन् टिकाऊ !

परिचय—एखादी कला यशस्वी होण्यासाठीं कांहीं बाह्य साधनें असण्याची गरज लागत नाहीं. तीं साधणाऱ्यानं सतत अभ्यासानंच साधावी लागते. ग्रंथांना केवळ बाह्यांगावर सुगंध लावण्यापेक्षां ते लिहिण्यापूर्वी लेखकानें सतत परिश्रमानें आपली मनोभूमीच अगोदर श्रेष्ठ विचारांच्या सुगंधानं सुगंधित करावयास हवी.

परवां कुठें वाचलं, कीं न्यूयॉर्कच्या एका ग्रंथप्रकाशकानं पुस्तकांचा खप वाढविण्यासाठीं एक नवीनच उपाय अंमलांत आणायचं ठरविलं आहे. पुस्तकांना कुठल्या तरी अत्तराचा सुगंध लावून तीं प्रकाशित करायचा त्याचा बेत आहे.

हें ऐकतांच माझ्या मनांत प्रथम आलं, कीं ही नावीन्यपूर्ण कल्पना आमच्या मराठी प्रकाशकांनींसुद्धां अंमलांत आणून पाहण्यासारखी आहे. मराठी वाचकवर्गांत पुस्तकं विकत घेण्याची बुद्धि फारशी नाहीं अशी जी सध्यां यथार्थ ओरड आहे ती कदाचित् मग बऱ्याच अंशीं नाहींशी होईल. कारण, पुस्तकांतल्या ज्ञानाच्या परिमलाची जरी किंमत नसली तरी मलपृष्ठाच्या परिमलाची हौस पुष्कळ

लोकांना वाटेल, अन् ते आवडीनं पुस्तक खरेदी करतील. स्त्रियांन जात्याच अत्तराचा षोक असतो म्हणतात, तेव्हां सुगंधी ग्रंथ निघूं लागल्यास स्त्रियांमध्यें वाचनाची गोडी झपाटयानं वाढायचा बराच संभव आहे असं मानायलाहि हरकत नाहीं. शिवाय, पुस्तकविक्यांच्या दुकानाला सध्यां जी अगदींच सुतकी अवकळा नेहमीं आलेली दिसते, तीहि नव्या या उपक्रमानं दूर व्हायला वेळ लागणार नाहीं. मला एखाद्या पुस्तकांच्या दुकानांत शिरायची वेळ आली कीं फारशा उल्हासानं कांहीं मी आंत पाऊल टाकीत नाहीं. कारण, एक तर हजारों पुस्तकांच्या राशीच्या राशी जरी दुकानांत दिसत असल्या तरी आपण मागावं तें पुस्तक बहुधां नसायचं हा अगदीं ठरीव नियम आहे. एखादे वेळीं दुकानदारानं मागितल्याबरोबर पुस्तक काढून हातीं दिलं कीं मला तर क्षणभर विस्मयाचा धक्काच बसतो. पुस्तकांच्या वांकड्या तिकडया उतरंडी, पिंगट कागदांचे आणि सुतळीचे इतस्ततः विखुरलेले लहान मोठे तुकडे आणि अंधारांत एका टेबलावरच्या हिशोबांच्या वह्यांत तोंड घालून बसलेला, जाड लठ्ठ कांचांचा चष्मा घातलेला मालक हेंच पुस्तकांच्या दुकानाचं चित्र नेहमींच्या परिचयांतलं आहे. पुस्तकांच्या सुगंधी आवृत्ती निघूं लागल्या तर या चित्रांतला उदासपणा थोडा तरी कमी नाहीं का होणार? आणि पुस्तकांच्या दुकानांत शिरायची उत्सुकता लोकांच्या ठिकाणीं थोडी तरी नाहीं का वाढणार?

तें कांहीं नाहीं, पुस्तकं सुगंधित करूनच प्रकाशित करावींत.

पण इथपर्यंत माझ्या विचारांची मालिका पोंचते न पोंचते तोंच

पुस्तकं सुवासिक करून विकण्याच्या या योजनेचे दुष्परिणामहि माझ्या डोळ्यांपुढें एकामागोमाग उभे राहूं लागले आणि त्या योजनें-तल्या अडचणीहि माझ्या ध्यानांत येऊं लागल्या.

एक मोठी अडचण अशी, कीं प्रतिपाद्य विषयाचा गंधही नस-तांना जे ग्रंथ लेखकांकडून लिहिले जातात त्यांना प्रकाशकानं तरी कुठला सुगंध आणून फासायचा ? असला हा कृत्रिम गंध कितीहि फासला तरी लेखकाच्या अज्ञानाचा त्यामुळं कितीसा लोप होणार ? नव्हे, होत असला तरी तो होऊं देणं इष्ट आहे काय ? कारण मलपृष्ठाच्या सुगंधाच्या जोरावर पुस्तकं खपूं लागलीं अन् त्या सुगंधा-मुळं लेखकाच्या अज्ञानावर पांघरूण पडूं लागलं तर ती एक नवी आपत्तीच मानावी लागेल. कलेचा यत्किंचित्‌हि अभ्यास न करतां ललितकलेची मीमांसा करणारे, काव्यशक्तीचा लेशहि अंगीं नसतां काव्याचे निर्झर वाहवणारे, कादंबरीलेखनास आवश्यक असणाऱ्या लालित्याचा स्पर्श लेखणीस नसतां कादंबऱ्या रचणारे—अशा मंड-ळींच्या जुलमानं आधींच आमचं मराठी साहित्य थोडंफार जर्जर झालेलं आहे ! अशांत कागदाच्या अन् बांधणीच्या सुगंधाचा भरंवसा या मंडळीस मिळाला म्हणजें ती आणखी कोणते अत्याचार करायला उद्युक्त होतील त्याचा काय नियम सांगावा ?

शिवाय असं, कीं पुस्तकं सुवासित करून प्रसिद्ध करण्याचा उप-क्रम सुरू झाला तर त्याच्या पुढची सहजच प्राप्त होणारी पायरी अशीं कीं त्या त्या लेखकाच्या स्वभावधर्माप्रमाणं व त्याच्या लेखनाच्या शैलीप्रमाणं त्याच्या पुस्तकांस एक विशिष्ट सुगंधच लावायचा.

अमुक लेखकाचे ग्रंथ म्हटले कीं ते अमक्या सुगंधानं युक्त असायचेच असं करून टाकायचं. परंतु असं करायचं म्हटलं तरी किती तरी अडचणी उद्भवतील. हल्लीं लेखकांचे खाजगी स्वभाव गुलदस्तांत राहतात म्हणून बरं आहे. त्या स्वभावाच्या तऱ्हेला अनुलक्षून पुस्तकाला चोपडायच्या सुगंधाची तऱ्हा निवडून काढायची प्रकाशकांस पंचाईत पडेल. हट्टी, अहंमन्य, मत्सरी, चिरचिरे, स्तुतिलंपट अशा एकेक जातीच्या लेखकागणिक भिन्न भिन्न सूचक सुगंध प्रकाशकानं आणायचे कुठून ? बरं लेखकांचे स्वभावधर्म लक्षांत न घेतां केवळ त्यांच्या लेखनशैलीस साजेसा त्यांच्या पुस्तकांचा एक विशिष्ट सुगंध ठरवून टाकायचा म्हटला तरी काम कांहीं सोपं नाहीं ! खाडिलकरांच्या झणझणीत नाटकांना काय खस लावायाचा ? केळकरांच्या चुरचुरीत, ताज्या तवान्या भाषाशैलीचा गौरव काय गुलाब चोपडून करायचा ? वामनरावजींच्या कादंबऱ्यांना केवडा चालेल काय आणि वाळा, हीना, चंदन, मधुमालती, सुरंगी इत्यादींची वांटणी कशी करायची ? आणि हा प्रश्न जर फार बिकट असेल तर सुगंधी पुस्तकांची कल्पना टाकून दिलेली काय वाईट ?

आणखी असं कीं आधींच ठराविक ठशाचे अभिप्राय ठोकून द्यायला सवकलेले पुस्तकपरीक्षक सुगंधी ग्रंथांची कल्पना प्रचारांत आली तर अधिकच आळशी बनतील, आणि पुस्तक न वाचतां त्याच्या बाह्यांगावर चार मोघम शब्द लिहिण्यास त्यांना अधिकच वाव मिळेल. एखाद्या गचाळ पुस्तकाबद्दल ते लिहितील, "पुस्तकास लावलेला सुगंध अगदीं भारीपैकीं आहे व प्रत्येक रसिक स्त्रीपुरुषानें हें पुस्तक आपल्या शयनमंदिरांत अवश्य ठेवावें." आणि एखाद्या

उत्कृष्ट ग्रंथावर ते कदाचित् खुशाल असा अभिप्राय देतील कीं, " ग्रंथाला लावलेला वास अगदींच सामान्य प्रतीचा आहे, व त्यामुळें सामान्य वाचकांस ग्रंथाची किंमत जरा भारी वाटण्याचा संभव आहे. ग्रंथाची दुसरी आवृत्ति काढण्याचा योग आल्यास अगदीं निवडक अत्तर खरेदी करून पुस्तक सुगंधित करावें अशी आमची आग्रहाची सूचना आहे. "

अशीच आणखी एक आपात्ति ओढवण्याचा संभव आहे. पुस्तक विकत घेण्याऐवजीं लोकांकडून मागून आणून ते परत करायला विसरण्याची जी कला आमच्या वाचकवर्गाच्या ठिकाणीं दिसून येते ती ग्रंथ सुगंधी झाले कीं ताबडतोब वाढत जाईल. रामरावांकडून मागून आणलेलं पुस्तक शामराव नुसतं वाचून थांबणार नाहींत तर आपल्या कपडयाच्या पेटींत ठेवून देऊन मोकळे होतील. घटकाभर मनोरंजन करून घेऊन कपडयांच्या परीटघडया कायमच्या सुगंधी करायचा दुहेरी हेतु जर असा साधूं लागले तर नेलेलीं पुस्तकं परत करायची मूर्खपणाची आठवण सहसा कुणाला व्हायचीच नाहीं !

सारांश, दिखाऊ वासानं ग्रंथ सुगंधित करण्याची कल्पना कितीहि आकर्षक वाटली तरी विचाराअंतीं घातुकच ठरेल. ग्रंथाच्या बाह्यांगाच्या बाबतींत कृपणाचें व्रत आचरणाऱ्या आमच्या मराठी प्रकाशकांच्या अगदीं विरुद्ध टोकाला असलेल्या उधळ्या अमेरिकन प्रकाशकांची ही एक नवीन लहर आहे झालं ! ग्रंथाचं बाह्यांग सुबक अन् टिकाऊ असावं आणि कोणतंहि पुस्तक दिसायला मनोहर आणि हातांत वागवायला सोयीस्कर असावं येवढा जरी बोध अमेरिकन

लोकांच्या या अभिनव कल्पनेवरून आमच्या मराठी प्रकाशकांनीं घेतला तरी पुष्कळ झालं आणि प्रकाशकांनीं अत्तर चोपडून पुस्तकं सुगंधित करणं जितकंच हास्यास्पद तितकंच लिहिणाऱ्याच्या हृदयाला कळकळीचा, सहानुभूतीचा आणि अभ्यासाचा गंधहि नसतां पुस्तकं लिहिणं हास्यास्पदच नव्हे तर पातकासमान होय, हें लेखकांनीं सतत आपल्या मनांत वागवलं तरी पुष्कळ झालं !

ग्रंथाच्या पानागणिक लेखकाच्या लालित्याचा, विद्वत्तेचा अन् श्रद्धेचा परिमल येत असला म्हणजे त्या ग्रंथाला कृत्रिम सुगंध न लावतांहि वाचकवृंद भ्रमरासारखे त्यावर लुब्ध होतात. सतत अभ्यासानं व दीर्घ परिश्रमानं हा टिकाऊ सुगंध आपल्या लेखणींत येईल असा कटाक्ष लेखकानं ठेवला पाहिजे. हा परिमल इतका दिव्य आहे कीं हजारों वर्षं झालीं तरी तो उडून जात नाहीं, किंवा कमीहि होत नाहीं. कालिदासाचं शाकुंतल केव्हांहि उघडलं तरी वाचणाऱ्याच्या अंतरगांत एक अवर्णनीय सुगंध दरवळतो याचं कारण हेंच ! असल्या सुगंधानं आपलं लेखन परिपूर्ण असावं याहून अधिक उच्च महत्त्वाकांक्षा लेखकाला धरतां येणार नाहीं.

अभ्यास—(१) ग्रंथाला सुगंध लावण्याचे चांगले परिणाम कोणते होतील असें लेखकाला वाटलें ? (२) ग्रंथाला सुगंध लावण्याचे वाईट परिणाम कोणते होतील असें त्याला लगेंच वाटलें ? (३) कोणत्या तऱ्हेच्या सुगंधानें आपलें लेखन परिपूर्ण असावें अशी लेखकांनीं काळजी घ्यावयास हवी ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ........................ वि: ........
क्रमांक ........................ नों: दि: ........

## अधिक वाचनासाठीं:—

मराठी लघुनिबंध हा वाङ्मयप्रकार अगदीं अलीकडील असाच असल्यामुळें त्याचें तंत्र व इतिहास यावर फारच थोडें असें लिखाण झालेलें आहे. ' मराठी साहित्य ' ( १९१४ ते १९४४ ) या पुस्तकांत प्रो. आंबेकर यांनीं उत्तम तऱ्हेनें याबद्दल लिहिलेलें आहे तें सर्वांनीं अवश्य वाचावें. ' प्रदक्षिणा ' या पुस्तकांत प्रा. वि. ह. कुलकर्णी यांनींहि थोडेसें विवेचन केलें आहे. पण या दोन्हीहि लेखांत इतिहासविषयकच माहिती आहे, तंत्रविषयक विवेचन फारसें कोठें झालेलेंच नाहीं. प्रो. फडके यांच्या गुजगोष्टी या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत व नवें लेणें या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत त्यांनींच या वाङ्मयप्रकाराच्या तंत्राची थोडीशीच पण मोठी मार्मिक चर्चा केली आहे. ती लघुनिबंधाच्या प्रत्येक अभ्यासकानें अवश्य वाचली पाहिजे. श्री. वि. स. खांडेकर यांनीं त्यांच्या स्वतःच्या ' हिरवळ ' या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत व त्यांनीं संपादित केलेल्या, ' नवे किरण ' व ' वासंतिका ' या लघुनिबंधसंग्रहांच्या प्रस्तावनेंत याबद्दल चांगली उद्बोधक चर्चा केलेली आहे. तीहि प्रत्येकानें अवश्य वाचावी. पण या सर्वांपेक्षां सर्व प्रसिद्ध लघुकथा-लेखकांचे लघुनिबंध वाचणें हेंच योग्य होय. येथें पुढें कांहीं प्रसिद्ध लेखकांची व त्यांच्या लघुनिबंधांच्या पुस्तकांचीं नांवें देत आहे.

दा. क्र. ७३८८



**ना. सी. फडके:**—गुजगोष्टी, नव्या गुजगोष्टी, धूम्रवलयें;

**वि. स. खांडेकर:**—चांदण्यांत, सायंकाळ, अविनाश, मंजिऱ्या मंदाकिनी, कल्पलता, तिसरा प्रहर.

**अनंत काणेकर:**—पिकलीं पानें, शिंपले आणि मोतीं, तुटलेले तारे, उघड्या खिडक्या इत्यादि.

याशिवाय श्री. काकासाहेब कालेलकर, कै. साने गुरुजी, प्रा. वि. पां. दांडेकर, डॉ. श्री. स. भावे, श्री. ना. मा. संत, कै. वि. ल. बर्वे वगैरे लेखकांनीं लघुनिबंधांचें यशस्वीपणें लेखन केलेलें आहे. जुन्या लेखकांपैकीं कै. न. चिं. केळकर, कै. शि. म. परांजपे, कै. वा. म. जोशी यांच्या कांहीं निबंधांवर नव्या लघुनिबंधाच्या तंत्राची छटा पडलेली आहे तेव्हां त्यांचेहि लघुनिबंध अवश्य वाचावे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.

REFBK-0007398